रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८९ | अंक ३३६ | पृष्ठे १० ▌ RGD/016/2026-28 www.krushival.in

**GUITAR CLASSES**
**BY SWARSANGAM**
STARTING FROM 16/05/2026 EVERY SATURDAY & SUNDAY TOTAL BATCHES: 2 (TWO BATCHES ONLY) MORNING BATCH :- 10:00 AM - 11:00 AM, EVENING BATCH :- 4:00 PM 5:00 PM, BATCH SIZE - MAX 5, STUDENTS ONLY
LOCATION- Maruti Mandir, Varsoli, Bhandar Ali
CONTACT : Akshay Padwal 8408877317

# कृषीवल

रायगड, शुक्रवार, दि. १५ मे २०२६

किंमत ४ ₹

**ड्रायव्हर पाहिजे**
आर्यन डेवकॉन्स् प्रायव्हेट लिमिटेड, अलिबाग येथे पूर्ण वेळ (Full Time) कायमस्वरूपी नोकरी. अनुभवी ड्रायव्हर बोलेरो पीक अप आणि स्कॉर्पिओ गाडी साठी तातडीने पाहिजे.
वैध ट्रान्सपोर्टचा (TR) ड्रायव्हिंग लायसन्स आवश्यक. पगार: चर्चा करून ठरविण्यात येईल.
संपर्क : ९२२५६०२८१०

**वेधक**

## आंबा बागायतदारांचा आज मुंबईत मोर्चा

**मुंबई :** कोकणातील आंबा व काजू उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आता राजकीय वातावरण तापू लागले असून, शेतकरी कामगार पक्ष (शेकाप), शिवसेना, मनसे, काँग्रेससह विविध पक्ष व संघटना १५ मे रोजी दुपारी चार वाजता मुंबईत होणाऱ्या धडक मोर्चात सहभागी होणार आहेत. गिरगाव चौपाटी ते मुख्यमंत्र्यांच्या 'वर्षा' निवासस्थानापर्यंत काढण्यात येणाऱ्या या मोर्चाच्या माध्यमातून सरकारला जाब विचारला जाणार असल्याची माहिती स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांनी दिली. सरकारने हेक्टरी केवळ २२ हजार रुपयांची मदत जाहीर करून शेतकऱ्यांची चेष्टा केली आहे. सरकारला गुडघे टेकायला भाग पाडण्यासाठी आता रस्त्यावर उतरावे लागेल, असा इशारा दिला.

## मध्यप्रदेशात फटाका कारखान्यात स्फोट

**नवी दिल्ली :** मध्य प्रदेशातील देवास जिल्ह्यातील टोंक कला परिसरातील फटाका कारखान्यात गुरुवारी सकाळी भीषण स्फोट होऊन किमान आठ जणांचा मृत्यू झाला, तर अनेक जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींपैकी काहींची प्रकृती चिंताजनक असल्याने मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.ही दुर्घटना सकाळी सुमारे ११.३० वाजण्याच्या सुमारास घडली. स्फोटावेळी कारखान्यात सुमारे २०० महिला कामगार उपस्थित असल्याची माहिती समोर आली आहे. स्फोट इतका जोरदार होता की परिसरात एकच खळबळ उडाली आणि नागरिकांमध्ये घबराट पसरली.जखमींना तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

## सथीशन होणार केरळचे मुख्यमंत्री

**नवी दिल्ली :** दहा वर्षांच्या प्रतीक्षेनंतर केरळमध्ये काँग्रेसच्या नेतृत्वाखालील युडीएफ पुन्हा सत्तेत परतले असून, केरळ राज्याच्या मुख्यमंत्रीपदासाठी अखेर व्ही.डी. सथीशन यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर तब्बल दहा दिवस सुरू असलेल्या राजकीय चर्चांना पूर्णविराम देत काँग्रेस विधिमंडळ पक्षाच्या बैठकीत त्यांच्या नावाची अधिकृत घोषणा करण्यात आली. या निर्णयामुळे तिरुवनंतपुरमपासून दिल्लीपर्यंत सुरू असलेल्या राजकीय हालचालींना अखेर विराम मिळाला आहे. सथीशन हे सहा वेळा आमदार राहिले आहेत.

## नीट घोटाळ्याचे पुणे कनेक्शन

**पुणे :** नीट पेपर फुटी प्रकरणातील पुण्यातून ताब्यात घेतलेल्या महिलेची धक्कादायक माहिती समोर समोर आली आहे. नीट परीक्षेच्या प्रक्रियेच्या दरम्यान मनीषा वाघमारे यांच्याकडे तब्बल २१ वेगवेगळ्या बँक खात्यांतून लाखो रुपये जमा झाल्याचे तपासातून समोर आले आहे. ही रक्कम पेपर विक्रीसाठी किंवा त्यासंबंधित व्यवहारांसाठी आगाऊ म्हणून घेण्यात आल्याचा संशय व्यक्त होत आहे. या २१ खात्यांचा मालक कोण आहे आणि हा पैसा नेमका कुठून आला, याचा तपास सीबीआय करत आहे. लोखंडे आणि मनीषा यांच्यात अनेक संशयास्पद व्हॉट्सअ‍ॅप कॉल्स आणि टेलिग्राम मेसेजेस झाल्याची माहिती समोर आली आहे.



# 48 तासांत अंदमानात

# मान्सून धडकणार!

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

**उन्हाच्या तीव्र झळांनी होरपळणाऱ्या नागरिकांसासह पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांसाठी एक अत्यंत दिलासादायक बातमी भारतीय हवामान विभागाने दिली आहे. दक्षिण बंगालच्या उपसागरात तयार झालेल्या पोषक हवामानामुळे येत्या १६ मेपर्यंत मान्सून अंदमान-निकोबार बेटांवर दाखल होण्याची दाट शक्यता आहे. मोसमी वाऱ्यांच्या या वेगवान हालचालींमुळे यंदा पाऊस वेळेपूर्वीच भारतात धडकण्याचे संकेत मिळत आहेत.**

### महाराष्ट्रात जूनमध्ये एन्ट्री!

अंदमान-निकोबारमध्ये मान्सून दाखल झाल्यानंतर साधारणपणे तो केरळच्या दिशेने प्रवास करतो. अंदमानात मान्सून वेळेआधी पोहोचत असल्यामुळे केरळ आणि त्यानंतर महाराष्ट्रातही मान्सूनचे आगमन लवकर होणार का, याकडे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे डोळे लागले आहेत. जूनच्या पहिल्या पंधरवड्यात महाराष्ट्रात पावसाची एन्ट्री होऊ शकते, असे प्राथमिक संकेत मिळत आहेत.

### पुढील वाटचालीस अधिक बळ मिळणार

नैऋत्य आणि पश्चिम-मध्य बंगालच्या उपसागरात तयार झालेले कमी दाबाचे क्षेत्र आता वेल मार्क लो प्रेशर एरियामध्ये रूपांतरित झाले आहे. या शक्तिशाली हवामान प्रणालीमुळे मोसमी वाऱ्यांच्या हालचालींना मोठी गती मिळाली आहे. १३ मे रोजी हवामान विभागाने जारी केलेल्या निवेदनात स्पष्ट केले आहे की, या बदलांमुळे देशाच्या विविध भागांतील हवामानावर परिणाम दिसून येईल, ज्यामुळे मान्सूनच्या पुढील वाटचालीस अधिक बळ मिळणार आहे.

मान्सूनच्या प्रवासासाठी सध्या वातावरणात अत्यंत पोषक स्थिती तयार झाली असून, येत्या दोन दिवसांत मान्सून अंदमान आणि निकोबार बेटांच्या समूहामध्ये अधिकृतपणे प्रवेश करेल, असा अंदाजही वर्तवण्यात आला आहे. जूनच्या पहिल्या आठवड्यात केरळ आणि त्यानंतर महाराष्ट्रात मान्सूनचे दमदार आगमन होईल, असे सांगण्यात आले आहे.

हवामान खात्याच्या अंदाजानुसार, १६ मेच्या सुमारास दक्षिण बंगालचा उपसागर, अंदमान समुद्र आणि अंदमान-निकोबार बेटांवर मान्सूनचे आगमन होऊ शकते. मान्सूनच्या प्रगतीसाठी आवश्यक असलेले समुद्रावरील वाऱ्यांची दिशा, आर्द्रता आणि वातावरणीय दाबाचे घटक सध्या अनुकूल आहेत. बंगालच्या उपसागरात तयार झालेले कमी दाबाचे क्षेत्र अधिक सक्रिय झाल्यामुळे मान्सूनची पावले वेगाने भारताच्या दिशेने पडू लागली आहेत. मान्सूनचा हा प्रवास असाच अखंड सुरू राहिल्यास केरळ आणि महाराष्ट्रातही पाऊस वेळेपूर्वी येण्याची आशा पल्लवित झाली आहे. सध्या बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र सक्रीय झाले असून, त्याचा प्रभाव महाराष्ट्रापर्यंत जाणवत आहे.

### उत्तर आणि पश्चिम भारतात उष्णता

एकीकडे मान्सूनच्या आगमनाची चाहूल लागली असताना, दुसरीकडे उत्तर आणि पश्चिम भारताला उष्णतेच्या लाटेने वेढले आहे. बाडमेर येथे देशातील सर्वाधिक ४८.३ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. येत्या आठवडाभर उत्तर-पश्चिम आणि मध्य भारतातील अनेक भागांत उष्णतेची ही तीव्र स्थिती कायम राहणार आहे. महाराष्ट्रातही काही जिल्ह्यांत उन्हाचा चटका जाणवत असून, अंदमानात मान्सून दाखल झाल्यानंतर महाराष्ट्रातील पावसाच्या तारखांचे चित्र अधिक स्पष्ट होणार आहे. अंदमानातील प्रवेशानंतर साधारणपणे १० ते १५ दिवसांत मान्सून महाराष्ट्राच्या वेशीवर धडकतो, असा आजवरचा अनुभव आहे.

## कुरकुंडी-कोलटेंभी ग्रामपंचायतीचा
# संशयास्पद कारभार

- **सामाजिक कार्यकर्ते सचिन पाटील यांचा आरोप**
- **भ्रष्टाचाराची चौकशी करण्याबाबत दिले निवेदन**

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

अलिबाग तालुक्यातील कुरकुंडी-कोलटेंभी ग्रामपंचायत हद्दीत गेल्या दहा वर्षांत करण्यात आलेल्या विविध विकासकामांमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार आणि आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा गंभीर आरोप सामाजिक कार्यकर्ते सचिन पाटील यांनी केला आहे. माहितीच्या अधिकारातून उघड झालेल्या कागदपत्रांच्या आधारे त्यांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली असून, संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे. त्यामुळे ग्रामपंचायत कारभारातील अनेक धक्कादायक बाबी समोर येण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कुरकुंडी-कोलटेंभी ग्रामपंचायत हद्दीत सन २०१५ ते २०२६ या कालावधीत विविध विकासकामांसाठी शासनाकडून मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्यात आला होता. या निधीतून रस्ते, बांधकामे, पाणीपुरवठा, गटारे तसेच इतर मूलभूत सुविधांची कामे करण्यात आल्याचे दाखविण्यात आले. मात्र, माहितीच्या अधिकारातून मिळालेल्याकागदपत्रांचीपडताळणी केल्यानंतर अनेक कामांमध्ये गंभीर अनियमितता आढळल्याचा दावा सचिन पाटील यांनी केला आहे.

तक्रारीनुसार, अनेक कामे कागदोपत्री पूर्ण दाखविण्यात आली असली तरी प्रत्यक्षात ती अपूर्ण किंवा अत्यंत निकृष्ट •> पान २ वर

# दिखावा नको, सातत्य ठेवा

## इंधन बचतीवरून शरद पवारांचा नेत्यांना टोला

| पुणे | प्रतिनिधी |



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या इंधन बचतीच्या आवाहनानंतर नेत्यांकडून सुरू झालेल्या प्रतिकात्मक कृतींवर राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते खा. शरद पवार यांनी टोला लगावला आहे. एक-दोन दिवस गाड्यांचा ताफा कमी करून किंवा पायी चालून काही साध्य होणार नाही. दिखावा न करता त्यामध्ये सातत्य ठेवणे गरजेचे आहे, असा सल्ला शरद पवार यांनी नेत्यांना दिला.

देशातील सध्याची परिस्थिती गंभीर असल्याचे सांगताना शरद पवार म्हणाले की, पंतप्रधानांनी केलेल्या आवाहनाची सर्वांनी गांभीर्याने दखल घ्यायला हवी. प्रशासनाच्या खर्चात बचत करण्यासाठी अनेक पर्याय उपलब्ध आहेत. मात्र, त्यासाठी सातत्यपूर्ण कृती आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

पंतप्रधानांच्या आवाहनानंतर काही मंत्री ताफे कमी करताना किंवा पायी चालताना दिसत आहेत. यावर प्रतिक्रिया देताना पवार म्हणाले, ताफा सोडणाऱ्यांनी दिखावा करू नये. एक-दोन दिवसांच्या बचतीने काही होणार नाही. हे नेते किती दिवस सातत्य ठेवतात, हे महत्त्वाचे आहे.

मंत्र्यांच्या ताफ्यातील गाड्यांच्या संख्येवरही त्यांनी प्रश्न उपस्थित केले. १७-१७ गाड्यांचे ताफे कशाला हवेत? त्या कमी करून सात-आठ गाड्यांवर आणल्या जात आहेत आणि त्याचाही गाजावाजा केला जातो. •> पान २ वर

## हळदी समारंभात रक्तरंजित थरार

| महाड | प्रतिनिधी |

रायगड जिल्ह्यातील महाड तालुक्यातील कुंभेशिवथर गावात हळदी समारंभादरम्यान झालेल्या वादाचे रूपांतर थेट रक्तरंजित हल्ल्यात झाले. दारूच्या नशेत झालेल्या वादातून दोन जणांनी नातेवाईकावर लोखंडी सळईने जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या हल्ल्यात विनोद पांडुरंग साळुंखे (४०) हे गंभीर जखमी झाले असून, त्यांच्यावर मुंबई येथे उपचार सुरू आहेत.

ही घटना १३ मे रोजी रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास कुंभेशिवथर बसस्टॉप परिसरात घडली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जखमी विनोद साळुंखे तसेच आरोपी दिलीप साळुंखे आणि अल्पेश जाधव हे एकमेकांचे नातेवाईक आहेत. •> पान २ वर


# करंजाडेतील गॅस दुरुस्ती दुकानाला आग

| पनवेल | विशेष प्रतिनिधी |

करंजाडे वसाहतीतील एका गॅस दुरुस्ती दुकानाला अचानक आग लागल्याची धक्कादायक घटना समोर आली असून, पनवेल महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाच्या तत्परतेमुळे मोठी दुर्घटना टळली. या घटनेनंतर परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.



मिळालेल्या माहितीनुसार, करंजाडे येथील एका गॅस दुरुस्ती दुकानातून धूर निघत असल्याचे स्थानिक नागरिकांच्या निदर्शनास आले. त्यानंतर तात्काळ अग्निशमन दलाला माहिती देण्यात आली. माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेत आग नियंत्रणात आणण्याचे काम सुरू केले. •> पान २ वर






# आंबेवाडी आरोग्य केंद्राचा श्वास कोंडतोय!

## ऑक्सिजनच्या तुटवड्यामुळे रुग्णांचे हाल

। कोलाड । प्रतिनिधी ।

मुंबई-गोवा महामार्गावरील महत्त्वाचे केंद्र मानल्या जाणाऱ्या आंबेवाडी प्राथमिक आरोग्य केंद्रात ऑक्सिजन सिलिंडरची गंभीर कमतरता निर्माण झाली असून, त्यामुळे श्वसनविकार आणि आपत्कालीन रुग्णांचे अतोनात हाल होत आहेत. तब्बल ७० ते ७१ गावांतील नागरिक उपचारासाठी या आरोग्य केंद्रावर अवलंबून असताना मूलभूत सुविधेचाच अभाव असल्याने परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

आंबेवाडी हे मध्यवर्ती ठिकाण असल्याने परिसरातील अनेक वाड्या-वस्त्यांमधील नागरिक उपचारासाठी येथे येत असतात. मात्र, प्राथमिक आरोग्य केंद्रात अद्याप पुरेशा प्रमाणात ऑक्सिजन सिलिंडर उपलब्ध नसल्याचे वास्तव समोर आले आहे. श्वास घेण्यास त्रास होणे, रक्तातील ऑक्सिजनची पातळी कमी होणे, दमा, निमोनिया, तसेच हृदयविकाराच्या झटक्यासारख्या गंभीर परिस्थितीत ऑक्सिजन सिलिंडर अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. अशा वेळी रुग्णांना तातडीने ऑक्सिजन पुरवठा न झाल्यास जीव धोक्यात येण्याची शक्यता असते.

विशेष म्हणजे, ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटरच्या तुलनेत सिलेंडर तातडीने वापरता येतात आणि त्यासाठी विजेची आवश्यकता नसते. त्यामुळे अपघात, प्रवास किंवा इतर आपत्कालीन परिस्थितीत ऑक्सिजन सिलिंडर अधिक उपयुक्त ठरतात. मात्र, आंबेवाडी परिसरात ही सुविधा उपलब्ध नसल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

मुंबई-गोवा महामार्गावर दररोज लहान-मोठे अपघात घडत असतात. अशा वेळी गंभीर जखमींना प्राथमिक उपचारांसोबत ऑक्सिजनची गरज भासते. मात्र, प्राथमिक आरोग्य केंद्रातच ही सुविधा नसल्याने रुग्णांना अन्य ठिकाणी हलवावे लागत असल्याचे सांगितले जात आहे.

> आंबेवाडी हे मुंबई-गोवा महामार्गावरील महत्त्वाचे केंद्र आहे. परिसरातील अनेक गावांतील नागरिक उपचारासाठी येथे येतात. याच मार्गावर वारंवार अपघात होतात. अशा वेळी ऑक्सिजन सिलिंडर ही अत्यावश्यक सुविधा आहे. दमा, श्वसनाचा त्रास, निमोनिया आणि हार्ट अटॅकसारख्या रुग्णांसाठी ऑक्सिजन महत्त्वाचा असतो. मात्र, परिसरात कुठेही ऑक्सिजन सिलिंडर उपलब्ध नसल्याने रुग्णांचे हाल होत आहेत. प्रशासनाने तातडीने ही सुविधा उपलब्ध करून द्यावी.
>
> – चंद्रकांत लोखंडे, सामाजिक कार्यकर्ते

# इंधन बचतीसाठी तहसीलदार खाडे सायकलवर

## म्हसळ्यातून दिला 'ग्रीन संदेश'

। म्हसळा । प्रतिनिधी ।



वाढती इंधनटंचाई, आंतरराष्ट्रीय युद्धजन्य परिस्थिती आणि पर्यावरणीय समतोलाचा प्रश्न गंभीर बनत असताना म्हसळा तहसीलदार सचिन खाडे यांनी स्वतः सायकलवरून कार्यालयात जात नागरिकांसमोर एक वेगळा आदर्श ठेवला आहे. पंतप्रधानांनी केलेल्या इंधन बचतीच्या आवाहनाला प्रतिसाद देत तहसीलदार सचिन खाडे यांनी निवासस्थानापासून तहसील कार्यालयापर्यंतचा प्रवास सायकलवरून करून 'इंधन बचतीचा संदेश' दिला.

गुरुवारी सकाळी तहसीलदार खाडे हे खासगी वाहनाऐवजी सायकलवरून कार्यालयात पोहोचले. त्यांचे अधिकारी, कर्मचारी तसेच नागरिकांनी स्वागत केले. साधेपणा आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाची शहरात चर्चा रंगली.

यावेळी बोलताना खाडे म्हणाले की, देशासमोर उभ्या असलेल्या इंधन संकटाचा विचार करता प्रत्येकाने छोट्या अंतरासाठी वाहनांचा वापर टाळणे गरजेचे आहे. ''इंधन बचतीची सुरुवात स्वतः पासून व्हायला हवी. सायकलचा वापर केल्यास इंधन वाचेल, पर्यावरणाचे संरक्षण होईल आणि आरोग्यही चांगले राहील,'' असे त्यांनी सांगितले.

> देशाच्या हितासाठी प्रत्येकाने इंधन बचतीचा संकल्प करायला हवा. छोट्या अंतरासाठी सायकलचा वापर ही काळाची गरज आहे.
>
> – सचिन खाडे, तहसीलदार, म्हसळा

खाडे यांनी आपल्या घरातील साधेपणाचाही उल्लेख केला. ''माझी आई आजही चुलीवर स्वयंपाक करते. गॅसचा अत्यंत कमी वापर करून एक सिलिंडर चार महिने पुरवते. बचतीची सवय प्रत्येकाने अंगीकारली पाहिजे,'' असे ते म्हणाले.

# अलिबाग-रोहा-तळा रस्ते कामांना वेग द्या

## पावसाळ्यापूर्वी कामे पूर्ण करण्याचे आदेश

। मुंबई । प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्यातील अलिबाग-रोहा-तळा या महत्त्वाच्या रस्ते प्रकल्पाच्या कामांना गती देऊन पावसाळ्यापूर्वी उर्वरित कामे पूर्ण करावीत, असे स्पष्ट निर्देश सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंगराजे भोसले यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. बुधवारी मंत्रालयात आयोजित आढावा बैठकीत त्यांनी कामांच्या प्रगतीचा सविस्तर आढावा घेतला.

रायगड हा राज्यातील प्रमुख पर्यटन जिल्हा मानला जातो. अलिबाग, रोहा, तळा तसेच परिसरातील पर्यटनस्थळांना दरवर्षी मोठ्या संख्येने पर्यटक भेट देत असतात. त्यामुळे या भागातील रस्ते अधिक सुरक्षित, सक्षम आणि सुस्थितीत असणे आवश्यक असल्याचे मंत्री भोसले यांनी नमूद केले. स्थानिक नागरिक आणि पर्यटकांची गैरसोय टाळण्यासाठी कामे युद्धपातळीवर पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

या बैठकीस खा. सुनील तटकरे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव शरद राजभोज, उपसचिव शैलेश बोरसे, कार्यकारी अभियंता मोनिका धायतडक, उपविभागीय अभियंता विजय बागुल, उपअभियंता दिनेश पराते यांच्यासह विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

अलिबाग-रोहा-तळा हा ८५.६० किलोमीटर लांबीचा महत्त्वपूर्ण रस्ता एचएएम पॅकेज-०१ अंतर्गत विकसित केला जात आहे. या प्रकल्पाला प्रशासकीय मान्यता मिळाली असून, सध्या सुमारे ६४ टक्के काम पूर्ण झाले आहे. उर्वरित कामे तातडीने पूर्ण करून प्रकल्प वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना मंत्री भोसले यांनी दिल्या.

बैठकीदरम्यान रस्त्याच्या प्रगतीबाबत सविस्तर सादरीकरण करण्यात आले. प्रकल्पातील प्रलंबित कामे, वाहतूक व्यवस्थापन आणि पावसाळ्यापूर्वी करावयाच्या उपाययोजनांवरही चर्चा झाली.

हा रस्ता पूर्ण झाल्यानंतर अलिबाग, रोहा आणि तळा परिसरातील दळणवळण अधिक गतिमान होणार असून पर्यटन, व्यापार आणि स्थानिक विकासाला मोठी चालना मिळणार असल्याचे बैठकीत नमूद करण्यात आले.

# नवनिर्वाचित सदस्यांना शपथ

मुंबई : विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी विधानपरिषदेच्या दहा जागांसाठी निवडून आलेल्या सर्व नवनिर्वाचित सदस्यांना सदस्यत्वाची शपथ दिली. गुरुवारी डॉ. नीलम गोऱ्हे, ओमप्रकाश ऊर्फ बच्चू बाबाराव कडू, अंबादास एकनाथराव दानवे, डॉ. प्रज्ञा राजीव सातव, प्रमोद शांताराम जठार, झीशान झिआउद्दीन सिध्दीकी, माधवी संजय नाईक, सुनिल विनायक कर्जतकर, विवेक बिपिनदादा कोल्हे आणि संजय नथ्थुजी भेंडे या दहा सदस्यांनी शपथ घेतली.

विधान भवनातील मध्यवर्ती सभागृहात हा शपथविधीचा कार्यक्रम पार पडला. यावेळी सभापती प्रा. राम शिंदे यांनी सर्व नवनिर्वाचित विधानपरिषद सदस्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

# खारपाडा टोलनाक्याविरोधात आज मनसेचे आंदोलन

**नवीन पनवेल :** खारपाडा टोलनाक्याविरोधात पनवेल मनसे १५ मे रोजी आंदोलन करणार आहे. केलेल्या मागण्या मान्य न झाल्यास तीव्र आंदोलन करण्यात येणार आहे. खारपाडा येथील टोल नाका सुरू होत असून या विरोधात मनसे मैदानात उतरले आहे. मनसेने टोल व्यवस्थापन आणि अधिकाऱ्यांना लेखी पत्र देत नागरिकांच्या तक्रारीची दखल घेण्याची मागणी केली आहे. टोलनाक्यांवर एमएस ४६ आणि एमएच ०६ तसेच इलेक्ट्रिक वाहनांना टोलमाफी लागू करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच स्थानिकांना रोजगार मिळावा अशीदेखील मागणी पत्रात करण्यात आली आहे.


## एच.पी. ग्राहकांना सुचना

अलिबाग तालुक्यामधील सर्व H.P. गॅस ग्राहकांना कळविण्यात येते की, हिंदुस्तान पेट्रोलियम कार्पो. लि. कंपनीच्या सुचनेनुसार - E-KYC(ई के. वाय. सी.) तसेच M.I. (मेंडेटरी इन्स्पेक्शन) गॅस जोडणी तपासणी करुन घेणे आपल्याला बंधनकारक आहे. तरी कृपया कोणाचे E-KYC तसेच M.I. करण्याचे पेंडींग राहिलेले असतील अशा एच. पी. गॅस ग्राहकांनी E-KYC तसेच M.I. त्वरीत करुन घेणे अत्यंत जरुरीचे आहे. आपण जर E-KYC व M.I. करुन घेतले नाहीत तर आपले गॅस कनेक्शन एच.पी. कंपनी कडून त्वरीत बंद करण्यात येईल. त्यामुळे आपल्याला रिफील गॅस सिलिंडर मिळणार नाही. तरी कृपया सर्व एच.पी. गॅस ग्राहकांनी याची नोंद घ्यावी.

संपर्क
**श्रीबाग सहकारी मध्यवर्ती ग्राहक मंडळ लि.**
**रायगड बाजार अलिबाग**
ऑफिस फोन नं. ०२१४१-२२४७७९
ऑफिस मो. नं. ७०८३०६९२७६
मॅकॅनिक मो. नं. ९८१९१३९६८३


## ग्रुप ग्रामपंचायत वडखळ, ता. पेण, जि. रायगड

### जाहीर नोटीस

जा.क्र.:- १७८६/२०२६ दिनांक :- १३/०५/२०२६

महाराष्ट्र ग्रामपंचायात कर व फी नियम १९६० नुसार १६ अ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे खालील मालमत्तेच्या हस्तांतरणासंबंधाने ग्रुप ग्रामपंचायत वडखळकडे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरण परत्वे अनुसूची २ व ३ मधील नोटिसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणाच्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह ग्रुप ग्रामपंचायत वडखळकडे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी अन्यथा करवसूलीच्या सोईसाठी सदर हस्तांतरण करुन ग्रामपंचायत दप्तरी याची नोंद घेतली जाईल.

| अ. क्र. | प्रभाग क्रमांक | मालमत्ता क्रमांक | मालमत्तेचे ठिकाण | मालमत्तेचे वर्णन | ज्यांचे नावे मालमत्ता आहे त्यांचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्याचे किंवा अभिहस्तांकन करणाऱ्याचे नाव | खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकन कर्त्यांचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | ४ | १४२ ई | वडखळ | आर.सी.सी. पक्के बांधकाम ३६X१० ३६X१० ३६X१० | दत्तात्रेय गणपत वडे आशा दत्तात्रेय वडे | भारती भगवान ठाकरे, रसिका रमेश जगे, प्रणाली प्रवीण अंबवणे |

सही/-
**श्रीहरी अनुराव खरात**
ग्रामपंचायत अधिकारी
ग्रुप ग्रामपंचायत वडखळ
ता. पेण, जि. रायगड

सही/-
**सौ. शिवानी विश्वास म्हात्रे**
ग्रुप ग्रामपंचायत वडखळ
ता. पेण, जि. रायगड

पान १ वरून

# कुरकुंडी-कोलटेंभी ग्रामपंचायतीचा संशयास्पद कारभार

दर्जाची असल्याचे समोर आले आहे. काही ठिकाणी कामे न करताच बनावट बिले, मोजमाप पुस्तके आणि नोंदी तयार करून शासनाची फसवणूक करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच लाभार्थी योजनांमध्ये अपात्र व्यक्तींना लाभ देणे, ग्रामसभा न घेता निर्णय घेणे, कामांची माहिती जाणीवपूर्वक लपविणे अशा गंभीर प्रकारांचाही उल्लेख तक्रारीत करण्यात आला आहे.या संपूर्ण प्रकारामुळे शासनाचे कोट्यवधी रुपये वाया गेले असून ग्रामस्थांचे मोठे नुकसान झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. संबंधित प्रकरणात ग्रामसेवक, सरपंच, संबंधित अधिकारी आणि ठेकेदार यांच्या भूमिकेची सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई करून झालेल्या आर्थिक नुकसानीची वसुली करण्यात यावी, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे.दरम्यान, या तक्रारीमुळे कुरकुंडी-कोलटेंभी ग्रामपंचायतीतील विकासकामांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, जिल्हा परिषद प्रशासनाकडून लवकरच चौकशी प्रक्रिया सुरू होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# करंजाडेतील गॅस दुरुस्ती दुकानाला आग

आग विझवित असताना दुकानामध्ये मोठ्या प्रमाणात गॅस सिलिंडर साठवून ठेवण्यात आल्याचे समोर आले. अग्निशमन दलाने खबरदारीचा उपाय म्हणून दुकानातून तब्बल २८ सिलिंडर जप्त केले. यामध्ये १० भरलेले गॅस सिलिंडर असल्याची माहिती समोर आली आहे.

दुकानात इतक्या मोठ्या प्रमाणात सिलिंडर साठवले गेल्याने स्थानिक नागरिकांमध्ये घबराट पसरली होती. विशेष म्हणजे, आग अधिक भडकून एखाद्या भरलेल्या सिलिंडरचा स्फोट झाला असता तर संपूर्ण इमारत आणि परिसर मोठ्या दुर्घटनेच्या विळख्यात सापडला असता, अशी शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे अग्निशमन दलाच्या वेळीच केलेल्या कारवाईमुळे मोठी जीवितहानी टळल्याची चर्चा परिसरात सुरू आहे.

घटनेनंतर पोलिसांनीही घटनास्थळी भेट देत पाहणी केली. दुकानात एवढ्या प्रमाणात सिलिंडर कशासाठी ठेवण्यात आले होते, त्यासाठी आवश्यक परवानगी होती का, तसेच सुरक्षेच्या नियमांचे पालन करण्यात आले होते का, याबाबत पोलीस आणि संबंधित विभागाकडून तपास सुरू करण्यात आला आहे.

दरम्यान, या घटनेमुळे निवासी भागामध्ये सुरू असलेल्या गॅस दुरुस्ती आणि सिलिंडर साठवणूक व्यवसायांबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, अशा ठिकाणांची तपासणी करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

या आगीत दुकान पूर्णपणे जळून खाक झाले असून, इमारतीचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नसल्याने नागरिकांनी सुटकेचा निःश्वास सोडला. दरम्यान, शॉर्ट सर्किटमुळे आग लागल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत असून, नेमके कारण शोधण्यासाठी तपास सुरू आहे. या कारवाईदरम्यान उपअग्निशमन अधिकारी शुभम राठोड, अतुल सपकाळ, पोलीस हवालदार अमृत कडव, इमारत मालक रंजना पाटील तसेच दुकान मालक संजयकुमार गुप्ता घटनास्थळी उपस्थित होते.

# दिखावा नको, सातत्य ठेवा

गेल्या चार वर्षांपासून माझ्या ताफ्यात फक्त तीन गाड्या आहेत, असे त्यांनी सांगितले.

राज्याचे मुख्यमंत्री मंत्रालयात दुचाकीवरून आल्याच्या घटनेवर बोलताना पवार म्हणाले, मुख्यमंत्री रोज बाईकवरून मंत्रालयात आले तर लोक त्याला गांभीर्याने घेतील. दरम्यान, नीट परीक्षा पेपरफुटीच्या मुद्द्यावरही त्यांनी सरकारवर टीका केली. याआधीही अशा घटना घडल्या होत्या. आवश्यक ती खबरदारी घेतली नसल्याने लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्यावर परिणाम झाला आहे, असेही पवार म्हणाले.

# हळदी समारंभात रक्तरंजित थरार

गावात सुरू असलेल्या हळदी कार्यक्रमाच्या निमित्ताने सर्वजण एकत्र आले होते. कार्यक्रमाला निमंत्रण न दिल्याच्या कारणावरून आरोपींनी मनात राग धरल्याचे समोर आले आहे. दारूच्या नशेत झालेल्या शाब्दिक वादानंतर आरोपींनी शिवीगाळ करत विनोद साळुंखे यांच्यावर कमरेला अडकवून ठेवलेल्या टोकदार लोखंडी सळईने हल्ला केला. त्यांच्या डाव्या कुशीवर आणि डाव्या हातावर वार करण्यात आल्याने ते गंभीर जखमी झाले. जखमींना प्रथम महाड ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी त्यांना मुंबई येथे हलविण्यात आले आहे.

याप्रकरणी दत्ता विलास मोरे यांच्या फिर्यादीवरून महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दोन्ही आरोपींविरोधात कारवाई सुरू केली असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक फडतरे करत आहेत. दरम्यान, मुख्य आरोपी दिलीप साळुंखे याच्याविरोधात यापूर्वीही मारहाण आणि गंभीर गुन्ह्यांची नोंद असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. या घटनेमुळे कुंभेशिवथर परिसरात खळबळ उडाली आहे.

## जाहीर नोटीस

दिनांक : १५ मे २०२६

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिध्द झाल्या पासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे-नालधे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हे.आर.पॉ. | रुपये | पैसे |
| आशिष रमेश चौधरी | ४३ | १०ड | ०-९७-० | ० | ४२ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

कार्यालयीन पत्ता :- मु.पो. कशेळे,
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,
ता.कर्जत, जि.रायगड. ४१०२०१

सही/-
**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
मो.नं.९१५८२७७७२८
दिनांक :-१५/०५/२०२६

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे थळ, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णनाचे मिळकत व त्यावर असणाऱ्या बांधकाम मिळकती मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| थळ ता.अलिबाग | २१४/३/क/१ | बागायत ०-१७-०० पो.ख.क्षेत्र ०-००-८० एकुण क्षेत्र ०-१७-८० | ६. १९ |

वर नमुद जमिन मिळकतीपैकी विद्यमान मालक यांचे नावे असलेले ०-०६-६० हे.आर.जमीन मिळकत आणि सदर मिळकतीवर असणाऱ्या गट ग्रामपंचायत थळ मालमत्ता क्र. १८३९ आणि मालमत्ता क्र. ५२५ या बांधकाम मिळकती सदर नोटीसीचा विषय आहे.

सदर वर नमुद मिळकत ही विद्यमान मालक केदार रामचंद्र साठे, यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, ती विकणेचा त्यांस पुर्ण कायदेशिर हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहार हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ (सात) दिवसाचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरुन आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वांस कळावे

ठिकाण - अलिबाग
दिनांक - १४/०५/२०२६
मोबा.नं. ९९२२७०७०१२

**ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
ऑफिस लक्ष्मी नारायण, पहिला मजला,
गाळा नं. ७ व ८, ब्राह्मणआळी,
राम मंदिर समोर, ता.अलिबाग,
जि.रायगड ४०२२०१


## Dr. N .Y. Tasgaonkar Institute of Medical Science

Sau. Vandana Tasgaonkar Health Care Complex, Kalyan Karjat Road, Opp. Bhivpuri Road Railway Station, Diksal
Post-Koshane, Tal-Karjat, Dist-Raigad, MH-410 201,
Mail ID -dean.rhrc@tasgaonkartech.com Webside-www.nytims.in
Fax No. 02224318823 Ph-9529089935/ 8983621211/8806753541

### WANTED

**A) Applications are invited for filling up the following posts in the above said College/ Institute**

| Sr. No. | SUBJECT | Professor | Reader | Lecturer | Tutor |
|---|---|---|---|---|---|
| 1 | ANATOMY | -- | -- | 1- OPEN, SC-1 | |
| 2 | PHYSIOLOGY | 1- OPEN | -- | 1- OPEN, SC-1 | |
| 3 | BIO-CHEMISTRY | -- | 1- OPEN | -- | |
| 4 | PHARMACOLOGY | -- | 1- OPEN | -- | |
| 5 | PATHOLOGY | -- | 1- OPEN | -- | |
| 6 | MICROBIOLOGY | -- | -- | SC-1 | |
| 7 | FORENSIC MEDICINE | 1- OPEN | 1- OPEN | -- | |
| 8 | Community Medicine/ Preventive & Social Medicine | 1- OPEN | 1-SC | 1- OPEN, SC-1, VJA-1 | |
| 9 | GENERAL MEDICINE | -- | OBC-1 | 2- OPEN, SC-1, VJA-1 | |
| 10 | PAEDIATRICS | -- | SC-1 | 1- OPEN, VJA-1 | |
| 11 | Skin & V.D. | 1-OPEN | 1-OPEN | -- | |
| 12 | PSYCHIATRY | -- | -- | 1- OPEN | |
| 13 | GENERAL SURGERY | -- | 1- OPEN | 2- OPEN, SC-1, VJA-1 | |
| 14 | ORTHOPAEDICS | -- | 1- OPEN | SC-1 | |
| 15 | OPTHALMOLOGY | 1-OPEN | -- | -- | |
| 16 | OTO-RHINO-LARYNGOLOGY (ENT) | -- | -- | -- | |
| 17 | OBSTETRICS & GYNAECOLOGY | -- | 1- OPEN | 1- OPEN | |
| 18 | ANAESTHESIA | -- | 1- OPEN | 1- OPEN | |
| 19 | RADIO-DIAGNOSIS | 1-OPEN | 1- OPEN | 1- OPEN | |
| Persons with Disabilities | | | | | |

Notes:
1. The post (s) marked # is / are additional post (s) other than staffing pattern.
2. *एक – उच्च न्यायालय (औरंगाबाद खंडपीठ) येथे दाखल केलेल्या याचिका क्र. 12051/2015 महाराष्ट्र ऑल बहुजन शिक्षक मंडळ विरुद्ध महाराष्ट्र राज्य व इतर मधील मा. उच्च न्यायालयाच्या अंतिम निकालास अधीन राहून बिंदुनामावलीची तपासणी करून देण्यात आलेली आहे. -*

B) **Qualification & Experience of Teacher in Medical Institution as per New NMC norms.**

C) **General Notes:-**

**1)** Horizontal Reservation for Ladies /sports etc as per the state government circular /regulations and the Persons with Disabilities Reservation as per the government regulations /circular issued from time to time. (Ref: Government letter GAD/1118/CR417/16 dated 28/12/2018, for handicapped GR dated 27/04/2011, 04/08/2011, 28/07/2014. and MEDD letter dated 30/06/2015.) The vertical reservation allotment vide Government Resolution and circular dated 29/05/2017,25/07/2018,05/12/2018,19/12/2018,07/01/2019,12/02/2019,16/02/2019,18/02/2019, 04/07/2019, 21/08/2019, 06/07/2021, 09/09/2021, 25/02/2022, 11/04/2022,27/02/2024,06/03/2024 & General Administration Department Maharashtra Government Letter Dtd. 11 March 2020.

**2)** Candidates applying for reserve category post(s) should submit caste certificate & caste validity certificate and also recent non-creamy layer certificate, wherever applicable.

**3)** The benefits of reservation shall be admissible to the backward class / category candidates who are domiciled in the state of Maharashtra only.

**4)** Age Limit & Educational Qualifications shall be considered up-to last date of the application & experience shall be considered up-to earlier day of the interview.

**5)** The decision taken by MUHS authorities regarding essential qualifications and experience shall be applicable, from time to time.

**6)** Pay Scale is as per rules.

**7)** Application along-with attested copies of all relevant Certificates must reach to the college on or before: 28/05/2026 .(Exact date is to be specified) (Minimum 14 days (as per Direction No. 01/2017) from the date of publication of advertisement in newspaper.)

D) **Other Notes : (College Level)**
Apply to the **Dean,** at **Dr. N.Y. Tasgaonkar Institute of Medical Science At-Diksal, Post-Koshane, Tal-Karjat, Dist- Raigad 410 201** on plain paper / prescribed format along with attested copies of certificates and experience certificates.

**Sd/-**
Dean
(Signature & College Seal)


## -: जाहीर नोटीस :-


मा. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील आदेश दि. ०७/०४/२०२६ रोजी निवडणूक निर्णय अधिकारी यांचे नावास मान्यता मिळालेली असल्यामुळे इको ग्रीन फेज-१ सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., बामणोली, ता. कर्जत, जि. रायगड या सहकारी गृहनिर्माण संस्थेचा सन २०२६-२०२७ ते २०३०-३१ या कालावधीकरिता निवडणूक कार्यक्रम दि. १५/०५/२०२६ रोजी संस्थेचे नोटीस बोर्ड व मा. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कर्जत तालुका, जि. रायगड यांचे कार्यालयात प्रसिद्ध करण्यांत आलेला आहे. नामनिर्देश अर्ज विक्री व स्विकृती तसेच नामनिर्देशन पत्राची छाननी व नामनिर्देशन पत्र मागे घेण्याचे ठिकाण हे मा. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कर्जत तालुका, जि. रायगड, पत्ता- कृषी उत्पन्न बाजार समिती, सहकार भवन, मार्केट यार्ड दहिवली तर्फे निड, कर्जत, जि. रायगड आहे.

| अ. क्र | संस्थेचे नांव | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे नांव व पद | नामनिर्देशन पत्रे वाटप व स्विकृती करण्यासाठी तारीख, वेळ | नामनिर्देशन पत्राची छाननी दिनांक | नामनिर्देशन पत्र मागे घेण्याचे दिवस | निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी व निशाणी वाटप दिनांक | मतदान दिनांक वेळ व स्थळ | मतमोजणी दिनांक वेळ व स्थळ व निकाल जाहिर दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | इको ग्रीन फेज-१ सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या... बामणोली, ता.कर्जत जि.रायगड | श्री. अंकुश शिंदे लेखापरीक्षक, श्रेणी-२ सहकारी संस्था, कर्जत | दि. १५/०५/२०२६ आणि दि.१८/०५/२०२६ ते २१/०५/२०२६ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० वाजेपर्यंत | दि. २२/०५/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता | दि. २३/०५/२०२६ ते दि.०६/०६/२०२६ रोजी सकाळी ११.०० ते ०२.०० वाजेपर्यंत | दि. ०७/०६/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता | दि. १४/०६/२०२६ रोजी सकाळी ०९.०० ते सायंकाळी ०४.०० वाजेपर्यंत. संस्थेच्या आवारात | दि.१४/०६/२०२६ रोजी मतदान संपल्यानंतर अर्ध्या तासाने मतमोजणी संपेपर्यंत व निकाल जाहीर मतमोजणी पूर्ण झालेनंतर लगेच |

सही/-
**(अंकुश शिंदे)**
**निवडणूक निर्णय अधिकारी**
**इको ग्रीन फेज-१ सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या..**
**बामणोली, ता. कर्जत, जि. रायगड**

सही/-
**(शिवाजी बा. घुले)**
**तालुका सहकारी निवडणूक अधिकारी**
**तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था**
**कर्जत तालुका, जि. रायगड**

## निवडक




### स्थानिक कामगारांचा प्रश्न ऐरणीवर

**चणेरा :** धाटाव औद्योगिक वसाहतीत पुन्हा एकदा कामगारांचा प्रश्न ऐरणीवर आला असून, युनिकेम कंपनीच्या धोरणांविरोधात स्थानिक भूमिपुत्रांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. कंपनीमध्ये गेली तीन ते पाच वर्षे प्रशिक्षणकालावधीत काम करणाऱ्या सुमारे १५ स्थानिक कामगारांना कायमस्वरूपी सेवेत न घेता थर्ड पार्टी कॉन्ट्रॅक्टवर काम करण्यास सांगितले जात असल्याचा आरोप करण्यात येत आहे. उदरनिर्वाहाच्या आशेने कंपनीच्या अटी मान्य करून कामावर रुजू झालेल्या कामगारांनी भविष्यात कायम नोकरी मिळेल, या अपेक्षेने कठीण परिस्थितीत काम सुरू ठेवले. मात्र, प्रशिक्षणाचा कालावधी पूर्ण होऊनही कायमस्वरूपी नियुक्ती न मिळाल्याने कामगारांमध्ये असंतोष वाढला आहे. याच पार्श्वभूमीवर स्थानिक ग्रामस्थ आणि भूमिपुत्रांनी कंपनीविरोधात कडक भूमिका घेत विरोध दर्शविला आहे. धाटाव एमआयडीसीमध्ये आधीच कामगार सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला असल्याची भावना व्यक्त केली जात आहे. जीव धोक्यात घालून रोजनदारीवर काम करणाऱ्या कामगारांना सुरक्षिततेसह नोकरीची हमीही मिळत नसल्याने संताप वाढत आहे. ''कामगार टिकला तर कारखाना टिकेल'' या भावनेतून कंपनी व्यवस्थापनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहावे, अशी मागणी स्थानिकांकडून केली जात आहे.

### सपनाची यूकेतील विद्यापीठात निवड



**माणगाव :** रोहा तालुक्यातील कोलाड-चिंचवली येथील कातकरी समाजातील विद्यार्थिनी सपना वाघमारे हिने प्रतिकूल परिस्थितीवर मात करत उच्च शिक्षणासाठी युनायटेड किंग्डममधील नामांकित विद्यापीठांमध्ये निवड मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. आदिवासी विकास विभागाच्या ग्लोबल स्कॉलरशिप प्रोग्रॅम अंतर्गत तिची लीड्स विद्यापीठात तसेच क्वीन मेरी यूनिवर्सिटी ऑफ लंडन येथे निवड झाली आहे. सपना वाघमारे ही आदिवासी विकास विभागाच्या अंतर्गत घोडेगाव येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाच्या अधिपत्याखालील हडपसर आदिवासी मुलींचे शासकीय वस्तीगृहात शिक्षण घेत होती. अत्यंत दुर्गम भागातून येणाऱ्या सपनाने आर्थिक अडचणी, प्रतिकूल परिस्थिती आणि सामाजिक आव्हाने यांवर मात करत हे यश मिळविले आहे. प्रकल्प अधिकारी प्रदीप देसाई आणि गृहपाल अर्चना पवार यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच त्यांच्या शैक्षणिक मार्गदर्शनामुळे सपनाने परदेशात उच्च शिक्षण घेण्याचा निर्धार केला आणि त्यात यश मिळविले आहे.

### मंत्र्यांच्या जिल्ह्यातच 'आशाताई'ची उपासमार

**चार महिन्यांपासून मानधन रखडले**

**पेण :** महागाईने सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले असताना, लहान बालकांचे संगोपन आणि महिलांच्या आरोग्याची जबाबदारी सांभाळणाऱ्या अंगणवाडी सेविकांनाच आता उपासमारीची वेळ आल्याचे चित्र रायगड जिल्ह्यात दिसत आहे. विशेष म्हणजे महाराष्ट्र राज्याच्या महिला व बालकल्याण मंत्री आदिती ताई तटकरे या स्वतः रायगडच्या असतानाही जिल्ह्यातील अंगणवाडी सेविका आणि मदतनीस गेल्या चार महिन्यांपासून मानधनाच्या प्रतीक्षेत असल्याने संताप व्यक्त केला जात आहे. लहान मुलांना पोषण आहार द्यायचा, गर्भवती महिलांची काळजी घ्यायची, शासनाच्या योजना घराघरात पोहोचवायच्या; परंतु, आमच्या घरातील चूल मात्र विझण्याच्या मार्गावर आहे, अशी हतबल भावना आशाताईंसह अनेक अंगणवाडी सेविकांनी व्यक्त केली. दरमहा मिळणाऱ्या अल्प मानधनावरच अनेक सेविकांचे संसार अवलंबून आहेत. मात्र, सलग चार महिने मानधन न मिळाल्याने घरभाडे, वीजबिल, मुलांचे शिक्षण, औषधोपचार आणि दैनंदिन खर्च भागवताना सेविकांची अक्षरशः दमछाक होत आहे. काहींवर कर्ज काढण्याची वेळ आली असून अनेक महिलांनी उसनवारीवर संसार सुरू ठेवला आहे. एकीकडे शासन महिला सक्षमीकरणाच्या घोषणा करत असताना दुसरीकडे महिलांच्याच श्रमाचा मोबदला वेळेवर मिळत नसल्याने प्रशासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. ज्यांच्या खांद्यावर बालविकास योजनेची जबाबदारी आहे, त्यांनाच आर्थिक विवंचनेत ढकलले जात असेल तर ही मोठी शोकांतिका आहे, अशा तीव्र प्रतिक्रिया आता उमटू लागल्या आहेत. जिल्ह्यातील अंगणवाडी सेविका, मदतनीस आणि आशाताई यांनी शासनाकडे तातडीने रखडलेले मानधन देण्याची मागणी केली असून, अन्यथा आंदोलनाचा इशाराही दिला आहे. आमच्या संयमाचा अंत पाहू नका, असा थेट इशारा सेविकांकडून देण्यात आला आहे.

# महापुरुषांच्या विचाराचा जागर

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचा पुढाकार

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

अलिबागमधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीच्या माध्यमातून विविध उपक्रम राबवून समाज प्रबोधनाचे काम केले जात आहे. त्याचाच भाग म्हणून महापुरुषांचे विचार तळागाळातील घटकांपर्यंत पोहचविण्यासाठी अलिबागमध्ये 'महापुरुषांच्या विचाराचा जागर' रविवारी (दि. १७) होणार आहे. स्मारक समितीच्या पुढाकाराने हा स्तुत्य उपक्रम अलिबागमधील पीएनपी नाट्यगृहामध्ये सकाळी १०.०० वाजल्यापासून सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत होणार आहे. यावेळी वेगवेगळ्या वक्त्यांच्या मार्गदर्शनासह डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर संगीतमय नाट्य सादर केले जाणार असल्याची माहिती समितीचे अध्यक्ष संजय जाधव यांनी दिली आहे. तसेच, महापुरुषांसह महामातांच्या जयंती महोत्सवाचे देखील आयोजन करण्यात आले आहे. याबाबत गुरुवारी (दि.१४) पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी समितीचे उपाध्यक्ष संतोष जाधव, सचिव उत्तम रसाळ, सहसचिव विजय गायकवाड, खजिनदार प्रदीप ओव्हाळ, अंजली गायकवाड, सविता ओव्हाळ, प्रफुल्ल कानिटकर, मंगेश कानिटकर, नितीन गायकवाड, चंद्रकांत गायकवाड, धरमदास डवले, पांडुरंग कदम, संतोष शिंदे, ॲड. विशाल जाधव, जयप्रकाश पवार, मिलिंद जाधव, प्रा. डॉ. पी.बी. आचार्य आणि इतर पदाधिकारी उपस्थित होते.



महापुरुषांच्या विचाराचा जागर हा कार्यक्रम रविवारी (दि.१७) सकाळपासून संध्याकाळपर्यंत होणारा असून, हा कार्यक्रम दोन सत्रामध्ये होणार आहे. पहिल्या सत्रामध्ये मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. त्यानंतर नारायण गायकवाड गुरुजी (सामाजिक क्षेत्र), नितीन राऊत (अंधश्रद्धा निर्मूलन क्षेत्र), ॲड. प्रसाद पाटील (शैक्षणिक क्षेत्र), सचिन कांबळे (कला व सांस्कृतिक क्षेत्र), गोपाळ कांबळे (पत्रकारिता क्षेत्र) आणि डॉ. राजेंद्र चांदोरकर (वैद्यकीय क्षेत्र) या कर्तृत्ववान व्यक्तींचा सन्मान समितीच्यावतीने केले जाणार आहे. त्यानंतर विचार प्रबोधनाचा कार्यक्रम होणार आहे. या निमित्ताने सामाजिक कार्यकर्त्या उल्का महाजन, कायद्याने वागा लोकचळवळीचे प्रणेते राज असारोंडकर, प्रा. डॉ. जयेश जाधव यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभणार आहे.

दुसऱ्या सत्रामध्ये दुपारनंतर प्रसिद्ध सिनेमा दिग्दर्शक आणि नृत्य दिग्दर्शक सचिन कांबळे आपल्या टीमबरोबर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर संगीतमय नाट्य सादर करणार आहेत. कार्यक्रमांच्या माध्यमातून समाज प्रबोधनाचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीच्यावतीने केले जाणार आहे. थोर महापुरुषांचे विचार आजच्या पिढीपर्यंत पोहचविण्याबरोबरच घराघरात ते विचार रुजविण्याचा प्रयत्न केला असल्याची माहिती संजय गायकवाड, उत्तम रसाळ आणि प्रा. डॉ. पी.बी. आचार्य यांनी दिली. या कार्यक्रमाला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहनही करण्यात आले.

## जिल्हाधिकारी यांच्याकडून दखल

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

कास्ट्राईब कर्मचारी महासंघाच्यावतीने मागासवर्गीय शासकीय कर्मचाऱ्यांच्या निवासासाठी जागा उपलब्ध करून देण्याबाबत रायगड जिल्हाधिकाऱ्यांकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात येत होता. या मागणीची सकारात्मक दखल घेत जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी जिल्ह्यातील सर्व तहसील कार्यालयांना तातडीने पत्र निर्गमित करून जागा उपलब्ध करून देण्याबाबत निर्देश दिले आहेत. प्रशासनाच्या या गतिमान निर्णयाबद्दल कास्ट्राईब कर्मचारी महासंघाच्यावतीने जिल्हाधिकाऱ्यांचे विशेष आभार मानण्यात आले. यावेळी महासंघाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष, महासचिव आणि प्रदेश कार्यकारिणीच्या सूचनेनुसार महासंघाचे जिल्हाध्यक्ष संजीव मोरे, कास्ट्राईब कर्मचारी महसूल जिल्हाध्यक्ष राहुल सूर्यवंशी आणि पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेतली.

# पीडब्ल्यूडी म्हणजे भ्रष्टाचाराचा अड्डा?

## विकासाच्या नावाखाली जनतेच्या जीवाशी खेळ

**| उरण | प्रतिनिधी |**

उरण तालुक्यात सार्वजनिक बांधकाम विभागाचा कारभार आता उघडपणे संशयाच्या भोवऱ्यात सापडला असून, विकासाच्या नावाखाली जनतेच्या पैशाची उघड लूट आणि नागरिकांच्या जीवाशी सुरू असलेला धोकादायक खेळ आता उरणकरांच्या संतापाचा विषय बनला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिकारी नरेश पवार यांच्या कार्यकाळात झालेल्या अनेक कामांवर गंभीर प्रश्नचिन्हे निर्माण झाले असून, कार्यालय आहे की भ्रष्टाचाराचे संरक्षित केंद्र? असा संतप्त सवाल आता नागरिक विचारू लागले आहेत.

### आर्थिक घोटाळ्याचे रॅकेट कार्यरत?

शासनाने मंजूर केलेला निधी नेमका कुठे खर्च झाला? कामे प्रत्यक्षात झाली का? निकृष्ट दर्जाच्या कामांसाठी कोण जबाबदार? याचा कोणताही स्पष्ट हिशोब उपलब्ध नसल्याने 'पीडब्ल्यूडी'मध्ये आर्थिक घोटाळ्यांचे रॅकेट कार्यरत आहे का? अशी चर्चा आता उघडपणे सुरू झाली आहे. त्यामुळे उद्या एखादी दुर्घटना घडून निष्पाप लोकांचा जीव गेला, तर त्याची जबाबदारी कोण घेणार? अधिकारी नरेश पवार की संपूर्ण प्रशासन, असा संतप्त सवाल नागरिक प्रशासनाला विचारत आहेत.

उरण तालुक्यात गेल्या काही वर्षांत कोट्यवधी रुपयांची विकासकामे करण्यात आली. रस्ते, गटारे, संरक्षण भिंती, शासकीय इमारती, दुरुस्तीची कामे अशा विविध कामांच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात निधी खर्च करण्यात आला. मात्र, प्रत्यक्षात अनेक कामांची अवस्था अत्यंत दयनीय बनली आहे. कोट्यवधी रुपये खर्च करून तयार करण्यात आलेले रस्ते काही महिन्यांतच उखडले गेलेत. अनेक ठिकाणी संरक्षण भिंतींना तडे गेले असून काही भागात बांधकामांचे लोखंडी सळे बाहेर आलेले दिसत आहेत. उरणमधील अनेक शासकीय इमारती आता अक्षरशः मृत्यूच्या उंबरठ्यावर उभ्या असल्याचे चित्र दिसत आहे. तरीदेखील त्या इमारतींमध्ये सरकारी कार्यालयांचा कारभार सुरूच असल्याने अधिकारी, कर्मचारी आणि सर्वसामान्य नागरिक रोज मृत्यूच्या सावलीत वावरत आहेत. सर्वात धक्कादायक बाब म्हणजे विभागातील अनेक कामांचे वर्षानुवर्षे ऑडिटच झाले नसल्याची माहिती एका वरिष्ठ अधिकाऱ्यांनीच दिली आहे.

## सोन्याची चेन पळवणारा गजाआड

**| पनवेल | प्रतिनिधी |**

करंजाडे येथील एका महिलेच्या ओळखीचा तरूण चेतन अरुण पिंगळे (२३) याने त्यांच्या घरात घुसून महिलेच्या गळ्यातील सोन्याची चेन कटरच्या सहाय्याने कापली. त्याने त्यांना धक्का मारुन खाली पाडले. त्यात त्या महिलेच्या गुडघ्याला दुखापत झाली असून, तरूणाने ती चेन हिसकावली आणि धमकी दिली. त्यानंतर दाराला बाहेरून कडी लावून त्याने तेथून पळ काढला. पनवेल शहर पोलीसांनी तांत्रिक तपासाच्या आधारे शोध घेऊन चेतन पिंगळेला गजाआड केले.

# लाईफ जॅकेटच्या डेमोची मागणी

- **जलवाहतूक करणाऱ्या प्रवाशांची सुरक्षा गरजेची**
- **सामाजिक कार्यकर्ते ज्ञानेश्वर फलेभाई यांनी उठवला आवाज**



**| कोर्लई | प्रतिनिधी |**

आगरदांडा ते दिघी जलवाहतूकीत आपत्ती काळात प्रवाशांच्या सुरक्षेसाठी वापरल्या जाणाऱ्या लाईफ जॅकेटचा डेमो घेण्यात यावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते ज्ञानेश्वर फलेभाई यांनी केली आहे. गेल्या अनेक वर्षांपासून आगरदांडा ते दिघी जलवाहतूकीत हजारो प्रवासी प्रवास करत असतात. या प्रवासादरम्यान आपत्ती काळात प्रवाशांच्या सुरक्षेसाठी लाईफ जॅकेट प्रत्येक प्रवाशासाठी आवश्यक आहे. यापूर्वी जबलपूर तसेच मुंबई येथे घडलेल्या दुर्घटनांमध्ये लाईफ जॅकेटच्या अभावामुळे पर्यटकांना जीव गमवावा लागल्याच्या घटना ताज्या आहेत. अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून सुरक्षेसाठी आगरदांडा ते दिघी जलवाहतूकीत प्रवाशांच्या सुरक्षेसाठी वापरल्या जाणाऱ्या लाईफ जॅकेटचा डेमो घेण्यात यावा, अशी मागणी ज्ञानेश्वर फलेभाई यांनी केली आहे.

# माथेरानकडे जाणाऱ्या पाण्याची चोरी

**| नेरळ | प्रतिनिधी |**

माथेरान या पर्यटनस्थळी नेरळ येथून जलवाहिनीमधून पाणी जात असते. दरम्यान, उल्हास नदी ते माथेरान या जलवाहिनीवरून पाण्याची चोरी होत असल्याचे उघड झाले आहे. त्या नळजोडण्या तत्काळ तोडण्यात याव्यात, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते जनार्दन पाटे यांच्यासह स्थानिक करू लागले आहेत. त्यामुळे पाणी चोरीवर रोख लावण्याची मागणी पुढे येत आहे.

कुंभे येथे उल्हास नदीमधून पाणी उचलले जाते. त्यानंतर ते पाणी अशुद्ध पाण्याच्या जलवाहिनीमधून जुम्मापट्टी येथून वॉटर पाईप आणि पुढे माथेरान असे जात असते. त्यासाठी तीन ठिकाणी पंप हाऊस बांधण्यात आले असून, त्यांच्या माध्यमातून पाण्याचा पुरवठा सुरळीत करण्याचा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या प्रयत्न असतो. त्यामुळे अशुद्ध पाण्याच्या जलवाहिनीमधून कोणालाही पाणी वाटप करता येत नाही. परंतु, उल्हास नदी ते माथेरान या मार्गात काही नळजोडण्या देण्यात आल्या असल्याचे समोर आले आहे. माथेरानमधील सामाजिक कार्यकर्ते जनार्दन पाटे यांच्या तक्रारीनुसार, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांच्या आशीर्वादाने काही नळजोडण्या या मुख्य जलवाहिनीवरून देण्यात आल्या आहेत. त्या जलवाहिनीमधून



बेकायदेशीर रित्या पाणी उचलले जात असून, त्यावर माथेरानमधून आता आवाज उठवला जात आहे. त्याचवेळी हे अनधिकृत नळजोडणी देणाऱ्या जीवन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली आहे.


माथेरान मधील शारलोट लेक आणि नेरळ येथून माथेरान करिता दर दिवशी पाणी उपसा होत आहे. मात्र, हा पाणी उपसा किती होतो, त्याची कोणतीही नोंद माथेरानमधील जीवन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांकडे नाही. तसेच कुंभे, जुम्मापट्टी आणि वॉटर पाईप येथील पंप हाऊसमध्ये वीजेचा वापर किती होतो, त्याची देखील कुठेही नोंद नाही. असा आरोप पाटे यांनी केला आहे. जीवन प्राधिकरण ही योजना राबवत असताना माथेरानमध्ये पर्यटन हंगाम असताना देखील या शहरात जीवन प्राधिकरणाचे शाखा अभियंता हे आठ-आठ दिवस माथेरानकडे फिरकत नाहीत. त्यामुळे या सर्व प्रकारची चौकशी राज्य सरकारने करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते जनार्दन पाटे यांनी केली आहे.

# व्यापारी संकुल विकण्याचा डाव उधळवला

## बांधकाम समितीच्या बैठकीत निविदा रद्द

**| नेरळ | प्रतिनिधी |**

नेरळ येथे जिल्हा परिषद आणि नगररचना विभागाने निर्माण केलेल्या नेरळ व्यापारी संकुलाचे गाळे विकण्याचा डाव जिल्हा परिषद सदस्य बाबू घारे यांनी उधळवून लावला आहे. ऑक्टोबर महिन्यात जिल्हा परिषदेने या संकुलातील १०४ गाळे विकण्यासाठी निविदा काढले होते. ही निविदा रद्द करण्यात यावे, यासाठी जिल्हा परिषदेच्या बांधकाम समितीच्या बैठकीत ठराव घेऊन ते टेंडर रद्द केले. दरम्यान, जिल्हा परिषद स्थानिकांना ते गाळे मिळावे यासाठी नव्याने प्रक्रिया राबविणार असून हा धोरणात्मक निर्णय जिल्हा परिषद आगामी



काळात घेणार आहे.

नेरळमधील टपरीधारकांसाठी जिल्हा परिषदेच्या नेरळ संकुल विकास प्राधिकरण यांनी व्यापारी संकुल बांधले होते. या संकुलाचे बांधकाम २०२२ मध्ये तत्कालिक रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष सुरेश टोकरे यांच्या अध्यक्षपदाच्या काळात पूर्ण झाले होते. कोविड नंतर जिल्हा परिषदेत सदस्य मंडळ नसल्याने मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून गाळ्यांचे वाटप केले जात नव्हते. नेरळ गावातील टपरीधारकांसाठी बांधलेले व्यापारी संकुल ऑक्टोबर २०२५ मध्ये निविदा काढून लाटण्याचा प्रयत्न सुरू होता. त्यावेळी जिल्हा परिषदेने व्यापारी संकुलातील १०४ गाळ्यांचे वाटप करण्यासाठी इ-निविदा काढली होती आणि या निविदा प्रक्रियेला कडाडून विरोध झाला. त्यावेळी, बाहेरच्या अनेक ठेकेदारांनी त्या १०४ गाळ्यांचे हक्क मिळावेत यासाठी ऑनलाइन अर्ज केले होते. याबाबत शिवसेना ठाकरे गटाचे गटनेते व जिल्हा परिषद बांधकाम समितीचे सदस्य बाबू घारे यांनी, दि.१२ मे रोजी अलिबाग येथे झालेल्या बांधकाम समितीच्या बैठकीत नेरळ व्यापारी संकुलाचा विषय उपस्थित केला. जिल्हा परिषद उपाध्यक्ष आणि बांधकाम समितीचे सभापती मधुकर पाटील यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली. या बैठकीत, जिल्हा परिषद सदस्यांचा अधिकार असताना नेरळ व्यापारी संकुलाचे गाळे देण्याची निविदा काढलीच कसे? असा धोरणात्मक निर्णय जिल्हा परिषदमध्ये लोकनियुक्त सदस्य मंडळ नसताना कसा होऊ शकते, असा प्रश्न उपस्थित केला. त्यानंतर एकमताने नेरळ व्यापारी संकुलातील १०४ गाळे विकण्यासाठी काढली निविदा रद्द करण्याचा ठराव एकमताने मंजूर झाला.

## स्थानकात निवृत्त सैनिकाला लुटले

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल रेल्वे स्थानकात सेवानिवृत्त सैनिकाला मारहाण करून लुटल्याची घटना घडली आहे. गंगाराम कदम (८४) असे निवृत्त सैनिकाचे नाव आहे. रात्री ते कणकवली येथे जाण्यासाठी पनवेल रेल्वे स्थानकात आले. भुयारी मार्गातून फलाटाकडे जात असताना भुयारात दोघांनी मदतीचा हात देत त्यांची बॅगही स्वत:कडे घेतली. त्यानंतर, त्यांनी कदम यांना मारहाण करून त्यांचा मोबाइल, रोकड, घड्याळ असा ऐवज लुटून पळ काढला. याबाबत पनवेल रेल्वे पोलिसांकडे तक्रार दाखल करण्यात आली आहे.

## वासांबे मोहोपाडा भारतात अव्वल | आत्मनिर्भर पंचायत विशेष पुरस्कार जाहीर

# राष्ट्रीय स्तरावर रायगडचा डंका

**| रसायनी | प्रतिनिधी |**

सरकारच्या पंचायतराज मंत्रालयामार्फत सन २०२४-२५ या वर्षासाठी देण्यात येणारा आत्मनिर्भर पंचायत विशेष पुरस्कार या गटात रायगड जिल्ह्यातील वासांबे ग्रामपंचायतीने देशात प्रथम क्रमांक पटकावला आहे. या पुरस्कारामुळे जिल्ह्याचा लौकीक राष्ट्रीय स्तरावर पुन्हा अधोरेखित झाला आहे.

देशभरातील हजारो ग्रामपंचायतींमध्ये झालेल्या स्पर्धेत वासांबे ग्रामपंचायतीने बाजी मारत रायगड जिल्ह्यासाठी ऐतिहासिक यश मिळवले आहे. हा पुरस्कार केवळ ग्रामपंचायतीचा सन्मान नसून गावपातळीवरील पारदर्शक



आणि जबाबदार प्रशासनाची राष्ट्रीय पातळीवर झालेली दखल मानली जात आहे. वासांबे विकासासाठी ग्रामपंचायतीने राबविलेल्या गाव विविध योजनांमध्ये ग्रामस्थांचा थेट सहभाग, पर्यावरणपूरक उपक्रम, मूलभूत सुविधांचा विकास, आर्थिक स्वावलंबन आणि प्रशासनातील पारदर्शकता यामुळे केंद्र सरकारने त्यांच्या कार्याची दखल घेतली. गावाच्या विकासात लोकसहभाग आणि जबाबदारी यांना प्राधान्य देत वासांबे ग्रामपंचायतीने आत्मनिर्भर गाव ही संकल्पना प्रत्यक्षात उतरवली आहे. आज राज्यातील अनेक ग्रामपंचायती अजूनही रस्ते, पाणी, गटारे, कचरा व्यवस्थापन आणि भ्रष्टाचाराच्या समस्यांमध्ये अडकलेल्या असून, वासांबे ग्रामपंचायतीने इच्छाशक्ती आणि प्रामाणिक कामाच्या बळावर गाव बदलू शकते, हे दाखवून दिले आहे. त्यामुळे आता वासांबे ग्रामपंचायतीचा आदर्श इतर ग्रामपंचायतींसमोर उभा राहिला आहे.

या पुरस्काराबद्दल जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, उपाध्यक्ष मधुकर पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसल, जि.प. ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी विशाल तनपुरे यांनी वासांबे ग्रामपंचायत प्रशासन, खालापूरचे गटविकास अधिकारी संदीप कराड यांचे अभिनंदन केले आहे. राष्ट्रीय स्तरावर आपल्या जिल्ह्यातील ग्रामपंचायत पुरस्कार मिळविते ही अतिशय अभिमानास्पद बाब आहे. आपल्या गावाचा विकास साधणे हे आपल्या सर्वांच्या हातात आहे. जिल्हा परिषदेचे सहकार्य कायमच यासाठी असणार असल्याचे जि.प. अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांनी सांगितले.

> **वासांबे ग्रामपंचायतीने राष्ट्रीय पुरस्कार मिळविल्याबद्दल त्यांचे अभिनंदन. स्वतःचे महसुलाचे स्त्रोत वाढवणे, या महसुलाचा वापर करून गावामध्ये विविध प्रकारची विकासकामे करण्यात आली आहेत. जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींनी अशाप्रकारची कामे करून गावाचा विकास साधावा.**
> **– नेहा भोसले, मुख्य कार्यकारी अधिकारी, राजिप**

# प्रवेश परिक्षेसाठी मोफत मार्गदर्शन

**| उरण | प्रतिनिधी |**

रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर महाविद्यालय फुंडे च्या पुढाकाराने व शोभा मेमोरियल फाउंडेशन तर्फे 'सुपर थर्टी' या उपक्रमांतर्गत बारावी सायन्स उत्तीर्ण मेडिकल आणि इंजीनियरिंग करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना नीट व जेईई परीक्षेसाठी वर्षभर मोफत मार्गदर्शन मिळणार आहे. हा उपक्रम फ्रेशभरात दहा ठिकाणी चालू आहे. या उपक्रमांतर्गत उरण तालुक्यातील विज्ञान शाखेच्या सर्व ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य व शिक्षकांची एक बैठक घेऊन उपक्रमाची माहिती दिली. त्यानंतर दि.२१ एप्रिल रोजी बारावी परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांनाही प्रकल्पाची माहिती दिली. बारावी उत्तीर्ण झालेल्या मेडिकल व इंजिनिअरिंग प्रवेशाचे स्वप्न पाहणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांचे स्वप्नपूर्ती करण्यासाठी शोभा मेमोरियल फाउंडेशन तर्फे सुपर थर्टी या उपक्रमांतर्गत वर्षभर निवासी मोफत प्रशिक्षण देण्यात येणार आहे. सुपर थर्टी साठी इच्छुक विद्यार्थी व त्यांचे पालक यांची बैठक दि.२० मे रोजी सकाळी साडेदहा वाजता वीर वाजेकर महाविद्यालयात आयोजित केलेली आहे. पालकांना या उपक्रमाची माहिती दिली जाईल व त्याच वेळेस विद्यार्थ्यांची निवड प्रक्रिया परीक्षा ही घेतली जाईल.

# सोने लुटणारे 'मोरू' कोण?

'सोने लुटुनी सायंकाळी मोरू परतुनी आला', अशी एक कविता जुन्या काळी प्रसिध्द होती. भाजपच्या मोरूंनी गेली दहा वर्षे भरपूर सोने लुटले किंवा खरेदी केले. त्याच्यातून नफे मिळवले. आणि आता सोने खरेदी करू नका असे मोदी सांगू लागले आहेत. आपण सांगून लोक ऐकतील की नाही याची खात्री नसल्याने मोदींनी सोने व चांदीच्या आयातीवरचे शुल्क सहा टक्क्यांवरून वाढवून थेट १५ टक्के केले आहे. सोने गेल्या सहा महिन्यांमध्ये आधीच प्रचंड महागले आहे. आता दीड लाख तोळा असलेले सोने आणखी महाग होईल. या देशाला पूर्वापार सोन्याचे वेड आहे. गरिबातल्या गरीब घरातही लग्नाच्या निमित्ताने सोने खरेदी केली जाते. मध्यम वर्गात सणासुदीला तेच घडते. पिढ्यान पिढ्या हे सोने जतन केले जाते. अगदीच दिवाळे निघाले किंवा प्राण कंठाशी आले तरच हे सोने विकले जाते. त्यामुळे आज भारतभरच्या कुटुंबांमध्ये सुमारे चार लाख कोटी डॉलर्स किंवा सुमारे साडेतीनशे लाख कोटी रुपये किमतीचे सोने आहे. भारताचे सकल राष्ट्रीय उत्पादन किंवा जीडीपी साधारण इतकाच आहे. म्हणजे आपल्या जीडीपीइतके सोने भारतभरातील लोकांकडे, देवळांकडे तसेच व्यापारी इत्यादींकडे आहे. पण भारतात सध्या जो सोन्याच्या आयातीचा कहर झाला आहे त्याला इथले सामान्य लोक जबाबदार नाहीत. शेअर्स किंवा जमिनींप्रमाणे सोन्यात गुंतवणूक करणारे अदानी किंवा अंबानींच्या श्रेणीतले भांडवलदार, व्यापारी कंपन्या, सोन्याशी जोडलेले एक्स्चेंज ट्रेडेड फंड चालवणाऱ्या नव्या कंपन्या असलेच लोक मुख्यतः सोन्याची खरेदी करीत असून त्यांच्यासाठी बहुमूल्य असे डॉलर्स खर्चून परदेशातून त्याची आयात केली जात आहे. भारतात सोन्याचे अजिबात उत्पादन होत नाही. आपल्या गरजेच्या म्हणजे बाजारातील व्यवहारांच्या ९० टक्के सोने आपण आयात करतो. एकट्या गेल्या वर्षात आपण ७२०० कोटी डॉलर्स म्हणजे सुमारे सत्तर हजार कोटी रुपये खर्च करून आपण सोन्याची आयात केली. ही खरेदी निव्वळ अनुत्पादक आहे. यातून पैसेवाले लोक नफा कमावतात. पण नवीन उत्पादन किंवा रोजगारनिर्मिती होत नाही.

### सट्टेबाजीचा परिणाम

गेल्या वर्षभरात युक्रेन आणि आखाती युध्दामुळे जगातील स्थिती अस्थिर झाली आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या एककल्ली व बेभरवशाच्या कारभारामुळे लोकांचा डॉलर्सवरचा विश्वासही उडाला आहे. त्यामुळे जगभरातल्या मध्यवर्ती बँका व सरकारे प्रचंड प्रमाणात सोन्याची खरेदी करीत आहे. सोन्यातील गुंतवणूक हीच त्यांना खात्रीची वाटते आहे. वस्तुतः सोन्याला स्वतःची अशी काही किंमत नाही. त्याचे उपयोगमूल्यही लोखंड किंवा इतर कोणत्याही धातूइतकेच किंवा त्याहूनही कमी आहे. पण लोकांच्या मनातली किंमत हेच त्याचे मूल्य आहे. आणि, लोकांनी कित्येक शतकांपासून सोने हे मौल्यवान असल्याचे ठरवून टाकले आहे. असो. पण यामुळे सध्या जगभरातच सोन्याचे भाव वाढले आहेत. त्याचा परिणाम म्हणून आपल्याला आयातीसाठी मोजावी लागणारी किंमत व डॉलर्सही वाढले आहेत. या वाढलेल्या आयातीमुळे आपल्या परकीय चलनाचा साठा झपाट्याने कमी होऊ लागला आहे. आपल्या एकूण आयातीमध्ये सोन्याच्या आयातीचे प्रमाण जवळपास दहा टक्के आहे. एका अनुत्पादक गोष्टीतला हा खर्च आपल्या गळ्याचा फास होऊ लागला आहे. मात्र त्याची जबाबदारी सामान्य किंवा गरीब कुटुंबांची नाही. तर ती बड्या कंपन्या व श्रीमंतांची आहे. गेल्या दहा वर्षात सोन्यावरचा नफा लुटलेल्या भाजपवाल्या मोरूंची आहे. मोदी मात्र आपल्या भाषणात सामान्य लोकांना सोने खरेदी बंद करायला सांगत आहेत. हे लोक पैसे उडवण्यासाठी सोने खरेदी करीत नसतात. तर आपल्या मुलीला लग्नात सोने देणे हा त्यांच्या परंपरेचा, रीतीभातीचा अत्यावश्यक भाग असतो. त्यांच्यापैकी बहुतेकांच्या घरात वाडवडिलांकडचे साठवलेले सोने असतेच. त्यात भर घालून ते नव्याने काही दागिने करत असतात. आईच्या गळ्यातल्या माळेतूनच मुलीसाठी दागिने बनवले जात असतात. मोदी या लोकांना देशभक्तीची साद घालून भावनेमध्ये अडकवू पाहत आहेत. पण सट्टेबाजांप्रमाणे सोन्याची बिस्किटे, लगडी किंवा अन्य स्वरुपात खरेदी करणाऱ्यांवर कर लावू किंवा त्यांच्याकडून अधिकची वसुली करू असे काहीही बोलत नाहीत. त्यांनी सट्टेबाजी बंद करावी असेही म्हणत नाहीत. विशेष म्हणजे या व्यापारी वर्गात त्यांना पाठिंबा देणारे गुजराती व मारवाडी भाषक मोठ्या प्रमाणात आहेत. पण मोदी त्यांना काहीही बोलत नाहीत.

### देशभक्तीचे आवाहन गरिबांनाच

आज सोन्यावरचे आयातशुल्क वाढवून परकीय चलनात कशी बचत होणार आहे याच्या बातम्या छापल्या जात आहेत. पण याच मोदी सरकारने दोनच वर्षांपूर्वी म्हणजे २०२४ मध्ये सोन्यावरचे आयातशुल्क १० टक्क्यांवरून कपात करून सहा टक्के केले होते. सोन्याची तस्करी रोखण्यासाठी हा मार्ग अवलंबला जात आहे असे स्पष्टीकरण त्यावर देण्यात आले होते. यामुळे सोने आयात करणे स्वस्त होईल व व्यापारी आणखी बेफाट खरेदी करू लागतील हे मोदीं सरकारला कळत नव्हते असे नाही. पण आपण जगातील पाचवी की सहावी अर्थव्यवस्था असल्याचा कैफ त्यांना चढला होता. शिवाय तीन-चार महिन्यांनी लोकसभेच्या निवडणुका होणार होत्या. आपल्या मोरू मंडळींना खूष करण्यासाठी सोन्याची आयात स्वस्त करणे हा उपाय त्यांना सोईचा वाटत होता. त्यामुळेच गेल्या दोन वर्षात बहुमूल्य असे डॉलर्सचे अब्जावधीचे चलन सोन्याच्या आयातीसाठी खर्ची पडले आहे. आता आखाती युध्दानंतर मोदी सरकारला जबरदस्त शॉक बसल्यावर त्यांची आर्थिक अक्कल जाग्यावर आली आहे. त्यातही गंमत पाहण्यासारखी आहे. आखातातले युध्द सुरू होऊन तीन महिने झाले. याचा देशावर भयंकर परिणाम होऊ शकतो असा इशारा विरोधी नेते तसेच पत्रकार इत्यादी वारंवार देत होते. पण नरेंद्र मोदी सरकार नेहमीप्रमाणेच स्वतःच्याच मस्तीत होते. विरोधकांनी काहीही म्हटले की त्यांना मोदीविरोधी आणि देशद्रोही ठरवणे इतकीच अक्कल भाजपवाल्यांना आहे. त्यानुसार यांनी संसदेतही या विषयावर चर्चा होऊ दिली नाही. मधल्या काळात पाच राज्यांच्या निवडणुका होऊन गेल्या. तिथे प्रचारात भाजपने प्रचंड खर्च केला. काल-परवा कोलकाता आणि गुवाहाटीमध्ये नव्या सरकारचे श्रीमंती थाटाचे शपथविधी झाले. त्यासाठी देशभरातून पन्नाससाठ खास चार्टर विमाने करून नेतेमंडळी आली. हे सगळे झाल्यावर मग मोदींना देशाच्या अर्थव्यवस्थेची आठवण झाली. आता काटकसर करूया असा संदेश त्यांनी जनतेला दिला. यांच्या मंत्र्यांनी आपल्या ताफ्यातल्या गाड्या कमी केल्या व त्याची जोरदार जाहिरात केली. पण मुळात गेली दहा वर्षे यांच्या ताफ्यात इतक्या गाड्या का होत्या असा सवाल यांना करायला हवा. मोदींच्या या काटकसरीच्या योजनेमध्ये सर्व अपेक्षा या गरीब व मध्यमवर्गीय जनतेकडून आहेत. ते स्वतः किंवा त्यांचे भक्त मोरू काय करणार हे त्यांच्याकडून वदवून आणि करवून घेण्याची वेळ आली आहे.

विचार

# डिजिटल मालमत्तेसाठी इच्छापत्र!

**डॉ. दीपक शिकारपूर**

*तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे व्यक्तीच्या मालमत्तेचे स्वरूप बदलले आहे. आज अनेक लोकांची मौल्यवान संपत्ती ही त्यांच्या संगणकीय साधनांमध्ये, नेटवर आधारित खात्यांमध्ये, चलनरहित व्यवहारांमध्ये आणि गुप्त संकेतांच्या माध्यमातून साठवलेल्या साधनांमध्ये असते. या डिजिटल मालमत्तेचे योग्य नियोजन आणि तिच्या उत्तराधिकाराचे व्यवस्थापन करणे अत्यंत आवश्यक झाले आहे. यासाठी इच्छापत्र तयार करणे हा सर्वात प्रभावी मार्ग आहे.*

आजच्या आधुनिक युगात माणसाचे आयुष्य केवळ भौतिक संपत्तीपुरते मर्यादित राहिलेले नाही. पूर्वी जमीन-जुमला, घर, दागिने, रोकड अशा स्वरूपातील मालमत्तेला महत्त्व होते; परंतु आता तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे व्यक्तीच्या मालमत्तेचे स्वरूप बदलले आहे. आज अनेक लोकांची मौल्यवान संपत्ती ही त्यांच्या संगणकीय साधनांमध्ये, नेटवर आधारित खात्यांमध्ये, चलनरहित व्यवहारांमध्ये आणि गुप्त संकेतांच्या माध्यमातून साठवलेल्या साधनांमध्ये असते. अशा प्रकारच्या संपत्तीला डिजिटल मालमत्ता म्हणतात. या डिजिटल मालमत्तेचे योग्य नियोजन आणि तिच्या उत्तराधिकाराचे व्यवस्थापन करणे अत्यंत आवश्यक झाले आहे. यासाठी इच्छापत्र तयार करणे हा सर्वात प्रभावी मार्ग आहे. डिजिटल मालमत्तेसाठीचे इच्छापत्र आणि पारंपरिक कायदेशीर इच्छापत्र यामध्ये काही महत्त्वाचे फरक आढळतात. पारंपरिक इच्छापत्रामध्ये प्रामुख्याने जमीन, घर, दागिने, रोख रक्कम यासारख्या भौतिक मालमत्तेचे वितरण कसे करायचे याचा उल्लेख असतो. या मालमत्तेचे स्वरूप स्थिर आणि स्पष्ट असल्यामुळे त्यांचे हस्तांतरण तुलनेने सोपे असते. परंतु डिजिटल मालमत्तेच्या इच्छापत्रामध्ये संपत्तीचे स्वरूप अमूर्त आणि तांत्रिक असते. यामध्ये विविध खाती, गुप्त संकेत, प्रवेश नियंत्रण आणि सुरक्षा प्रणाली यांचा समावेश असल्यामुळे त्याचे व्यवस्थापन अधिक जटिल ठरते. पारंपरिक इच्छापत्रामध्ये केवळ मालमत्तेचे वाटप नमूद करणे पुरेसे असते, तर डिजिटल इच्छापत्रामध्ये त्या मालमत्तेचा हक्क कसा मिळवायचा, कोणती माहिती जतन करायची किंवा हटवायची याबाबत सविस्तर सूचना देणे आवश्यक असते.

डिजिटल इच्छापत्रामध्ये गोपनीयतेला विशेष महत्त्व दिले जाते, कारण वैयक्तिक माहिती मोठ्या प्रमाणावर साठवलेली असते. याशिवाय, तांत्रिक बदल आणि विविध सेवांच्या नियमांमुळे डिजिटल इच्छापत्र वेळोवेळी अद्ययावत करणे गरजेचे असते. ते पारंपरिक इच्छापत्राच्या तुलनेत अधिक गतिमान स्वरूप दर्शवते. डिजिटल मालमत्तेमध्ये विविध प्रकार येतात. उदाहरणार्थ, सामाजिक माध्यमांवरील खाती, संदेश सेवा, ई-मेलसारखी पत्रव्यवहाराची साधने, चलनरहित गुंतवणूक साधने, चित्रे, लेखन, व्हिडिओ, संकेतशब्दांनी संरक्षित माहिती, तसेच ऑनलाइन व्यवसायाशी संबंधित साधने. अनेकदा ही मालमत्ता आर्थिकदृष्ट्या मौल्यवान असते, तर काही वेळा भावनिक दृष्टिकोनातूनही अत्यंत महत्त्वाची असते. व्यक्तीच्या निधनानंतर ही सर्व माहिती आणि साधने योग्य व्यक्तीकडे पोहोचावीत यासाठी इच्छापत्र आवश्यक ठरते. डिजिटल मालमत्तेसाठी इच्छापत्राचे महत्त्व अनेक अंगांनी स्पष्ट होते. प्रथम, व्यक्तीच्या निधनानंतर त्याच्या कुटुंबीयांना किंवा वारसांना त्या मालमत्तेची माहिती मिळवणे अत्यंत कठीण ठरू शकते. अनेक खात्यांना पासवर्ड दुहेरी सुरक्षा व्यवस्था, गुप्त संकेत इत्यादींची आवश्यकता असते. ही माहिती कोणालाही माहिती नसेल, तर त्या खात्यांमध्ये प्रवेश मिळवणे अशक्य होऊ शकते. अशा परिस्थितीत मौल्यवान माहिती कायमची हरवू शकते.

दुसरे म्हणजे, काही डिजिटल मालमत्तेचा आर्थिक उपयोग असतो. उदाहरणार्थ, चलनरहित गुंतवणूक, डिमॅट खाती (शेअर्स म्युच्यअल फंड्स इत्यादी) ऑनलाइन व्यवसाय, जाहिरातींमधून मिळणारे उत्पन्न, लेखन किंवा कलाकृतींचे मानधन. या साधनांचा योग्य वारसा ठरवला गेला नाही, तर त्या उत्पन्नाचा लाभ कुणालाही मिळणार नाही. त्यामुळे इच्छापत्रामध्ये या सर्व बाबींचा स्पष्ट उल्लेख असणे आवश्यक आहे. तिसरे महत्त्वाचे कारण म्हणजे गोपनीयता. व्यक्तीच्या आयुष्यातील वैयक्तिक माहिती मोठ्या प्रमाणावर डिजिटल स्वरूपात साठवलेली असते. त्यामध्ये खासगी संवाद, वैयक्तिक चित्रे, दस्तावेज इत्यादींचा समावेश होतो. या माहितीचे संरक्षण करणे आणि ती कोणाला द्यायची किंवा नष्ट करायची हे ठरवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. इच्छापत्राच्या माध्यमातून संबंधित व्यक्ती आपली गोपनीयता जपण्याची व्यवस्था करू शकते. चौथे म्हणजे, कायदेशीर गुंतागुंत टाळणे. डिजिटल मालमत्तेच्या बाबतीत स्पष्ट नियम नसल्यामुळे अनेक वेळा कुटुंबीयांमध्ये वाद निर्माण होऊ शकतात. इच्छापत्र असल्यास मालमत्तेचे वितरण स्पष्ट होते आणि वाद टाळता येतात. डिजिटल मालमत्तेसाठी इच्छापत्र तयार करताना काही महत्त्वाच्या गोष्टींची काळजी घेणे आवश्यक आहे.

सर्वप्रथम, आपल्या सर्व डिजिटल मालमत्तेची यादी तयार करणे आवश्यक आहे. यात कोणती खाती आहेत, त्यांचे स्वरूप काय आहे, त्यांचा उपयोग काय आहे याची सविस्तर माहिती लिहावी. ही यादी अद्ययावत ठेवणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

यानंतर प्रत्येक खात्यासाठी प्रवेशाची माहिती सुरक्षितपणे साठवणे आवश्यक आहे. संकेतशब्द, गुप्त प्रश्न, दुहेरी सुरक्षा व्यवस्था यांची माहिती सुरक्षित ठिकाणी ठेवावी. ही माहिती थेट इच्छापत्रामध्ये लिहिणे टाळावे, कारण इच्छापत्र सार्वजनिक होऊ शकते. त्याऐवजी स्वतंत्र सुरक्षित नोंद तयार करून ती विश्वासू व्यक्तीकडे द्यावी. तिसरे पाऊल म्हणजे वारसांची निवड. प्रत्येक डिजिटल मालमत्तेसाठी योग्य व्यक्तीची निवड करणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ, आर्थिक मालमत्ता कुटुंबातील जबाबदार सदस्याला द्यावी तर वैयक्तिक माहितीबाबत विश्वासू व्यक्तीची निवड करावी. काही वेळा वेगवेगळ्या मालमत्तेसाठी वेगवेगळे वारस नेमणे योग्य ठरते. चौथे म्हणजे, डिजिटल कार्यवाहक नेमणे. पारंपरिक इच्छापत्रासाठी कार्यवाहक नेमला जातो त्याप्रमाणेच डिजिटल मालमत्तेसाठीही एक जबाबदार व्यक्ती नेमावी. ही व्यक्ती इच्छापत्रानुसार सर्व प्रक्रिया पूर्ण करु शकेल. तिला तांत्रिक ज्ञान असणे आवश्यक आहे. पाचवे म्हणजे, स्पष्ट सूचना देणे. कोणती मालमत्ता जतन करायची, कोणती हटवायची, कोणती हस्तांतरित करायची याबाबत स्पष्ट निर्देश द्यावेत. यामुळे कार्यवाहकाला निर्णय घेणे सोपे होते. सहावे म्हणजे, कायदेशीर वैधता सुनिश्चित करणे. इच्छापत्र कायद्याने मान्य असणे आवश्यक आहे. त्यामुळे ते योग्य पद्धतीने तयार करणे, साक्षीदारांच्या उपस्थितीत स्वाक्षरी करणे इत्यादी प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे.

डिजिटल मालमत्तेच्या संदर्भात काही आव्हानेही आहेत. तंत्रज्ञान सतत बदलत असल्यामुळे आजची माहिती उद्या अप्रासंगिक होऊ शकते. त्यामुळे इच्छापत्र नियमितपणे अद्ययावत करणे आवश्यक आहे. तसेच विविध सेवांच्या नियमांमध्ये फरक असतो. काही सेवा मृत्यूनंतर खाते बंद करतात, तर काही ठिकाणी वारसांना ॲक्सेस दिला जातो. त्यामुळे या नियमांची माहिती ठेवणे आवश्यक आहे. याशिवाय, सुरक्षा ही मोठी चिंता आहे. संकेतशब्द आणि गुप्त माहिती चुकीच्या व्यक्तीच्या हाती लागल्यास गैरवापर होऊ शकतो. त्यामुळे सुरक्षित साठवण आणि मर्यादित प्रवेश यावर भर द्यावा. भावनिक दृष्टिकोनातून पाहिले तर डिजिटल मालमत्ता अनेक आठवणींचा साठा असते. छायाचित्रे, संदेश, व्हिडिओ हे सर्व कुटुंबासाठी अमूल्य ठेवा असतो. इच्छापत्राच्या माध्यमातून या आठवणी जतन करता येतात आणि पुढील पिढ्यांना देता येतात. भविष्यात डिजिटल मालमत्तेचे महत्त्व आणखी वाढणार आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, आभासी जग, चलनरहित अर्थव्यवस्था यामुळे व्यक्तीचे आयुष्य अधिकाधिक डिजिटल होत आहे. त्यामुळे इच्छापत्रामध्ये या बाबींचा समावेश करणे अपरिहार्य ठरणार आहे. शेवटी, डिजिटल मालमत्तेसाठी इच्छापत्र तयार करणे ही केवळ तांत्रिक बाब नसून ती जबाबदारीची जाणीव आहे. आयुष्यभर साठवलेल्या संपत्तीचे योग्य नियोजन करणे, कुटुंबाचे हित जपणे, गोपनीयतेचे संरक्षण करणे आणि भविष्यातील अडचणी टाळणे या सर्व गोष्टींसाठी इच्छापत्र अत्यंत उपयुक्त ठरते.

प्रत्येक व्यक्तीने आपल्या डिजिटल मालमत्तेचा विचार करून योग्य वेळी इच्छापत्र तयार करणे आवश्यक आहे. यातून केवळ संपत्तीचे संरक्षण होत नाही, तर आपल्या आठवणी, विचार आणि वारसा पुढील पिढ्यांपर्यंत सुरक्षितपणे पोहोचवता येतो. त्यामुळे डिजिटल युगात इच्छापत्राचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. अजून एक मुद्दा म्हणजे डिजिटल उपकरणे. डिजिटल साधनांमध्ये मोबाईल दूरध्वनी संच, संगणक, लॅपटॉप यासारख्या उपकरणांचा समावेश होतो. या साधनांमध्ये व्यक्तीची मोठ्या प्रमाणावर वैयक्तिक, आर्थिक आणि व्यावसायिक माहिती साठवलेली असते. छायाचित्रे, संपर्क क्रमांक, संदेश, लेखन, कागदपत्रे, तसेच विविध खात्यांमध्ये प्रवेशासाठी आवश्यक गुप्त संकेत ही सर्व माहिती या उपकरणांमध्ये सुरक्षित ठेवलेली असते. अनेक वेळा या साधनांमध्ये चलनरहित व्यवहारांचे पुरावे, करसंबंधित महत्त्वाची कागदपत्रे, बँक व्यवहारांची नोंद आणि व्यावसायिक प्रकल्पांची माहितीही साठवलेली असते. त्यामुळे या उपकरणांचा केवळ भौतिक ताबा नव्हे, तर त्यातील माहितीचा योग्य वापर आणि संरक्षणही तितकेच आवश्यक ठरते. इच्छापत्रामध्ये या उपकरणांचा स्पष्ट उल्लेख करून त्यांचे हस्तांतरण कोणाला करायचे, त्यातील माहिती कोण जतन करेल किंवा कोणती माहिती नष्ट करायची याबाबत सविस्तर सूचना दिल्यास भविष्यातील गोंधळ टाळता येतो. तसेच विश्वासू व्यक्तीकडे सुरक्षितरीत्या संकेतशब्दांची माहिती उपलब्ध करून दिल्यास वारसांना या साधनांचा उपयोग सुलभपणे करता येतो आणि मौल्यवान माहिती सुरक्षित राहते.

deepak@deepakshikarpur.com
(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

चर्चा आजची

# शेतीला संकटातून वाचवण्याचे आव्हान

**सुयोग आंग्रे**

कमकुवत मान्सून, एल निनोचा प्रभाव आणि पश्चिम आशियामध्ये सुरू असलेला तणाव यामुळे भारतीय कृषी क्षेत्रासाठी अडचणी आहेत, असे अभ्यासकांनी आपले म्हणणे जाहीर केले आहे. जागतिक बँकेच्या ताज्या अहवालात असेही म्हटले आहे की यावर्षीच्या कमकुवत मान्सूनमुळे भारतातील कृषी उत्पादन आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेवर दबाव वाढू शकतो. त्यामुळे महागाई वाढून विकास दरात घट होण्याची शक्यता आहे. भारतीय हवामान खात्यानेही एल निनोमुळे यंदा मान्सून सामान्यपेक्षा कमी राहण्याचा अंदाज वर्तवला आहे. हा अंदाज गेल्या २६ वर्षांतील मान्सूनचा सर्वात कमी प्रारंभिक अंदाज आहे. याचा परिणाम देशातील कृषी उत्पादन आणि अन्नधान्याच्या किमतीवर होऊ शकतो. देशातील ७५ टक्के पावसाच्या आधारे, मान्सून हंगामात (जून ते सप्टेंबर) ९४ टक्के पाऊस पडू शकतो. असा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

सामान्य पावसाळ्याच्या कमी वर्षांमध्ये, जेव्हा पावसाची वेळ, वितरण आणि प्रसार जवळजवळ सारखाच राहिला, तेव्हा खरीप उत्पादनात फारशी घट झाली नाही, परंतु बिगर सिंचन क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणावर पिकवल्या जाणाऱ्या कडधान्ये आणि तेलबिया यांसारख्या पिकांना धोका होता, असे आकडीवरीदर्शवते. डाळी आणि तेलबियांचे उत्पादन कमी झाल्यामुळे अन्नधान्य महागाईवर परिणाम होऊ शकतो. पश्चिम आशियातील संघर्षामुळे महागडी खते, महाग तेल आणि पुरवठा साखळी विस्कळीत झाल्यामुळे शेतीचा खर्च वाढला आहे, अशा वेळी कमकुवत मान्सूनचा केवळ शेतकरी आणि शेतीवरच नव्हे, तर सामान्य माणसावर आणि अर्थव्यवस्थेवरही विपरीत परिणाम होऊ शकतो. त्यामुळे पिण्याच्या पाण्याची समस्याही वाढू शकते. गेल्या वर्षीच्या पावसाळ्यात चांगला पाऊस झाल्यामुळे जलाशयांमध्ये पुरेसा पाणीसाठा होता, मात्र आता या वर्षी एल निनोचा धोका आणि कमकुवत मान्सूनमुळे पाणीसाठा लवकर संपुष्टात येणार असल्याने जलाशय कोरडा पडण्याची आणि शेतीसाठी पाण्याची कमतरता भासण्याची चिंता वाढली आहे. नीती आयोगानुसार, देशातील एकूण पीक क्षेत्रापैकी केवळ ५५ टक्के क्षेत्र सिंचनाखाली आहे आणि ४५ टक्के शेती मान्सूनवर अवलंबून आहे. सुमारे ७४ टक्के गहू आणि ६५ टक्के भातशेती क्षेत्र आधीच पाण्याचा ताण सहन करत आहेत. व्यावसायिक पिके आणि औद्योगिकीकरणाकडे वाढता कल यामुळे भारताचे मान्सूनच्या पावसावर अवलंबून राहण्याचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढले आहे. ही परिस्थिती देशातील सध्याच्या आरामदायी कृषी क्षेत्रासाठी एक नवीन आव्हान असल्याचे दिसते. यावर्षीचा सामान्य पाऊस आणि शेतीचा वाढता खर्च पाहता अनेक गोष्टींकडे लक्ष देणे गरजेचे आहे. जलसंधारणाचे प्रयत्न आतापासूनच सुरू झाले पाहिजेत.

देशाच्या विविध भागात वैविध्यपूर्ण हवामान आहे. देश कृषी दृष्ट्या अनुकूल हवामान क्षेत्रामध्ये समृद्ध आहे. त्यामुळे भारताने पीक वैविध्य आणि शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन पुढे जावे. देशातील धान्य, कडधान्ये आणि तेलबियांचे उत्पादन अजूनही हवामानावर अवलंबून आहे. अशा परिस्थितीत क्षेत्रनिहाय आणि पीकनिहाय परिस्थितीचा सर्वांगीण अभ्यास करून सिंचन पद्धतीचे नवीन धोरण तयार करावे. कमकुवत मान्सूनच्या अंदाजादरम्यान अन्न सुरक्षा सुनिश्चित करून आपण अन्न साठवणूक मजबूत केली पाहिजे. सन २०२५-२६ साठी खरीप अन्नधान्य उत्पादन १७.४१ कोटी टन आणि रब्बी अन्नधान्य उत्पादन १७.४५ कोटी टन असण्याचा अंदाज आहे. मागील वर्ष २०२४-२५ च्या तुलनेत ही मोठी झेप आहे. गतवर्षी खरिपाचे उत्पादन १६.९४ कोटी टन होते, ते यंदा सुमारे २.८ टक्क्यांनी वाढले आहे. गेल्या वर्षी रब्बी उत्पादन १६.९१ कोटी टन होते, त्यात यंदा ३.२ टक्के वाढ झाली आहे. भारतातील धान्याचे हे विक्रमी उत्पादन इराण-अमेरिकेतील युद्धादरम्यान संरक्षक कवच आहे. २००८ च्या जागतिक मंदीच्या काळातही भारताच्या अर्थव्यवस्थेवर अन्नधान्याच्या ताकदीमुळे कमी परिणाम झाला होता. सहा वर्षांपूर्वी कोविडविरुद्धच्या लढाईत देशातील अन्नधान्य देशासाठी मोठा आधार बनला होता.

सद्यस्थितीत धान्याची नासाडी टाळण्यासाठी ७०० लाख टन धान्य साठवणूक क्षमता विकसित करण्याची महत्त्वाकांक्षी योजना देशातील सहकार क्षेत्रात वेगाने पुढे नेली पाहिजे. कृषी क्षेत्रातही तंत्रज्ञान संस्कृतीला चालना देण्यावर आणि डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांच्या विकासावर भर द्यायला हवा. स्टोरेज ऑपरेशन्सचा विस्तार करण्यासाठी आणि कृषी-आर्थिक तंत्रज्ञान आणि पुरवठा साखळींमध्ये नावीन्य वाढवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. त्यामुळे शेतकरी आणि कृषी क्षेत्राला अडचणींपासून वाचवताना सर्वसामान्यांची आणि अर्थव्यवस्थेची चिंता कमी होऊ शकते.थोडक्यात सांगायचे एवढेच शेती आणि बळीराजाला संकटातून वाचविण्याचे आव्हान आपल्यासमोर असणार आहे.

हवामानाचा फटका शेतीला बसतो आहेच दुसरीकडे औद्योगिकरण आणि विकास नावाचे नवे वादळ शेतीवर आक्रमण करीत आहे. देशात सर्वच ठिकाणी हि परिस्थिती आहे. परंतु रायगड जिल्हा भातशेतीचे कोठार असल्याची नोंद आता पुसली जाण्याची भीती आहे. शेतीचे क्षेत्र कमी होऊन आता उद्योगांचे आणि रस्त्यांचे जाळे पसरवण्यावर सरकार धन्यता मानत आहे. यामुळे आता शेतीवर दुहेरी संकट ओढवत आहे. एकीकडे हवामानाचा फटका आणि दुसरीकडे विकासात्मक औद्योगिकरणाचा तडाखा यांना शेतकऱ्यांना सामोरे जावे लागत आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या तोंडी एकाच वाक्य ऐकावयास मिळत आहे.ते म्हणजे इडापिडा टळो आणि बळीचे राज्य येवो.

लोकसंसद

## राज्यातील भीषण पाणी टंचाईचे विदारक वास्तव

काही दिवसांपूर्वी राजस्थानच्या आयआयटी जोधपूर या उच्च शिक्षण देणाऱ्या शैक्षणिक संस्थेमधील विद्यार्थी पाणी भरण्यासाठी चक्क एका पाण्याच्या टँकरमागे धावत असल्याचा एक व्हिडिओ व्हायरल झाला होता. दुसरीकडे महाराष्ट्रातील ग्रामीण भागात अत्यंत कमी आणि दूषित पाणी असलेल्या खोल विहिरीतून पाणी भरण्यासाठी जीवघेणी धडपड करणाऱ्या महिलांचे मन हेलावणारे अनेक व्हिडिओ व्हायरल होत आहेत. देशातील आणि राज्यातील भीषण पाणी टंचाईचे विदारक वास्तव या वायरल व्हिडिओंमुळे समोर आले आहे. गेल्या मार्च महिन्यापासूनच महाराष्ट्रात पाणी टंचाईच्या तीव्र झळा बसू लागल्या असून सरकारी आकडेवारीनुसार राज्यात सध्याच्या घडीला ४११ गावे आणि १११४ वाड्यांना ४६६ हून अधिक टँकर्सद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. तीव्र पाणी टंचाईमुळे हताश झालेले गावा-खेड्याकडच्या महिला पिण्याच्या पाण्यासाठी दाही दिशांना वणवण भटकत आहेत आणि गावात टँकर येताच हंडे, कळशी घेऊन विहिरीवर प्रचंड गर्दी करत आहेत. ग्रामीण भाग पाणी टंचाईशी असा जीवघेणा संघर्ष करत असताना पुणे आणि मुंबईसारख्या शहरांमध्येही पाणी कपातीचे संकट घोंगावत आहे. धरणांमधील पाणीसाठा वेगाने खाली आल्यामुळे खबरदारीचा उपाय म्हणून मुंबई महानगरपालिकेने मुंबई आणि उपनगरांमध्ये १५ मे २०२६ पासून टक्के पाणी कपात लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. एकूणच राज्यातील नागरिकांना भीषण पाणी टंचाईला सामोरे जावे लागत आहे.

**- प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

दिनविशेष

# आंतरराष्ट्रीय कुटुंब दिन

संयुक्त राष्ट्रसंघाद्वारे दरवर्षी १५ मे रोजी जगभरात आंतरराष्ट्रीय कुटुंब दिन साजरा केला जातो. आजकालच्या जीवनात वाढत्या कामाच्या अभावी कुटुंबाला वेळ देणे, त्यांच्याशी संवाद साधणे, कुटुंबाबरोबर बाहेर फिरायला जाणे एवढेच काय तर एक वेळचं एकत्र जेवणंसुद्धा होत नाही. आंतरराष्ट्रीय कुटुंब दिनाच्या निमित्ताने याबाबतच जागरूकता निर्माण करण्यासाठी, कुटुंबाचे आपल्या मनातील स्थान टिकवून ठेवण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो.

जगभरातील अनेक प्रदेशांमधील बदलत्या सामाजिक आणि आर्थिक रचनांमुळे कुटुंबांच्या रचनेवर आणि स्थिरतेवर परिणाम झाला आहे व अजूनही होत आहे, याला प्रतिसाद म्हणून हा निर्णय घेण्यात आला. १५ मे रोजी साजरा होणारा आंतरराष्ट्रीय कुटुंब दिन हा जगभरातील कुटुंबे, लोक, समाज व संस्कृती यांचे महत्त्व साजरे करण्याचा एक प्रसंग आहे.आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर माणसाला कुटुंबाची गरज असते. कुटुंबाशिवाय जीवन अशक्य आहे. कुटुंब हेच आपल्याला समाजाशी जोडते. पुढे जाण्यासाठी प्रेरणा देते. अगदी वाईट काळातही आमच्यासोबत उभा राहतो. जीवनाच्या प्रत्येक वळणावर मानवांना कुटुंबाची आवश्यकता असते. बदलत्या काळानुसार नात्यांचे बंध थोडे कमकुवत होत चालले आहे. म्हणून कुटुंबाबद्दल, कुटुंबांशी संबंधित समस्यांबद्दल जागरूकता वाढविण्यासाठी आणि कुटुंबांवर प्रभाव निर्माण करणाऱ्या सामाजिक, आर्थिक बाबींचे ज्ञान वाढविण्यासाठी हा दिन साजरा केला जातो. त्याचप्रमाणे, कुटुंबाचे महत्त्व अबाधित ठेवण्यासाठी प्रत्येकाला कुटुंबाविषयी प्रेम, आदर वाढविण्यासाठी या दिनाचे महत्त्व आहे. कुटुंब आपल्याला सुरक्षिततेची भावना देते, कारण आपल्यासोबत असे कोणीतरी असते ज्यांच्यासोबत आपण आपल्या अडचणी वाटून घेऊ शकतो आणि आपले यश साजरे करू शकतो. यामध्ये एकमेकांना आदराने वागवणे आणि आपल्या कृतींची जबाबदारी घेणे यांचाही समावेश असतो.

यानिमित्त स्थानिक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरांवर विविध प्रकारचे कार्यक्रम आयोजित केले जातात. यामध्ये सार्वजनिक अधिकाऱ्यांसाठी कार्यशाळा, चर्चासत्रे आणि धोरण बैठका घेतल्या जातात. वार्षिक संकल्पनेबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी प्रदर्शने आणि चर्चा आयोजित केल्या जातात. मुलांसाठी, तरुणांसाठी शैक्षणिक सत्रे आणि कुटुंब व्यवस्था मजबूत व समर्थित करण्यासाठी सार्वजनिक धोरणांकरिता मोहिमांचा शुभारंभ यांचा समावेश होतो. काही देशांमध्ये, शालेय विद्यार्थी किंवा तरुण प्रौढ यांसारख्या लोकसंख्येच्या विशिष्ट गटाला लक्ष्य करून उत्सव आयोजित करण्यास लोकांना मदत करण्यासाठी साधनसंच (टूल किट्स) तयार केले जातात.

आंतरराष्ट्रीय कुटुंब दिन हा एक असा दिवस असतो जेव्हा आपण आपल्या जीवनात आणि समाजातील कुटुंबांचे महत्त्व ओळखतो. पारंपारिक आणि अपारंपारिक कुटुंबे जगभरातील समुदायांचा कणा कसा बनतात, यावर हा दिवस प्रकाश टाकतो. हे आज कुटुंबांना भेडसावणाऱ्या आर्थिक, सामाजिक आणि लोकसंख्याशास्त्रीय आव्हानांना समजून घेण्याबद्दल आणि संबोधित करण्याबद्दल आहे. प्रत्येक वर्षी, विशिष्ट थीम कौटुंबिक जीवनाच्या विशिष्ट पैलूंवर आणि त्यांच्या आव्हानांवर प्रकाश टाकते. या थीममध्ये गरिबी आणि बेघरपणापासून स्थलांतराचा प्रभाव, लैंगिक समानता आणि पारंपारिक आणि अपारंपारिक अशा सर्व प्रकारच्या कुटुंबांचा समावेश आहे. कुटुंबातील विविधता साजरी करणे आणि कुटुंब कसे असावे, यासाठी एकही मॉडेल नाही या कल्पनेला बळकटी देणे, हा यामागचा उद्देश आहे.

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१५ मे

१) श्री.मनोहर आत्माराम राऊत मु.नवगाव, अलिबाग, १५-५-१९४०
२) श्री.मधुकर पुरूषोत्तम किल्लेकर श्रीबाग-२, अलिबाग १५-५-१९५१
३)श्रीम.राजश्री बळीराम पाटील अलिबाग दि.१५-५-१९५२
४)श्री.शंकर रामा मोर्ले कोळीवाडा, अलिबाग दि.१५-५-१९५२


## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)

- मुख्य संपादक, कृषीवल

आजचे अन्नदाते



स्व. कलावती भवानजी देढिया स्मरणार्थ
महावीर ट्रेडर्स बाजार पेठ अलिबाग


# दूषित पाण्यामुळे मीठ व्यवसायाला घरघर

## ●पारंपरिक व्यवसाय मोठ्या संकटात ● मिठागरे उध्वस्त होण्याच्या मार्गावर

| विरार | प्रतिनिधी |

एके काळी मीरा भाईंदर ते डहाणूपर्यंतच्या परिसरात मिठागराचा मुख्य व्यवसाय होता. या मिठागरात मिळणाऱ्या पैशावर आठ महिने येथील लोकांना रोजगार मिळत होता. तर उरलेले चार महिने भात शेतीवर निभावून जात असत. परंतु, काळ बदलत गेला आणि बाजारात वेगवेगळ्या प्रकारची मीठ आल्याने मिठागरात पिकवलेल्या मिठाची मागणी कमी झाली. हाच पारंपरिक मीठ व्यवसाय सध्या मोठ्या संकटात सापडला असून खाडीत मिसळणाऱ्या दूषित सांडपाण्यामुळे मिठागरांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. एकेकाळी मोठ्या प्रमाणात मीठ उत्पादनासाठी प्रसिद्ध असलेल्या या भागातील मिठागरे आता ओस पडू लागली आहेत. मागील दोन ते



चार वर्षांपासून खाडीच्या पाण्यात वाढलेल्या प्रदूषणामुळे मीठ उत्पादनावर गंभीर परिणाम झाला असून अनेक उत्पादकांनी व्यवसाय बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे या पारंपरिक उद्योगावर उपजीविका अवलंबून असलेल्या कुटुंबांसमोर आर्थिक संकट उभे ठाकले आहे. पूर्वी नायगाव पूर्वेतील अनेक मिठागरे लीजवर घेऊन त्यामध्ये मोठ्या प्रमाणात मीठ पिकवले जात होते. येथे तयार होणाऱ्या मिठाला इतर राज्यांमध्येही मोठी मागणी होती. मात्र, सध्या परिस्थिती पूर्णपणे बदलली असून दूषित पाण्यामुळे मिठाची गुणवत्ता खालावल्याची तक्रार उत्पादकांकडून करण्यात येत आहे. परिणामी अनेक मिठागरांमध्ये उत्पादन बंद झाले असून सध्या बोटावर मोजण्याइतकेच उत्पादक मीठ पिकवत असल्याचे चित्र आहे. वाढते प्रदूषण, घटते उत्पादन आणि आर्थिक नुकसान यामुळे पारंपरिक मीठ व्यवसाय हळूहळू संपुष्टात येण्याच्या मार्गावर असल्याची चिंता व्यक्त होत आहे.

मिठागराच्या परिसरातील सांडपाणी थेट खाडीत सोडले जात असल्याने पाण्याची गुणवत्ता दिवसेंदिवस खालावत आहे. याचा थेट परिणाम मिठागरांवर होत असून भविष्यात ही मिठागरे पूर्णपणे उध्वस्त होण्याची भीती नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. प्रशासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन खाडीत मिसळणारे दूषित सांडपाणी रोखावे, तसेच मिठागरांचे संरक्षण करण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी मीठ उत्पादकांकडून करण्यात येत आहे.

### गुणवत्तेवर परिणाम

मिठागराच्या परिसरातील सांडपाणी थेट खाडीत सोडले जात असल्याने पाण्याची गुणवत्ता दिवसेंदिवस खालावत आहे. याचा थेट परिणाम मिठागरांवर होत असून, भविष्यात मिठागरे उध्वस्त होण्याची भीती आहे.

# ११० हेक्टर जमीन अतिक्रमणमुक्त

**●सिडकोची मोठी कारवाई दोन वर्षांत**

**● हटवली ५,८०४ अनधिकृत बांधकामे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून उधळपट्टी**

| नवी मुंबई | प्रतिनिधी |

नवी मुंबईच्या नियोजित आणि जागतिक दर्जाच्या विकासासाठी सिडकोने अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांविरोधात व्यापक मोहीम राबवत गेल्या दोन वर्षांत ११० हेक्टर क्षेत्रावरील ५,८०४ अतिक्रमणे निष्कासित केली आहेत. अतिक्रमणमुक्त झालेली ही जमीन एरोसिटी, मेडिसिटी, एज्युकेशन सिटी, लॉजिस्टिक पार्क, एंटरटेनमेंट अरेना, मेट्रो तसेच नैना क्षेत्रातील विविध महत्त्वाकांक्षी प्रकल्पांसाठी उपयोगात आणली जाणार आहे.

सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी सांगितले की, सार्वजनिक जमिनींचे संरक्षण आणि नवी मुंबईचा जागतिक दर्जाच्या नियोजित शहर म्हणून विकास करण्यासाठी सिडको कटिबद्ध आहे. अनधिकृत बांधकामांविरोधातील ही कारवाई सिडकोची ठाम भूमिका दर्शवणारी असून, अतिक्रमणमुक्त झालेली जमीन भविष्यातील विकासासाठी अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. तसेच अशा मोहिमा पुढेही अधिक तीव्रतेने राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सिडको हे नवी मुंबई क्षेत्राचे नियोजन प्राधिकरण असून शहराचा सुनियोजित विकास करण्यासाठी सातत्याने कार्यरत आहे. सिडकोच्या मालकीच्या जमिनींवरील वाढती अनधिकृत बांधकामे आणि अतिक्रमणे ही विकास प्रक्रियेसाठी मोठा अडथळा ठरत होती. यामुळे शहराचे विद्रुपीकरण होत असल्याने सिडकोकडून शासन निर्णय, न्यायालयीन निर्देश आणि एमआरटीपी अधिनियमातील तरतुदींनुसार सातत्याने निष्कासन कारवाई करण्यात येत आहे. संबंधित बांधकामधारकांना नोटिसा बजावून जनजागृतीसाठी वृत्तपत्रांमधूनही सूचना प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत.

सध्या नवी मुंबई परिसरात एरोसिटी, इंटरनॅशनल कॉर्पोरेट पार्क, मेडिसिटी, लॉजिस्टिक पार्क, एंटरटेनमेंट अरेना, मेट्रो तसेच नैना क्षेत्रातील विविध पायाभूत प्रकल्पांची कामे प्रगतिपथावर आहेत. प्रकल्पांसाठी राखीव जमिनींवरील अतिक्रमणे हटविण्यावर विशेष भर देण्यात येत असून, त्यामुळे प्रकल्पांची अंमलबजावणी नियोजित वेळेत होण्यास मदत होत आहे.

अतिक्रमणमुक्त करण्यात आलेल्या जमिनींवर पुन:अतिक्रमण होऊ नये यासाठी संरक्षक कुंपण उभारण्यात येत आहे. काही ठिकाणी जमिनींचा त्वरित वापर लिलाव प्रक्रिया देखील सुरू करण्यात आली आहे. खारघर-तुर्भे लिंक रोड प्रकल्पातील अडथळा ठरणाऱ्या झोपड्यांचे समन्वयाने निष्कासन करण्यात आले आहे.

# मतदार याद्यांच्या पुनरीक्षणासाठी आढावा बैठक

| पनवेल | प्रतिनिधी |

मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) कार्यक्रमाच्या पूर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी सोमवारी (दि. ११) पालिका मुख्यालयात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मतदार याद्या अधिक अचूक, पारदर्शक आणि दोषमुक्त करण्यासाठी या बैठकीत विविध मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

या बैठकीस महापालिकेचे वरिष्ठ अधिकारी, लोकप्रतिनिधी आणि विविध विभागांचे पदाधिकारी तसेच, प्रकाश



बिनेदार, बबन मुकादम, रवींद्र भगत, सुमित झुंझारराव, अजय बहिरा, शशिकांत शेळके, प्रीती जॉर्ज, अस्मिता घरत, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटये, मयुरेश नेतकर, आनंद ढवळे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

बैठकी दरम्यान मतदार याद्यांचे अद्ययावतीकरण, पुनर्पडताळणी आणि पारदर्शकता सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक उपाययोजनांची आखणी करण्यात आली.

मतदार यादीतील अवैध नोंदी रोखणे, मृत व्यक्तींची नावे वगळणे, स्थलांतरित नागरिकांची माहिती अद्ययावत करणे तसेच पात्र नागरिकांची नोंदणी सुनिश्चित करणे यावर भर देण्यात आला. यासोबतच मागील काही काळात महापालिका हद्दीत वितरित केलेल्या जन्म आणि मृत्यू दाखल्यांच्या अनुषंगानेही चर्चा करण्यात आली. संबंधित नोंदींचा वापर मतदार यादी शुद्धीकरण प्रक्रियेत कसा प्रभावीपणे करता येईल, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

# ‘बालिका पंचायत’ सुरु करा

| मुंबई | प्रतिनिधी |

राज्याला बालविवाहमुक्त करण्याच्या उद्देशाने बालिकांमध्ये जागरूकता, नेतृत्वगुण आणि सामाजिक सहभाग वाढविण्यासाठी नांदेड जिल्ह्यात यशस्वीपणे राबविण्यात येत असलेल्या बालिका पंचायत उपक्रमाच्या धर्तीवर राज्यभर बालिका पंचायत सुरू करण्यात याव्यात, असे निर्देश महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिले. तसेच राज्यातील एकल महिलांसाठी प्रभावी आणि सर्वसमावेशक धोरण तयार करण्यासाठी विविध राज्यांमधील धोरणांचा अभ्यास करून मसुदा समिती स्थापन करण्याच्या सूचनाही त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

महिला व बाल विकास विभागाच्या विविध योजना, बालिका पंचायत उपक्रम, एकल महिला धोरण तसेच बाल संरक्षणाशी संबंधित विविध विषयांचा आढावा घेण्यासाठी मंत्रालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीस महिला व बालविकास आयुक्त माधवी सरदेशमुख, बोंडवे, प्रसाद कुलकर्णी, वर्षा पवार, सामाजिक कार्यकर्ते यांच्यासह विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. मागील सात वर्षांत राज्यात तब्बल ६ हजार ३२३ बालविवाह रोखण्यात यश आले असून ही मोहीम अधिक व्यापक आणि लोकसहभागातून राबविण्याची आवश्यकता आहे.

# खारघरमध्ये रविवारी आध्यात्मिक सोहळा

**खारघर :** विहंगम योग संस्थानातर्फे रविवार (दि. १७) सेक्टर २९ येथील गावदेवी मंदिराजवळ आध्यात्मिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या मंडप उभारणीचे भूमिपूजन वाराणसीहून आलेल्या बटूंनी वैदिक मंत्रोच्चारात केले. सोहळ्यात १००१ कुंडीय वैदिक हवन-यज्ञ होणार असून, संतप्रवर विज्ञानदेव व सद्गुरू स्वतंत्रदेव महाराज मार्गदर्शन करणार आहेत. किशनलाल शर्मा, योगेश पाटील, बजरंगलाल बजारी, प्रवीण पाटील, ज्ञानेश्वर खरपुरिया, मधु पाटील, ब्रिजेश पटेल, शिवम सिंह, संजय शर्मा उपस्थित होते. कार्यक्रम नि:शुल्क असल्याचे सांगण्यात आले आहे.

# ‘समाज एकत्र येणे काळाची गरज’

**रोहा :** नामदेव शिंपी समाजाने एकत्र येऊन सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक प्रश्न सोडवणे आवश्यक असल्याचे मत जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम मुळे यांनी व्यक्त केले. रोहे येथे झालेल्या वार्षिक सभेत ते बोलत होते. विविध भागांतील समाजबांधव कार्यक्रम, सभा व विवाहसोहळ्यांतून एकत्र येतात, असे त्यांनी सांगितले. सभेत शिक्षण, आरोग्य, रोजगार आदी विषयांवर चर्चा झाली. कार्यक्रमास दत्तात्रय पांढरकामे, अरुण करंबे, प्रेषित बारटक्के, हेमंत बारटक्के यांच्यासह अनेक पदाधिकारी व समाजबांधव उपस्थित होते.

# खारघरमध्ये दुर्गंधीयुक्त पाणीपुरवठा

**●आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर**

**● नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण**

| खारघर | प्रतिनिधी |

खारघर सेक्टर १० या परिसरात मागील दोन दिवसांपासून दूषित आणि दुर्गंधीयुक्त पाणीपुरवठा होत आहे. यामुळे नागरिकांमध्ये आरोग्याचे प्रश्न उद्भवण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. या प्रकारावर सिडको प्रशासनाविरोधात नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.

खारघर परिसरात गेल्या काही दिवसांपासून कमी दाबाने पाणीपुरवठा होत आहे. अशातच, दोन दिवसांपासून दूषित आणि दुर्गंधीयुक्त पाणीपुरवठा होत असल्याने आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. दूषित पाण्यामुळे साथीचे आजार पसरण्याची भीती असून, नागरिकांमध्ये मोठी चिंता निर्माण झाली आहे. रहिवासी मधुकर मयेकर म्हणाले की,



सिडकोकडून दूषित पाणीपुरवठा होत असून, पाण्याला तीव्र वास येत आहे. यामुळे पाणी विकत घेऊन प्यावे लागत आहे, तर काही ठिकाणी जलवाहिन्यांमध्ये गळती होत असल्याने सांडपाणी मिसळत असल्याचा संशयदेखील काही नागरिकांनी व्यक्त केला आहे. प्रशासनाने तातडीने पाण्याची तपासणी करून स्वच्छ पाणीपुरवठा सुरू करावा, अशी मागणी रहिवाशांनी केली आहे.

### पाण्याचे कॅन विकत घेण्याची वेळ

अनेक कुटुंबांना पिण्याच्या पाण्यासाठी बाजारातून पाण्याचे कॅन विकत घ्यावे लागत असून, आर्थिक भारही वाढला आहे. सिडको प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन दूषित पाणीपुरवठ्याची समस्या सोडवावी, अशी मागणी परिसरातून होत आहे. यासंदर्भात सिडकोच्या पाणीपुरवठा विभागात विचारणा केली असता, नागरिकांच्या तक्रारी प्राप्त झाले असून, ही समस्या दूर करण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे सांगितले.

# बालगृहातील ७१५ बालके दहावीत उत्तीर्ण

| मुंबई | प्रतिनिधी |

प्रतिकूल परिस्थितीवर मात करत बालगृहातील ७१५ विद्यार्थ्यांनी दहावीत यश संपादन करत सकारात्मक जीवनाचा मार्ग अवलंबिला आहे. महिला व बालविकास विभागांतर्गत कार्यरत असलेल्या विविध बालगृहातील एकूण ७१५ विद्यार्थ्यांनी दहावीत यश संपादित केले असून मंत्री आदिती तटकरे यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. त्या म्हणाल्या की, विद्यार्थ्यांच्या पुढील शिक्षणासाठी शासनाकडून आवश्यक ते सहकार्य करण्यात येईल. तसेच बालगृहांत शैक्षणिक सुविधा, आणि समुपदेशन उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात येत आहेत. बालगृहातील या मुलांचे ऑनलाईन सेशन घेण्यात आले, तसेच त्यांचा सराव घेण्यात आला. शिक्षकांचे विशेष वर्ग या दहावीच्या मुलांसाठी आयोजित करण्यात आले होते. पुणे जिल्ह्यात सर्वाधिक ११८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून त्यानंतर मुंबई उपनगर येथील बालगृहातील ८८, अहिल्यानगर येथील ८०, तर बीड येथील ४७ विद्यार्थ्यांनी यश मिळवले आहे. ठाणे जिल्ह्यात ४२, सोलापूर येथे ३९, तर कोल्हापूर येथे ३४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

**आरोग्याशी संबंधित अनेक गुणधर्म** | **हवेतील विषारी वायू घेतात शोषून**

# रखरखत्या उन्हात लाल फुलांचे आकर्षण

| वाणगाव | प्रतिनिधी |

जिल्ह्यात सध्या गुलमोहरवर आलेला मनमोहक फुलोरा हा येणाऱ्या-जाणाऱ्या नागरिकांचे लक्ष वेधत आहे. रस्त्याच्या कडेला सावली देणारे हे झाड वैशाखातल्या रणरणत्या उन्हातही फुलणारे वृक्ष आहे. लाल, केशरी अशा रंगाच्या छटांनी रस्त्याच्या दुतर्फा बहललेले ही झाडे रखरखत्या उन्हातही मनाला आल्हाद निर्माण करतात. तसे पाहता, फेब्रुवारी-मार्चदरम्यान गुलमोहराची पाने गळायला सुरुवात होते, तर एप्रिल-मेच्या सुमारास पुन्हा झाडांना नवीन पालवी फुटते. कोवळी पाने गुलमोहराच्या सौंदर्यात भर टाकत असतात.



लाल-केशरी पाकळ्यांवर पांढऱ्या-पिवळ्या रंगाच्या आकर्षक रेषा उमटतात, अन् त्यामुळे या फुलाचे सौंदर्य अधिकच खुलते. जुलै-ऑगस्टपर्यंत या वृक्षाचे सौंदर्य खुललेले असते. ५०-६० फूट उंचीपर्यंत वाढणारा गुलमोहर तिसऱ्या-चौथ्या वर्षांपासून बहरात येऊ लागतो. सामान्यत: गुलमोहराचे सरासरी आयुर्मान ४०-५० वर्षांचे असते. जिल्ह्यात सध्या ठिकठिकाणी गुलमोहर बहरलेला दिसून येत आहे.

गुलमोहराच्या जमिनीवर येणारी मुळे बगिच्यांत बांधलेले रस्ते किंवा दगडी पायवाटा उखडून टाकू शकतो. अनेक वसाहतींच्या सभोवती, बागांमधून रंग उधळत गुलमोहराच्या पिळदार खोडांचे वृक्ष सध्या अनेक ठिकाणी उभे आहेत. गुलमोहरचे झाड फक्त आपल्याला सावली देत नाही, तर ते आरोग्याशी संबंधित अनेक समस्यांवर मात करण्यास मदत करते.

### आरोग्यवर्धक गुणधर्म

गुलमोहर झाडाच्या खोडाची साल पावडर वापरून पोटाशी संबंधित अनेक समस्यांपासून आराम देऊ शकते, गुलमोहरची पाने बारीक करून पावडर पाण्यात मिसळून नियमितपणे वापरल्याने केस गळती कमी होते, महिलांचा मासिक पाळीचा त्रास बरा होतो, तर तोंडातील अल्सर दूर करण्यासाठी गुलमोहरचा वापर करून झाडाच्या सालीच्या पावडरमध्ये मध मिसळून सेवन केले जाते. सांधेदुखी दूर करण्यासही हे झाड महत्त्वाचे आहे. मधुमेह विरोधी गुणधर्मांमुळे रक्तातील साखरेची पातळी कमी करण्यासाठी गुलमोहर प्रभावी आहे. गुलमोहरची झाडे हवेतील विषारी वायू शोषून घेत, ऑक्सिजन सोडतात, ज्यामुळे हवा शुद्ध हवा मिळते, असे याचे गुण आहेत.

## निवडक



### रबाळेत पोलिसांवर दगडफेक

**नवी मुंबई :** तळवली नाका परिसरात सुरू असलेले भांडण सोडवण्यासाठी गेलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांवर एका तरुणाने दगडफेक करून जखमी केल्याची घटना मंगळवारी (दि. १२) घडली. रबाळे पोलिसांनी या तरुणाला अटक केली आहे. अजय बनसोडे असे आरोपीचे नाव असून, त्याने पोलीस ठाण्यातदेखील गोंधळ घालत उपस्थित पोलिसांना शिवीगाळ केली. रबाळे पोलीस ठाण्यातील विष्णू भोसले हे आपले सहकारी दळवी यांच्यासह मंगळवारी गस्तीवर होते. यावेळी तळवली नाका येथील अपोपेय चायनीज सेंटरजवळ अजय बनसोडे हा मारामारी करत असल्याचे निदर्शनास आले. हा वाद सोडवण्यासाठी ते त्या ठिकाणी पोहोचले असता, अजयने पोलिसांवरच हल्ला चढवत दगड भिरकावले. यामध्ये पोलीस भोसले जखमी झाले. त्यामुळे पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेऊन त्याला पोलीस ठाण्यात आणल्यानंतरही त्याने अंमलदार कक्षात गोंधळ घालत उपस्थित पोलिसांना शिवीगाळ केली. याप्रकरणी रबाळे पोलिसांनी अजय बनसोडेविरोधात गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे.

### करंजा मच्छीमार सोसायटीचा मालवण दौरा




**उरण :** करंजा मच्छीमार सोसायटी आणि करंजा मत्स्य बंदर महाराष्ट्रातील मच्छिमारांसाठी प्रगतीचे एक आदर्श केंद्र मानले जाते. मासेमारीसोबत आदर्श व्यवस्थापनासाठी ते ओळखले जाते. शिस्तबद्ध कार्यप्रणालीतून आर्थिक भरभराट हे या सोसायटीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य आहे. याचे संचालन पूर्णपणे स्थानिक कोळी समुदायाद्वारे केले जाते. मासेमारी करण्यापासून ते त्यांच्या विक्रीपर्यंत आणि संपूर्ण आर्थिक व्यवहारांचा हिशोब ठेवण्यापर्यंतची सर्व जबाबदारी हे बांधव स्वतः चोखपणे पार पाडतात. हजारों मच्छीमारांना शिस्तबद्ध पद्धतीने काम करता यावे, यासाठी तिथली प्रणाली विकसित भक्कम आणि उपयुक्त बनली आहे. या बंदरातून दरवर्षी ४५० ते ५०० कोटी रुपयांच्या माशांची विक्री आणि निर्यात होते. त्यात धर्तीवर प्रदीप नाखवा यांच्या नेतृत्वाखाली मच्छीमार सोसायटीच्या कार्यकारी मंडळातील काही मंडळी आणि ‘ड्रायफ्रूट ग्रुप करंजा’चे सदस्यांनी मालवणला भेट दिली.





### धरणात पोहताना तीन मुलींचा दुर्दैवी मृत्यू

**वैभववाडी :** करूळ जामदारवाडी धरणात पोहण्यासाठी गेलेल्या गावातील सात जणांपैकी तीन मुलींचा बुडून मृत्यू झाला. यामुळे करूळ गावावर शोककळा पसरली आहे. मृतांमध्ये तन्वी अनंत माळकर (वय १६), ऋतिका संतोष पाटील (१८) आणि स्वरा संदीप सुर्वे (११) या तिघींचा समावेश असून त्या करूळ भोयडेवाडी येथील रहिवासी आहेत. करूळ भोयडेवाडी येथील करण विलास वारंग, श्रुतिका विलास वारंग, जार्गवी संदीप सुर्वे आणि विराज संतोष पाटील यांसह सातजण सायंकाळी चारच्या सुमारास करूळ जामदारवाडी धरणात पोहण्यासाठी गेले होते. ते सव्वाचारच्या सुमारास धरणावर पोहोचले. त्यानंतर अवघ्या काही मिनिटांत तन्वी, ऋतिका आणि स्वरा या तिघी धरणाच्या पाण्यात उतरल्या. पाण्याचा अंदाज न आल्याने अकरा वर्षीय स्वरा पाण्यात बुडू लागली. तिला वाचवण्यासाठी तन्वी आणि ऋतिका गेल्या, मात्र त्या तिघीही पाण्यात बुडाल्या.पाण्याबाहेर असलेल्या एकाने धरणावर येऊन आरडाओरडा करण्यास सुरुवात केली. यावेळी केंदारलिंग मंदिरात असलेले विलास वारंग, आकाश सुर्वे, सुशील माळकर आदी धावत धरणावर पोहोचले. त्यांनी क्षणाचाही विलंब न करता धरणात उड्या मारल्या. त्यांनी मुलींना बाहेर काढले; परंतु तत्पूर्वीच तिघींचाही मृत्यू झाला होता. ही माहिती मिळताच गावातील लोकांनी घटनास्थळी गर्दी केली. घटनेची माहिती मिळताच हवालदार धनाजी धडे, अजय बिलपे, हरेश जायभाय, अजित पडवळ, रणजित सावंत, हाके आणि राणे आदी घटनास्थळी पोहोचले. त्यांनी तिघींचेही मृतदेह शवविच्छेदनासाठी येथील ग्रामीण रुग्णालयात आणले.

### महानवाडीत राधाकृष्ण पालखी सोहळा



**पाली :** प्रत्येक गावामध्ये एक तरी मंदिर हे असतेच पण राधाकृष्ण मंदिर आपल्याला फार क्वचित ठिकाणी पाहायला मिळतात. गेल्या ४० वर्षाची परंपरा असलेले राधाकृष्ण मंदिर आपल्याला महानवाडी या गावी पाहायला मिळते. या मंदिराचा या वर्षीचा पालखी सोहळा नुकताच उत्साहाने व आनंदाने साजरा झाला. आजूबाजूच्या अनेक ग्रामस्थांनी या पालखी सोहळ्याचा आनंद लुटला. काकड आरती व अभिषेक करून कार्यक्रमाची सुरुवात अगदी सुंदर पद्धतीने करण्यात आली. मंदिर सजावटीसाठी मुंबई मित्रमंडळाचे सुनील धनावडे, संजय धनावडे, नितीन चिखले, रविंद्र धनावडे, रोहन धनावडे, निखिल साबळे, मनिष धनावडे, योगेश मालुसरे, प्रेम धनावडे, समीर भांडविलकर, विकी भांडविलकर, आशिष धनावडे, संकेत धनावडे, ऋषी धनावडे, अविनाश धनावडे, केतन धनावडे यांनी विशेष मेहनत घेतली. यावेळी रमेश धनावडे यांना नुकतेच रायगड रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते त्याबद्दल ग्रामस्थांतर्फे विशेष सत्कार करण्यात आला. तसेच या वर्षी इयत्ता १० वी व १२वी पास झाल्याबद्दल त्यांच्या गुणवत्तेचा गौरव म्हणून त्यांना रोख रक्कम व गुलाब पुष्प देऊन सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमास मंदार धनावडे, महेश धनावडे, प्रकाश पवार, सचिन धनावडे, अनंत धनावडे, सदाशिव आंग्रे, अशोक धनावडे, श्रीधर धनावडे, चंद्रकांत धनावडे, ऋषी, केतन, गावातील महिला मंडळाचे या कार्यक्रमासाठी विशेष योगदान दिले.

## निवडक



### बंद्यांना रोजगारक्षम होण्याकरिता प्रशिक्षण

**श्रीवर्धन :** तळोजा मध्यवर्ती कारागृह हे सन २००८ पासून कार्यान्वीत आहे. मुंबई विभागामधील हे तीसरे मध्यवर्ती कारागृह आहे. या कारागृहाची अधिकृत बंदी क्षमता २१२४ असून सद्यस्थितीत २७२२ बंदी दाखल आहेत. कारागृहात बंद्याना नैराश्याचा सामना करावा लागू नये व कारागृहात दाखल झाल्यावर त्याचे समाजाशी असलेले नाते संपुष्टात येवू नये याकरीता शासनाकडून विविध उपक्रम राबविण्यात येत असतात. बंदी कारागृहात दाखल झाल्यानंतर त्याचे भवितव्य धोक्यात आल्याची भावना निर्माण होऊ नये, त्याची कारागृहातून मुक्तता झाल्यानंतर स्वतःला रोजगारक्षम होण्याकरिता बुधवारी (दि.१३) मे रोजी कौशल्य विकास, उद्योजकता आयुक्तालय, कोकण भवन, नवी मुंबई यांचे मार्फत तळोजा कारागृहात टू व्हीलर मेकॅनिक, बागकाम व नर्सरी यांचे प्रमाणपत्र अभ्यासक्रम घेवून बंद्यांना प्रशिक्षण व मार्गदर्शन करण्यात आले. या दोन्ही अभ्यासक्रमामध्ये ३०-३० विद्यार्थांनी सहभाग नोंदवून प्रशिक्षण पूर्ण केले. सदरच्या प्रशिक्षणाचे पूर्तते नंतर कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, महाराष्ट्र राज्य आयुक्त अमित सैनी यांच्या यांचे हस्ते प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले. सदर कार्यक्रमास कारागृह अधीक्षक प्रमोद वाघ, सचिन जाधव, अमिता पवार, मंगेश डफळे व कारागृह उपअधीक्षक जितेंद्र काळे, वरिष्ठ तुरुंग अधिकारी राहुल झुटाळे, सचिन झिंजुर्डे व सुनिल वाघचौरे उपस्थीत होते.




### प्राथमिक शिक्षक संघाची बैठक संपन्न

**चिरनेर :** अखिल भारतीय प्राथमिक शिक्षक संघाच्या राष्ट्रीय कार्य समितीची महत्त्वपूर्ण बैठक (दि.९) मे रोजी जाट धर्मशाळा सभागृह कुरूक्षेत्र (हरियाणा) येथे राष्ट्रीय अध्यक्ष बसवराज गुरीकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठकीत शिक्षकांच्या विविध प्रश्नांवर सखोल चर्चा करण्यात आली. अखिल भारतीय प्राथमिक शिक्षक संघाच्या वतीने एक देश -एक पेन्शन ,एक देश -एक शिक्षण आणि एक देश-शिक्षकांना समान वेतन या त्रिसूत्रीच्या मागण्या वेतन आयोगासमोर मांडण्यात येणार असून पुढील आठवड्यात विस्तृत मसुदा आयोगाला सादर करण्यात येणार असल्याचे सांगितले. या राष्ट्रीय कार्य समिती बैठकीस भारतातील २४ राज्यांतील प्रतिनिधींनी सहभाग नोंदविला असल्याची माहती अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाच्या महिला सेल सरचिटणीस रंजना केणी यांनी दिली.

### दगड वाहतूक करणाऱ्या डंपरची खांबाला धडक

**श्रीवर्धन :** श्रीवर्धन येथील चौकर पाखाडी येथे दगड वाहतूक करणाऱ्या डंपरने महावितरण कंपनीच्या विजेच्या खांबाला जोरदार धडक दिल्याची घटना सोमवारी (दि.११) रोजी सायंकाळी सहा वाजता घडली आहे.

मुळगाव कोळीवाडा परिसरात ग्रोयान्स बंधाऱ्याचे काम सुरू असून, फॉरकॉन कंपनीने बंधाऱ्याचे कंत्राट घेतले आहे. गालसुरे येथील दगड खाणीमधून फॉरकॉन कंपनीचा दहा चाकी डंपर (एमएच १५ जेसी ६६९४) चौकर पाखाडी येथील अरूंद रस्त्यावरून मुळगाव कोळीवाडा येथे जात असताना चालकाच्या निष्काळजीपणाने डंपरची जोरदार धडक विजेच्या खांबाला बसली. या धडकेत खांब कोसळला असून, खांबावरील मुख्य वीजवाहिनी तुटल्याने शहरातील वीजपुरवठा काही वेळेसाठी खंडित झाला होता.



### पोस्ट कार्यालय पुन्हा शहरात

**उरण :** शहरातील नागरिकांसाठी दिलासादायक बातमी असून, लवकरच पोस्ट कार्यालय पुन्हा उरण शहरात सुरू होणार आहे. जेएनपीटी शॉपिंग सेंटर येथे हलविण्यात आलेल्या पोस्ट कार्यालयामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणात मनस्ताप सहन करावा लागत होता. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला वर्ग आणि दैनंदिन कामांसाठी पोस्ट कार्यालयावर अवलंबून असलेल्या ग्राहकांचे मोठे हाल होत होते. शहरातील आनंदनगर येथील जुन्या पोस्ट कार्यालयाची इमारत पुनर्विकासासाठी गेल्यानंतर हे कार्यालय तात्पुरत्या स्वरूपात जेएनपीटी शॉपिंग सेंटर येथे हलविण्यात आले होते. मात्र, शहरापासून दूर गेलेल्या या कार्यालयामुळे सामान्य नागरिकांना प्रवासाचा अतिरिक्त खर्च, वेळेचा अपव्यय आणि गैरसोयींचा सामना करावा लागत होता. यामुळे पोस्ट कार्यालय पुन्हा शहरात सुरू करण्याची मागणी नागरिकांकडून सातत्याने केली जात होती. अखेर या मागणीला यश आले असून, लवकरच उरण शहरात नव्या ठिकाणी पोस्ट कार्यालय सुरू करण्यात येणार आहे. सदर पोस्ट कार्यालय हे कामठा रस्त्यावर शामियाना हॉटेल समोरील युनियन बँकेच्या वरच्या मजल्यावर सुरू होणार असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे शहरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.विशेषतः ज्येष्ठ नागरिकांना पेन्शन, बचत खाते, मनीऑर्डर, पोस्टल व्यवहार आणि विविध शासकीय कामांसाठी वारंवार पोस्ट कार्यालयात जावे लागते.


## क्लासिफाईड
**जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी**

- **पोयनाड एस.टी.स्टँड शेजारी** महावीर सोसायटी मधील दुकान अंदाजे १७०० फूट व त्यावरील फ्लॅट ९०० फूट भाड्याने देणे आहे. बँकेस प्राधान्य मनिष- ८८३०९३०३१६
- **नागाव मधील हॉटेलमध्ये काम** करण्यासाठी स्टाफ ची आवश्यकता आहे. रिसेप्शनिस्ट, हाऊसकीपर, रेस्टॉरंट कॅप्टन, किचन हेल्पर, ब्रेकफास्ट कुक, मेंटेनेंस बॉय इच्छुक उमेदवारांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअॅप वर मेसेज करावा. मोबाईल - ७५५९१८४६१२
- **दिशा पॅथॉलॉजी लॅब अलिबाग व चोंढी** येथे कामासाठी मुले/मुली पाहिजे (अनुभवी/फ्रेशर उमेदवार चालतील) संपर्क : ८९९९१६१५१९
- **पिकवर ड्रायवर हवा आहे.** पगार : १८०००/- मो. ८००७८९३२३२, ८८०६६८३२३२

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


# पाणीटंचाईवर प्रशासनाचा झोपेचा बहाणा

## ■ तात्पुरत्या उपाययोजनेमुळे उरणकर त्रस्त, 'रेन वॉटर हार्वेस्टिंग' सक्तीची करण्याची मागणी

**| उरण | प्रतिनिधी |**

उरण शहर व तालुक्यात दिवसेंदिवस भीषण होत चाललेल्या पाणीटंचाईच्या संकटावर प्रशासनाने अद्यापही ठोस पावले उचलली नसल्यामुळे नागरिकांचा संताप आता उफाळून येत आहे. वर्षानुवर्षे तीच समस्या, तीच आश्वासने आणि तीच तात्पुरती उपाययोजना यामुळे उरणकर त्रस्त झाले असून, आता दिखाऊपणापेक्षा निर्णय हवा, अशी आक्रमक भूमिका समोर येत आहे.

उरण तालुका मराठी पत्रकार संघाच्या वतीने शासनाकडे पाठविण्यात आलेल्या निवेदनात स्पष्ट इशारा देण्यात आला आहे की, पाणीटंचाई ही आता केवळ हंगामी समस्या राहिलेली नसून



ती गंभीर आणि कायमस्वरूपी संकटात परिवर्तित झाली आहे. यावर मात करण्यासाठी रेन वॉटर हार्वेस्टिंगसारखी शाश्वत योजना तात्काळ सक्तीची

करणे अपरिहार्य बनले आहे. दरवर्षी उन्हाळा आला की पाण्याचे टँकर, राजकीय स्टंटबाजी आणि कागदोपत्री बैठका एवढ्यापुरतेच प्रशासनाचे काम मर्यादित राहते. मात्र, पाण्याच्या मूळ समस्येवर कोणतीही दीर्घकालीन योजना राबवली जात नसल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. जनतेला पाणी नाही, पण योजनांच्या फाइल्स मात्र भरभरून आहेत, अशी बोचरी टीका यावेळी करण्यात आली.

वाढती लोकसंख्या, अनियंत्रित बांधकामे, औद्योगिक प्रकल्पांचा वाढता दबाव आणि अपुरी जलसाठा व्यवस्था या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणून उरणमध्ये पाण्याचा प्रश्न विकोपाला गेला आहे. रानसई धरणावर एकहाती ताण असून, पुनाडे धरणातील अपुरा साठा परिस्थिती अधिकच बिकट करत आहे. तरीही लोकप्रतिनिधी आणि प्रशासन याकडे 'सोयीस्कर दुर्लक्ष' करत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. निवेदनात पुढे नमूद करण्यात आले आहे की, शहरातील सर्व नवीन बांधकामांना रेन वॉटर हार्वेस्टिंग सक्तीचे करणे, तसेच जुन्या गृहनिर्माण सोसायट्यांना निश्चित कालमर्यादेत ही यंत्रणा बसवणे बंधनकारक करावे. अन्यथा दंडात्मक कारवाईची तरतूद लागू करावी. फक्त नियम जाहीर करून चालणार नाही, तर त्याची काटेकोर अंमलबजावणी झाली पाहिजे, अशी ठाम भूमिका मांडण्यात आली आहे.

### भूजल पातळीत होणार वाढ

**रेन वॉटर हार्वेस्टिंगमुळे भूजल पातळी वाढण्यास मदत होऊन विहिरी, बोअरवेल्स आणि अन्य जलस्रोतांना नवसंजीवनी मिळू शकते. यामुळे शहराच्या पाणीपुरवठा यंत्रणेवरील ताण मोठ्या प्रमाणात कमी होणार असून, भविष्यातील पाणी संकट टाळता येऊ शकते. मात्र, यासाठी प्रशासनाची इच्छाशक्ती आणि जनतेचा सहभाग या दोन्ही गोष्टी तितक्याच महत्त्वाच्या असल्याचे स्पष्ट करण्यात आले. आता तरी प्रशासनाने डोळे उघडले नाहीत, तर उरणकरांना रस्त्यावर उतरून आंदोलन छेडावे लागेल, असा थेट इशारा देत उरण तालुका मराठी पत्रकार संघाने शासनाला खडसावले आहे. पाणी हा मूलभूत हक्क असून, त्यासाठी लढा उभारण्याची वेळ आता आली असल्याची जाणीव नागरिकांमध्ये तीव्र होताना दिसत आहे.**

# आमणोलीत प्रवासी पूल कोसळला

## ■ सुदैवाने जीवितहानी टळली

**| पाली /बेणसे | प्रतिनिधी |**

सुधागड तालुक्यात एक धक्कादायक अपघाती घटना घडली. बुधवारी (दि.१३) रोजी सायंकाळी ५ वाजताच्या सुमारास आमणोली गावाला जोडणारा पूल कोसळला. क्षमतेपेक्षा जास्त माल वाहतूक करणाऱ्या हायवा डंपरमुळे हा पूल कोसळण्याची घटना घडली आहे. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी पुढील गावांच्या प्रवासाचा मोठा प्रश्न याठिकाणी निर्माण झाला आहे.

जांभूळपाड्यापासून पुढे आमणोली, दहिगाव, कोलतरे तसेच आदिवासी वाड्यांकडे जाणारा हा मार्ग आहे. कमी वजन क्षमतेचा व छोटा असणारा पूल हा पुढील गावातील नागरिकांच्या प्रवासाकरिता एकमेव व महत्वाचा मार्ग आहे. मात्र,



आता पाऊस डोक्यावर असताना पूल कोसळल्याने नागरिकांना मोठ्या आवाहनांचा सामना करावा लागणार आहे.

विशेष म्हणजे सदरचा पूल हा प्रवाशांकारिता प्रवासासाठी वापरात असताना मात्र, उद्योजक, व्यावसायिक या पुलावरून मोठ्या प्रमाणावर अवजड मालवाहतूक वाहनांची सततची वाहतूक करीत असतात. ग्रामस्थांच्या वारंवार तक्रारीवरून सुद्धा अवजड वाहनांची मालवाहतूक ही सतत चालू होती. अखेर पूल कोसळण्याची दुर्घटना घडली असल्याने नागरिकांकडून संताप व्यक्त केला जात आहे. सदर घटनास्थळी पाली पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक हेमलता शेरेकर यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.

### टेम्पोच्या धडकेत दोघे जखमी

**| खालापूर | प्रतिनिधी |**

खालापूर पोलीस ठाणे हद्दीत दि. १० मे रोजी पहाटे २.५० वाजण्याच्या सुमारास मुंबई-पुणे जुन्या महामार्गावरील हाळगाव येथील रिलायन्स पेट्रोल पंपासमोर अपघात झाला. लोणावळा येथील काशिमसा वली दर्ग्याकडे जाणारी रिक्षा रस्त्याच्या साईडपट्टीवर उभी असताना आयशर टेम्पोने मागून जोरदार धडक दिली. या अपघातात रिक्षाचालक व प्रवासी जखमी झाले असून दोन्ही वाहनांचे नुकसान झाले.जखमीना उपचारासाठी दवाखान्यात नेण्यात आले. याप्रकरणी खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोउपनि जुंदरे करीत आहेत.

# वाढत्या उष्म्याने नागरिक हैराण

**| पाताळगंगा | प्रतिनिधी |**

मे महिन्याच्या सुरुवातीलाच वाढलेल्या तापमानामुळे नागरिक हैराण झाले आहेत. सकाळपासूनच उन्हाचा तडाखा जाणवत आहे. दुपारच्या वेळेत रस्त्यांवर वर्दळ कमी होताना दिसत आहे. विशेषतः



महिला वर्ग स्कार्फ, छत्री, गॉगल आणि पाण्याच्या बाटल्या घेऊनच घराबाहेर पडताना दिसत असून या वस्तू उन्हापासून संरक्षणासाठी मोठा आधार ठरत आहेत.

गेल्या काही दिवसांपासून तापमानात मोठी वाढ झाली असून दुपारच्या वेळेत उष्ण वाऱ्यांमुळे नागरिकांना बाहेर पडणे कठीण झाले आहे. बाजारपेठ, बसस्थानके तसेच मुख्य रस्त्यांवर उन्हाचा तीव्र परिणाम जाणवत आहे. दुचाकीस्वार महिलांनी चेहरा पूर्णपणे स्कार्फने झाकून प्रवास करण्यास प्राधान्य दिले आहे. तर अनेक महिला छत्रीचा वापर करून उन्हापासून बचाव करताना दिसत आहेत. उन्हामुळे लहान मुले, ज्येष्ठ नागरिक तसेच कामगार वर्गालाही मोठा त्रास सहन करावा लागत आहे. दुपारच्या वेळेत अनेक ठिकाणी रस्ते ओस पडलेले दिसत असून नागरिक शक्यतो सकाळी किंवा सायंकाळीच घराबाहेर पडण्यास पसंती देत आहेत.



# पर्यावरण वाचवण्यासाठी कर्जतमध्ये धरणे आंदोलन

**| कर्जत | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यात सुरू असलेल्या आणि प्रस्तावित धरण व जलविद्युत प्रकल्पांमुळे पर्यावरण, शेती आणि स्थानिक जनजीवन धोक्यात आल्याचा आरोप करत १८ मे रोजी कर्जत येथे एकदिवसीय धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. अॅड. कैलास मोरे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन सकाळी १०.३० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत लोकमान्य टिळक चौक येथे होणार आहे. याबाबतचे निवेदन प्रशासनाला देण्यात आले आहे.

तालुक्यात पाली-भुतिवली, कोंढाणा, पोशिर, शिलार, टाटा जलविद्युत प्रकल्पाचा दुसरा टप्पा आणि टोरेंट पॉवरचा ३,००० मेगावॅट क्षमतेचा पंप्ड स्टोरेज प्रकल्प प्रस्तावित आहे. पर्यावरणप्रेमींच्या मते, या सर्व प्रकल्पांमुळे हजारो झाडांची तोड, वनक्षेत्राचा ऱ्हास, सुपीक शेतीचे नुकसान आणि अनेक गावांचे विस्थापन होण्याचा धोका आहे.

टोरेंट प्रकल्पासाठी सुमारे ३७७ हेक्टर जमीन लागणार असून, त्यापैकी २३३ हेक्टर दाट जंगल आहे. पर्यावरण अहवालानुसार २.५ लाख पेक्षा अधिक झाडे तोडली जाऊ शकतात. हा परिसर भीमाशंकर अभयारण्य आणि पश्चिम घाटातील जैवविविधतेच्या पट्ट्यालगत असल्याने वन्यजीव आणि जलस्रोतांवर गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

पोशिर धरणासाठी ६,३९४ कोटी आणि शिलार धरणासाठी ४,८६९ कोटी रुपयांची मंजुरी देण्यात आली आहे. या प्रकल्पांमुळे बोरगाव, उंबरखांड, चई, चेवणे, शिलार आणि धोत्रे यांसह अनेक गावांतील शेकडो कुटुंबे बाधित होऊ शकतात.

कर्जत पर्यावरण बचाव संघर्ष समितीच्या माध्यमातून आयोजित या आंदोलनात शेतकरी, पर्यावरणप्रेमी आणि नागरिक सहभागी होणार आहेत.

# व्याजी व्यवहार, विमलची जादा दराने विक्री

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

अलिबाग तालुक्यातील रेवदंडा ही पंचक्रोशीतील मोठी आणि गजबजलेली बाजारपेठ म्हणून ओळखली जाते. मात्र, याच रेवदंडा परिसरात अवैध सावकारी, बेकायदा गुटखा विक्री आणि व्याजी व्यवहारांचा विळखा दिवसेंदिवस घट्ट होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. बंदी असतानाही गुटखा आणि विमलसारख्या तंबाखूजन्य पदार्थांची खुलेआम विक्री सुरू असून, त्याची ज्यादा दराने विक्री करून सर्वसामान्यांची आर्थिक लूट केली जात असल्याची संतप्त प्रतिक्रिया नागरिक व्यक्त करत आहेत.

रेवदंडा परिसरातील केळकर स्टॉप, मुख्य बाजारपेठ आणि काही आडमार्गांवर सावकारीचे व्यवहार उघडपणे सुरू असल्याची चर्चा रंगू लागली आहे. दहा दिले तर वीस परत अशा पद्धतीने व्याज आकारून गरीब, हातावर पोट भरणारे कामगार, वाहन चालक आणि गरजू नागरिकांची आर्थिक पिळवणूक केली जात असल्याचे बोलले जात आहे. काही ठिकाणी महिलांकडून दमदाटी करत हप्ते वसूल केले जात असल्याचेही आरोप समोर येत आहेत. एकेकाळी व्यापाराचे प्रमुख केंद्र म्हणून ओळख असलेल्या रेवदंडा बाजारपेठेचा विस्तार वाढत्या नागरीकरणामुळे मोठ्या प्रमाणात झाला. पंचक्रोशीतील अनेक गावांमधून नागरिक खरेदीसाठी रेवदंड्यात येतात. या वाढत्या वर्दळीचा फायदा घेत सावकारी आणि बेकायदा धंदे करणाऱ्यांनी येथे आपले जाळे पसरवल्याची चर्चा सुरू आहे.

दरम्यान, पोलीस अधीक्षकपदी आंचल दलाल यांनी कार्यभार स्वीकारल्यानंतर अवैध धंद्यांवर कठोर कारवाईचे आदेश दिले होते. गुटखा, विमल आणि इतर तंबाखूजन्य पदार्थांची विक्री व वाहतूक रोखण्यासाठी विशेष सूचना देण्यात आल्या होत्या. सुरुवातीच्या काही महिन्यांत पोलिसांनी धडक कारवाया करून अनेक अवैध धंद्यांवर आळा घातला होता. ज्या पोलीस ठाण्यांच्या हद्दीत अवैध धंदे सुरू असल्याचे आढळले, तेथील अधिकाऱ्यांच्या बदल्याही करण्यात आल्या होत्या. मात्र, रेवदंडा परिसरात पुन्हा पोलिसांचा धाक कमी झाल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. बंदी असलेला गुटखा चोरीछुप्या मार्गाने विकला जात असून, विमल अन्य तंबाखूजन्य पदार्थ ३५ ते ४० रुपयांपर्यंत ज्यादा दराने विकले जात असल्याचा आरोप होत आहे. काही दुकाने आणि आडोशाला सुरू असलेले हे प्रकार आता उघड गुपित बनले असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे.

### कारला अज्ञात वाहनाची धडक

**पोलादपूर :** चोळई गाव हद्दीत महामार्गावर रविवारी (दि.१०) मे रोजी सायंकाळी ५.३० वाजता अपघात झाला. इर्टिका कारला अज्ञात वाहनाने धडक दिल्यानंतर चालक फरार झाला. या अपघातात कारमधील प्रवासी जखमी झाले असून, वाहनाचे नुकसान झाले. याप्रकरणी पोलादपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, अधिक तपास कृष्ण जागडे करीत आहेत.

# पाली, पोलादपूर नगरपंचायत पोटनिवडणुकीचा कार्यक्रम जाहीर

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

पाली आणि पोलादपूर नगरपंचायतीसाठी होणाऱ्या पोटनिवडणुकीचा कार्यक्रम जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी जाहीर केला आहे. पाली नगरपंचायतीतील प्रभाग क्रमांक १३ व १४, तर पोलादपूर नगरपंचायतीतील प्रभाग क्रमांक १ साठी ही पोटनिवडणूक घेण्यात येणार आहे.

दोन्ही ठिकाणी नामनिर्देशनपत्र दाखल करण्याची प्रक्रिया १८ मे २०२६ पासून सुरू होणार असून, २५ मे २०२६ पर्यंत अर्ज स्वीकारले जाणार आहेत. नामनिर्देशनपत्रांची छाननी २६ मे रोजी होणार असून, उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत २ जून २०२६ आहे. आवश्यक असल्यास मतदान २० जून २०२६ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत पार पडणार आहे. मतमोजणी २१ जून २०२६ रोजी होणार असून, निकाल जाहीर करण्यात येणार आहेत.

पाली नगरपंचायतीसाठी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून तहसीलदार उत्तम कुंभार, तर पोलादपूरसाठी तहसीलदार महेश शितोळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.


## सिडकोचा स्वच्छतेचा गाजावाजा कागदावरच | केवळ रंगरंगोटीचा दिखावा

# द्रोणागिरीच्या प्रवेशद्वारावरच 'कचऱ्या'ने स्वागत

**| उरण | प्रतिनिधी |**

सिडको प्रशासन एकीकडे 'स्वच्छ शहर' मोहिमेचा गाजावाजा करत असताना, द्रोणागिरी नोडच्या प्रवेशद्वारा जवळच कचऱ्याचे भीषण साम्राज्य पसरले आहे. उरण तालुक्यातील खोपटे रोडकडून द्रोणागिरीकडे येताना रस्त्याच्या दुतर्फा साचलेल्या कचऱ्याच्या ढिगाऱ्यांमुळे या परिसराला डम्पिंग ग्राऊंडचे स्वरूप आले आहे.

धक्कादायक बाब म्हणजे, आजूबाजूच्या ग्रामपंचायतींच्या कचरा गाड्याही याच ठिकाणी कचरा आणून टाकत असल्याने



ही समस्या अधिक गंभीर बनली आहे.

या डम्पिंग ग्राऊंडवर ओला आणि सुका कचरा एकत्रित टाकला जात असल्याने तो कुजून प्रचंड दुर्गंधी पसरली आहे. यामुळे नागरिक आणि वाहनचालकांना नाकावर रुमाल धरल्याशिवाय प्रवास करणे अशक्य झाले आहे. या घाणीमुळे परिसरात गिधाडे, उंदीर आणि भटक्या कुत्र्यांचा वावर वाढला असून, आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. पोटाची खळगी भरण्यासाठी काही भटके लोक या घाणीतून प्लास्टिक वेचताना दिसतात, ज्यांच्या आरोग्याकडेही प्रशासनाचे दुर्लक्ष आहे. केवळ कचराच नाही, तर द्रोणागिरी नोडमध्ये अनेक ठिकाणी ड्रेनेजची झाकणे उघडी आहेत.

या उघड्या चेंबरमधून दुर्गंधीयुक्त सांडपाणी रस्त्यावर येत असून त्यामुळे परिसरात डासांचा प्रादुर्भाव वाढला आहे. रात्रीच्या वेळी हे उघडे ड्रेनेज अपघातांना निमंत्रण देत आहेत.

सध्या सिडकोकडून रस्त्यावरील दुभाजकांना काळ्या-पिवळ्या रंगाने रंगवण्याचे काम सुरू आहे वाहन चालकांना दुभाजक दिसावेत हा हेतू चांगला असला तरी डोळ्यांना दिसणारे रंगापेक्षा नाकाला येणारी दुर्गंधी सिडको प्रशासनाला का जाणवत नाही असे रहिवाशी विचारत आहे.कचरा साठवायच्या आतच त्यांनी विल्हेवाट लावणे गरजेचे असताना प्रशासन केवळ रंग आहे रंगरंगोटी च्या कामात मग्न असल्याचे चित्र दिसत आहे.

### कचरा उचलण्याची मागणी

पावसाळ्यात उंबरठ्यावर आला आहे. वेळेत कचरा उचलला नाही, तर पावसाच्या पाण्यात ही घाण कुजून संपूर्ण द्रोणागिरी परिसरात दुर्गंधीयुक्त रोगराई पसरण्याची भीती आहे. सिडकोणी तात्काळ याकडे लक्ष देऊन ग्रामपंचायतच्या कचऱ्या गाड्यांना प्रतिबंध करावा आणि या कचऱ्याच्या साम्राज्यातून नागरिकांची सुटका करावी.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरिता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे झुगरेवाडी, ता. कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकरणी रू.पै. |
|---|---|---|
| ३७/६/अ/२ | एकूण क्षेत्र ०-२६-०० हे.आर. | ०.१५ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

सही/-
दिनांक :- १५/०५/२०२६
**ॲड. रोहित रो.मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- हाउस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ, मु.पो.कामार्ली, ता.पेण, जि.रायगड पिन नं.४०२१०७

## शुद्धीपत्र

सर्व लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिलांतर्फे दि. १२/५/२०२६ रोजीच्या दैनिक कृषीवल या वृत्तपत्राचे पृष्ठ क्र.७ वर मौजे नांदाईपाडा, ता. अलिबाग येथील मिळकतींबाबत जाहीर नोटीस प्रसिद्ध केलेली आहे. त्या जाहीर नोटीस मधील बिनशेती मिळकतीच्या वर्णनांमधील शेवटची मिळकत भुमापन क्र. व उपविभाग क्रमांक २०२/२ असा टाईपिंगच्या चुकीमुळे नमूद झालेला आहे तो गट क्र. उपविभाग क्र. २००/२ असा वाचणेत यावा तसेच त्यामध्ये ग्रामपंचायत आगरसुरे घर क्र. ४८४ असा चुकीने उल्लेख झालेला आहे तो घर क्र. ७८४ असा वाचणेत यावा. व घर क्र. ७८५ क्षेत्र ४५० असे लिहिण्यात आलेले आहे ते ४५० चौ. फुट असे वाचणेत यावे.

अलिबाग,
दि. १४-०५-२०२६.
**ॲड. आर.बी.कोसमकर**
चिरायु, ब्राम्हणआळी, अलिबाग
ता. अलिबाग, जि. रायगड.
मो. ९८८१९१५०३३

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे-खानाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील १) सर्व्हे नं. २२/१/ब, एकूण क्षेत्र ०-२०-०० हे. आर., आकार २.०९ रू. पैसे २) सर्व्हे नं. २२/२/क, एकूण क्षेत्र ०-४५-०० हे. आर., आकार ३.३८ रू. पैसे या मिळकती, या मिळकतीचे विद्यमान मालक १) केशव जगन्नाथ म्हात्रे २) रेवती रामचंद्र म्हात्रे ३) नंदा नरेश गायकर ४) दिपक दत्तात्रेय म्हात्रे ५) सिताबाई काशिनाथ म्हात्रे ६) शोभा प्रमोद म्हात्रे पु. श्र. शोभा काशिनाथ म्हात्रे ७) रजनी सुनिल म्हात्रे पु. श्र. रजनी काशिनाथ म्हात्रे ८) मोहन काशिनाथ म्हात्रे ९) किशोर काशिनाथ म्हात्रे १०) मेघा महेंद्र तेलंगे पु. श्र. शशिकला काशिनाथ म्हात्रे ११) शैला अतिश पाटील पु. श्र. शैला काशिनाथ म्हात्रे १२) जयश्री जगन्नाथ गावडे पु. श्र. जयश्री महादेव खारकर १३) हिरल हसमुख वाडेकर पु. श्र.लता महादेव खारकर १४) सुनिता नारायण भगत पु. श्र. हिरा महादेव खारकर १५) राजश्री राजाराम भगत पु. श्र. सविता महादेव खारकर यांच्याकडुन आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याच्या ठरविलेल्या आहेत. सदरहू मिळकती निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकती निर्वेध आहेत, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : १४/०५/२०२६
**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता-श्रुती सारंग को.ऑप.हौ.सो., ए विंग, रूम नं.५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी, अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे-खानाव, ता.अलिबाग, जि.रायगड येथील सर्व्हे नं.२२/२/अ, एकूण क्षेत्र ०-६६-०० हे. आर., आकार ४.६३ रू. पैसे ही मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. जितेंद्र रघुनाथ म्हात्रे व अनिता अनिल पाटील यांच्याकडुन आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : १४/०५/२०२६
**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता-श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग, रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी, अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय

(तहसिलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता. मुरुड जि. रायगड)

**जाहिर नोटीस**

ज.म.र अर्ज १८२/२०२६

प्रति,
श्रीम.शबनम अशफाक घारे,
रा.मांडला, ता.मुरुड-जंजिरा, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

निबंधक, जन्म मृत्यु विवाह नोंदणी अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत बोर्ली, ता. मुरुड-जंजिरा, जि.रायगड — सामनेवाला

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांचा जन्म दि. ३१-०१-१९९४ रोजी मौजे बोर्ली, ता. मुरुड, जि. रायगड येथे राहत्या घरात झाला आहे. त्यांच्या जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत बोर्ली, यांचे जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणे करीता मुरुड न्यायालयांत रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १० अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी, अर्जदार यांचा दि. ३१-०१-१९९४ रोजी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वत: किंवा वकीला मार्फत मे.न्यायालयांत दिनांक ०२/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजुन अर्जदार यांनी जन्म-मृत्यु नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता. १२/०५/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली. कळावे.

सही/-
**(आदेश डफळ)**
**तहसिलदार मुरुड-जंजिरा**

## कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड

(भारत सरकारचा उपक्रम)

सादर सेवा

**निविदा सूचना क्र. 03-04/2026-27**

कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडच्या (केआरसीएल) क्षेत्रीय रेल्वे प्रबंधक यांच्या वतीने, मंडल वाणिज्य प्रबंधक, रत्नागिरी हे आयआरईपीएस पोर्टलद्वारे ई-निविदा प्रक्रियेतून (दोन पॅकेट प्रणाली) पात्र कंत्राटदारांकडून कोकण रेल्वेअंतर्गत चिपळूण स्थानक येथे 9वर्षांच्या कालावधीसाठी व्हेज फास्ट-फूड स्टॉल व चहा स्टॉल चालविण्यासाठी खुल्या निविदा आमंत्रित करीत आहेत. **स्थान:** चिपळूण स्थानकावर फास्ट-फूड स्टॉल व चहा स्टॉल - फिरत्या क्षेत्रामध्ये (चिपळूण रेल्वे स्टेशनच्या पश्चिम बाजूला, प्लॅटफॉर्म क्रमांक ३ जवळ). **निविदा क्र.: केआर/डीसीएम/आरएन/सीओएमएल/व्हेज फास्ट-फूड स्टॉल-टीएस/ सीएचआय. दिनांक: 13/05/2026. निविदा सादर करण्याची अंतिम तारीख व वेळ:** 12/06/2026 रोजी 16:00 वाजेपर्यंत. **निविदा उघडण्याची वेळ:** 12/06/2026 रोजी 16:30 वाजता. निविदा दस्तऐवज केवळ www.ireps.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी केल्यानंतरच प्राप्त करता येतील.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमच्या अशिलांनी खाली वर्णन केलेल्या मिळकती त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. जय धीरज दुसारा रा. ८, गुरूकुल सी एच एस ली, राम मंदिर रोड, विलेपार्ले, मुंबई यांचेकडून विकत घेणेचे ठरलेले आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग नं. | क्षेत्र (हे. आर) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| नागाव ता. अलिबाग | ३५/१ | ०-१७-६० पो. ख ०-०२-४० ०-२०-०० | २-४५ |

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध बोजा, अथवा गहाण, दान लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेन्टेनन्स् मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (७) सात दिवसांचे आत आणून द्यावी. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशील सदर व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यांत येईल, हे सर्वास कळावे.

अलिबाग,
दि. १३-०५-२०२६.
सही/-
**ॲड. आर. बी. कोसमकर**
चिरायु ब्राम्हणआळी, अलिबाग
ता. अलिबाग, जि. रायगड.

## रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग
## विशेष वसूली अधिकारी कार्यालय, अलिबाग रायगड

आर डी सी सी बँक

फॉम झेड
(नियम १०७ चा उपनियम ११ (डी ११) )
स्थावर मिळकतीचा कब्जा सूचना

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. अलिबाग शाखा अलिबागचे विशेष वसुली अधिकारी या नात्याने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये न्यायनिर्णित ऋणको यांना म्हणजे कर्जदार व हमीदारांना मागणी नोटीस दिनांक २७.०१.२०२० रोजी निर्गमित केली व त्या पाठोपाठ दिनांक ११.०२.२०२० रोजी जप्ती सूचनेचा आदेशही देण्यात आला. कर्जदार श्री. कैलास रामा वरसोलकर यांच्यासह इतर न्यायनिर्णित ऋणको यांना सूचनेत नमूद केलेली दिनांक ०९.०९.२०१५ पर्यंतची रक्कम रूपये ८,०९,०४०/- व दिनांक ०१.११.२०१४ पासून पुढे होणारे व्याज सरचार्ज यांची परतफेड सदरहू सूचना प्राप्त झालेनंतर वसुलीच्या तारखेपर्यंत त्यावरील १३ टक्के व्याज दराने भरण्यास सांगितले होते आणि न्यायनिर्णित ऋणको रक्कमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याने निम्नस्वाक्षरीकारणाने जप्तीची सूचना जारी करून येथे खालील माहिती झालेली मिळकत जप्त केलेली आहे.

न्यायनिर्णित ऋणकांनी संपूर्ण रक्कमेची परतफेड करण्यास कसूर केली असल्याने याद्वारे न्यायनिर्णित ऋणको आणि सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यास येते की,

निम्नस्वाक्षरीकाराने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ या नियम १०७ चा उपनियम (११ डी -१) अन्वये त्यांना प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करून अलिबाग नगरपालिका हद्दीतील मालमत्ता क्रमांक ५२ येथील खालील मिळकतीचे मालक यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी कोणताही करण्यात आलेला व्यवहार हा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा अलिबागच्या दिनांक ०९.०९.२०१५ रोजी येणे रक्कम रूपये ८,०९,०४०/- व त्यावरील व्याजाचा आणि इतर शुल्काचा अधिन राहील.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

**कर्जदार :- श्री. कैलास रामा वरसोलकर**

अलिबाग कोळीवाडा येथील श्री. कैलास रामा वरसोलकर यांचे नावे असलेले अलिबाग नगरपालिका हद्दीतील मालमत्ता क्रमांक ५२ क्षेत्रफळ ४६.१२ चौ.मी.

स्थळ : अलिबाग
दिनांक ११.०५.२०२६
**श्री.के.के. राऊत**
वसूली व विक्री अधिकारी अलिबाग रायगड
द्वारा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. अलिबाग

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल, हे श्री. दिगंबर विश्वनाथ शिंदे यांचेकडून त्यांचे ताबेकब्जा वहिवाटीतील, व मालकीची, आणि भोगवटासदरी नावे असलेली खालील वर्णनाची जमीन मिळकत, कायमची विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**मौजे उक्रुळ ता. कर्जत, जि. रायगड, येथील जमीन मिळकत**

| सर्व्हे नंबर | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|
| ४९ /५/ब | ०.३१.४० पो.ख. ०.००.५० एकूण ०.३१.९० | १.५० |

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत, इतर दुसरे कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून, ०५ (पाच) दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास, आमचे अशिल सदर मिळकत विकत घेण्याचा व्यवहार, म्हणजेच खरेदीखत करुन पूर्ण करतील. तसेच मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कळावे
कर्जत दि. १५/०५/२०२६
**ॲड. वैभव अ. शिंदे**
ऑफिस :- फ्लॅट नं १०, दुसरा मजला, श्री साई सावली, कॉ ऑप. हौ. सो, कर्जत कोर्ट समोर, कर्जत, जि. रायगड ४१०२०१. मो. ७०५८८५१२२१/७७४८५१४६९

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

आमचे अशिलांना मौजे कामथ, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खाली वर्णन केलेल्या मिळकती मधील ००-०३-०० हे. आर. चौ. मी. मिळकतीचे विद्यमान मालक सुरेखा रमेश गोखले, सुदेश कृष्णाजी दातार, सुनिल कृष्णाजी दातार, सुहास कृष्णाजी दातार यांचेकडुन खरेदी घेण्याचे ठरविले आहे. विद्यमान मालकांनी मिळकतीवरील त्यांचा मालकीहक्क निर्वेध असल्याचा भरवसा दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे कामथ, ता. अलिबाग, जि. रायगड येथील**

| भुमापन व उपविभाग क्र. | क्षेत्र हे. आर. | आकार रू. पैसे. |
|---|---|---|
| ४७९/अ | ००-४४-०० पैकी ००-०३-०० | १४.४६ |

वर नमूद मिळकतींमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल मिळकत खरेदी घेण्याचा व्यवहार पुर्ण करतील. त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दिनांक : १४/०५/२०२६
**ॲड. रविंद्र विनायक ओक**
''गुरूकृपा'' महर्षी कर्वे रोड,
ता. अलिबाग, जि. रायगड

## महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

उप प्रादेशिक कार्यालय, तळोजा

**पर्यावरण विषयक जन सुनावणीची सूचना**

**मे. टेसेन्डेर्लो केर्ली इंडिया प्रायव्हेट लिमिटेड,** प्लॉट नं. ३०३, सेक्टर-३, जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरण, सावरखार गाव, उरण, ता. उरण, जि. रायगड यांच्या प्रस्तावित कॅल्शियम थायोसल्फेट (CaTs) आणि पोटॅशिअम थायोसल्फेट (KTS) उत्पादनांच्या निर्मिती प्रकल्पाकरीता पर्यावरण विषयक जनसुनावणी आयोजित करणेकामी प्रस्ताव म. प्र. नि. मंडळाकडे प्राप्त झालेला आहे.

या संदर्भात, MoEFCC EIA अधिसूचना क्र. S.O.१५३३, दिनांक १४/०९/२००६ (०१/१२/२००९ रोजी सुधारित केल्यानुसार) नुसार, प्रकल्प स्थळाच्या सभोवतालच्या परिसरातील रहिवासी, प्रकल्पग्रस्त नागरिक, पर्यावरण क्षेत्रात काम करणाऱ्या संस्था आणि सदर प्रकल्पामुळे बाधित होऊ शकणाऱ्या इतर व्यक्तींसाठी सदर प्रकल्पाची पर्यावरणीय जनसुनावणी आयोजित करण्यात आली आहे. जनतेच्या सूचना, मते, टिप्पण्या आणि आक्षेप या सूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत खालील पत्त्यावर सूचना, टिका-टिप्पणी किंवा आक्षेप तोंडी तसेच लेखी स्वरुपात नोंदविता येतील.

**प्रादेशिक कार्यालय, नवी मुंबई / उप-प्रादेशिक कार्यालय, तळोजा,**
**महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,**
**रायगड भवन, ७ वा मजला, सेक्टर-११,**
**सी. बी. डी. बेलापूर, नवी मुंबई - ४००६१४**
**ई-मेल : ronavimumbai@mpcb.gov.in , srotaloja@mpcb.gov.in**

**तसेच तोंडी अथवा लेखी स्वरुपातील सूचना खालील ठिकाणी जाहीर लोकसुनावणी वेळेत केल्या जाऊ शकतात.**

| जन सुनावणीचे ठिकाण | जन सुनावणीची दिनांक व वेळ |
|---|---|
| बहुउद्देशीय सभागृह, सेक्टर-०२, जे.एन.पी.टी. कॉलनी, जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरण, ता. उरण, जि. रायगड. | दिनांक १६/०६/२०२६ वेळ :- दुपारी ३:०० वाजता |

सदर प्रकल्पासंबंधी माहिती असलेले कार्यकारी सारांश अहवाल मराठी व इंग्रजी भाषेमध्ये तसेच पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल खालील कार्यालयांमध्ये उपलब्ध आहेत. संबंधित व्यक्ती या कार्यालयांमध्ये कार्यालयीन वेळेत सदर कागदपत्रे अभ्यासू शकतील.

१. जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड, अलिबाग.
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड अलिबाग.
३. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, रायगड अलिबाग.
४. प्रांताधिकारी, प्रांत कार्यालय, पनवेल, जि.रायगड.
५. तहसिलदार, तहसिल कार्यालय, ता. उरण, जि.रायगड.
६. तहसिलदार, तहसिल कार्यालय, ता. पनवेल, जि.रायगड.
७. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, ता. उरण, जि. रायगड.
८. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, ता. पनवेल, जि. रायगड.
९. प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, ७ वा मजला, रायगड भवन,सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई.
१०. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय, कल्पतरु पॉईन्ट, ३ रा मजला, सायन माटूंगा स्कीम रोड नं.८, सायन सर्कल समोर, सायन (पूर्व),मुंबई-२२.
११. पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासन भवन, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२.
१२. प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, पश्चिम विभाग, तळ मजला, पूर्व बाजू, नवीन सचिवालय इमारत, सिव्हील लाईन्स, नागपूर-४४०००१.
१३. मुख्याधिकारी, नगर परिषद उरण, ता. उरण, जि. रायगड.
१४. ग्रामपंचायत कार्यालये : सोनारी, सावरखार, जासखार, रांजणपाडा, बेलपाडा, पागोटे, नवघर, कुंडे, शेवा, डोंगरी, फुंडे, पांजे, हनुमान कोळीवाडा, गव्हाण.
१५. ग्रुप ग्रामपंचायत - कराळ, जासई, न्हावा.

**सही/-**
**उप प्रादेशिक अधिकारी, तळोजा**

## जाहीर नोटीस

**समाजकल्याण अनुदानित विद्यार्थी वसतिगृह, कोतवालवाडी ट्रस्ट**

**नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड ४१०१०१**

**(P.T.R. No. E-25(K), Income Tax Exmption Undet 80-G)**

**हुतात्मा भाई कोतवाल यांना अभिप्रेत असणारी शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक व आदिवासी विकासकार्य करणारी सेवाभावी संस्था**

**कर्जत तालुक्यातील नेरळ येथील कोतवालवाडी ट्रस्ट या सेवाभावी संस्थेच्या हुतात्मा भाई कोतवाल आदिवासी विद्यार्थी वसतीगृहामध्ये आदिवासी मागास वर्गीय अ.जात ३८% अजमात ५७% वि.जा.भ.ज. ३% वि.मा.प्र. २% आणि इतर मागास अपंग व अल्प उत्पन्न गटातील विद्यार्थ्यांना सन २०२६-२०२७ या शैक्षणिक वर्षांमध्ये प्रामुख्याने इयत्ता ५ वी ते ८ वी च्याच विद्यार्थ्यांनाच प्रवेश देण्यात येणार आहे.**

**तरी गरजू विद्यार्थ्यांनी आपले गुणपत्रक झेरॉक्स प्रत घेऊन दि. ३१/०५/२०२६ पर्यंत संस्थेच्या कार्यालयात सकाळी ११ ते ५ वाजेपर्यंत अर्ज आणून द्यावेत.**

**दिनांक ०३/०६/२०२६ रोजी सकाळी ११ ते २ या वेळेत प्रत्येक्ष मुलाखती घेतल्या जातील. व उर्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाईल.**

**संपर्क:**
**कार्यालयः श्री.पुंडलीक कराळे**
**मो.न.९२०९१४३७५२**
**अधिक्षकः**
**श्री. अनंत झुगरे**
**मो. न. ९१४५६४४३४**
**कोतवालवाडी ट्रस्ट**
**मो. न. ७७०९५००८७८**

**श्रीम. संध्याताई देवस्थळे**
**मॅनेजिंग ट्रस्टी**
**मो.न. ९८२२३३०८७८**
**श्री. सावळाराम जाधव**
**संचालक,**
**मो. न. ९८२२९७०७०७**
**श्री. बाळकृष्ण पादीर**
**उप संचालक,**
**मो. न. ९८९२०३४०६६**

**पत्ताः कोतवालवाडी ट्रस्ट(रजि.) कोतवालवाडी, नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

आमचे अशिलांना मौजे मुशेत, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खाली वर्णन केलेली बिनशेती मिळकत तिचे विद्यमान मालक नताली पेडर बजाज आणि शेन गायोमर्ड पेडर यांचेकडुन खरेदी घेण्याचे ठरविले आहे. विद्यमान मालकांनी मिळकतीवरील त्यांचा मालकीहक्क निर्वेध असल्याचा भरवसा दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे मुशेत, ता.अलिबाग, जि.रायगड येथील**

| भुमापन व उपविभाग क्र. | क्षेत्र आर.चौ.मी | आकार रू.पैसे. |
|---|---|---|
| ११३/१ | ६०-२०-०० | ६०२.०० |

वर नमूद मिळकतींमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल मिळकत खरेदी घेण्याचा व्यवहार पुर्ण करतील. त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दिनांक : १४/०५/२०२६
**ॲड. रविंद्र विनायक ओक**
''गुरूकृपा'' महर्षी कर्वे रोड,
ता. अलिबाग, जि. रायगड

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे वाशी, ता.पेण, जि.रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री. दत्तात्रेय नारायण म्हात्रे रा.वाशी, ता.पेण, जि.रायगड यांच्या मालकीची असून सदर मिळकत आमचे अशिलांनी कायम विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत मिळकतीचे विद्यमान मालक व आमचे अशिल यांच्यामध्ये बोलणी झालेली आहे.

**मिळकतीचे वर्णन :-** जिल्हा व तुकडी रायगड, तालुका व पोटतुकडी पेण, मौजे वाशी येथील गट नं. २/२ एकुण क्षेत्र ०.२६.३० हे.आर. पा. आकार ४.०६ ही मिळकत या जाहीर नोटीसचा विषय आहे.

सदरची मिळकत निर्वेध असल्याबाबत मालकांनी हवाला दिला आहे. तरी सदर मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसा हक्क, लिज, लिन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे लेखी स्वरुपात, योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत सादर करावी, सदर मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे गृहीत धरुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून कुणाचीही तक्रार अगर हरकत राहिल्यास ती विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

पेण.
दि. १५/०५/२०२६
सही /-
**(ॲड.नरेंद्र एच.बाफणा)**
मु.पेण, ता.पेण, जि.रायगड
फोन नं. ९०२८६७६००३

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थ मौजे कोपरी, ता. खालापूर, जि. रायगड येथील पुढीलप्रमाणे वर्णनाची मिळकत सदर मिळकतीचे मालक/कब्जेदार यांचेकडून आमचे अशिलांनी कायम खरेदीने घेणेचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

**मौजे कोपरी, ता. खालापूर, जि. रायगड येथील**

| मालक/कब्जेदाराचे नाव | गट क्र. | उपविभाग | क्षेत्र हे.-आर.चौ.मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| भगवान जगन्नाथ भोईर, बायमा दगडू ठोंबरे, अनंत हरी दिसले, छबीबाई मारुती पाटील, संतोष मारुती पाटील, नंदा रमेश पिंगळे, निराबाई हरी बैलमारे, रेणुका बाळाराम मालकर, सुभाष नथुराम मालकर, माणिक रमेश राणे, संगीता प्रकाश पाटील, लिलाबाई जगन्नाथ भोईर, शांताराम जगन्नाथ भोईर | ५ | २ | ०-४०.४० | ३.५६ |

त्याअर्थी सदर मालक/कब्जेदार याचे व्यतिरीक्त सदर मिळकतीसंदर्भात अगर त्यांचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, लिज, चार्ज, अ‍ॅटॅचमेंट, अन्न वस्त्र निवारा, कुळ हक्क, ताबा कब्जा, एम.ओ.यु. हुकुमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा, संपादन रिक्विझेशन अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क-हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर मालकी हक्कांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ (चौदा) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील भगवान जगन्नाथ भोईर वगैरे यांचे मालकी हक्क निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पनवेल
दि. १५/०५/२०२६.
**श्री. तुषार द. देवरे, ॲडव्होकेट**
पत्ता : फ्लॅट नं. ए-२, जय नगर को.ऑप. हौ. सोसा. लि. कोर्ट रोड, ५२ बंगला, पनवेल ४१० २०६, जि. रायगड. मोबाईल नं. ९३२५००४००८

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक ऋषिकेश अरुण गायकवाड व विद्या ऋषिकेश गायकवाड यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे

**मौजे कुशिवली तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| २१/१/ई | एकुण क्षेत्र ०-२५-०० हे आर पॉ | १-८१ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क ह्वितसंबंध, बयानापावती खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक १५/०५/२०२६

**खरेदीदारातर्फे वकील ॲड.वृषाली रघुनाथ मोरे**
मोबा. ८५३०१४६८५४
ऑफिस पत्ता शॉप नं.२९ तळ मजला, हिरापन्ना शॉपिंग, प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर, अमराई रोड, कर्जत ता. कर्जत, जि.रायगड ४१०२०१

**खरेदीदारातर्फे वकील ॲड. निलेश कान्हु मोरे**
मोबा. ९८२२६९११०९
ऑफिस पत्ता- शॉप नं.२९ तळ मजला, हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर, अमराई रोड, कर्जत ता. कर्जत, जि.रायगड ४१०२०१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक शरद नथू बडेकर व हेमा शरद बडेकर यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे मौजे कुशिवली तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत

| सर्व्हे नंबर हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| १५/१ | एकुण क्षेत्र ४-९२-०० हे आर पॉ | १-३१ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण. दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक १५/०५/२०२६

**खरेदीदारातर्फे वकील ॲड.वृषाली रघुनाथ मोरे**
मोबा. ८५३०१४६८५४
ऑफिस पत्ता शॉप नं.२९ तळ मजला, हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर, अमराई रोड, कर्जत ता. कर्जत, जि.रायगड ४१०२०१

**खरेदीदारातर्फे वकील ॲड. निलेश कान्हु मोरे**
मोबा. ९८२२६९११०९
ऑफिस पत्ता- शॉप नं.२९ तळ मजला, हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर, अमराई रोड, कर्जत ता. कर्जत, जि.रायगड ४१०२०१


## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक



# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग

दागिने-नविन डिझाइन्स



**मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.**

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

कृषीवल । रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। RGD/०१६/२०२६-२०२८



## निवडक

### पेणमध्ये राष्ट्रीय आगरी आध्यात्मिक संमेलनाची जय्यत तयारी

**रायगड** : पेण : अखिल भारतीय आगरी सामाजिक संस्थेच्या वतीने शुक्रवार दिनांक १५ मे २०२६ रोजी पेण नगरपालिकेच्या मैदानावर राष्ट्रीय आगरी आध्यात्मिक संमेलन मोठ्या उत्साहात आयोजित करण्यात आले आहे. आगरी समाजाची संस्कृती, परंपरा आणि अध्यात्मिक वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने आयोजित या भव्य मेळाव्याची जय्यत तयारी सध्या अंतिम टप्प्यात सुरू आहे.या संमेलनासाठी आयोजकांकडून साधारणतः पाच हजार नागरिकांच्या बसण्याची भव्य व्यवस्था करण्यात आली असून संपूर्ण परिसर सजावटीने उजळून निघाला आहे. कार्यक्रमासाठी पेण शहरासह रायगड जिल्ह्यातील विविध भागांतून तसेच राज्यभरातून समाजबांधव उपस्थित राहणार असल्याची माहिती अखिल भारतीय आगरी सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सूर्यकांत पाटील यांनी दिली. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ८ ते ११ या वेळेत भव्य शोभायात्रेने होणार आहे. त्यानंतर सकाळी ११ वाजता मुख्य मंडपात उद्घाटन सोहळा पार पडणार आहे. सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत मुख्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून विविध मान्यवरांचे मार्गदर्शन, समाज प्रबोधन आणि आध्यात्मिक विचार मांडले जाणार आहेत.दुपारी २ ते ३ या वेळेत भोजनाची व्यवस्था करण्यात आली असून त्यानंतर दुपारी ३ ते ५ या वेळेत भजन, प्रवचन, कीर्तन, धवला तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.ङ्गआगरी संस्कृतीला जोपासूया, नव्या पिढीला जोडूयाङ्ग हा संदेश देत आयोजकांनी समाजबांधवांना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. पेण शहरात या संमेलनाबाबत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठात माजी विद्यार्थी स्नेहमेळावा

**महाड** : डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे अंतर्गत ॲडव्हान्स डिप्लोमा इन वॉटर क्वालिटी मॅनेजमेंट प्रगत पदवीका अभ्यासक्रम आणि डिप्लोमा इन इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागाच्या वतीने माजी विद्यार्थी स्नेहमेळावा आयोजित करण्यात आला आहे. हा बहुप्रतीक्षित कार्यक्रम डिप्लोमा ऑडिटोरियम येथे सकाळी ९.३० वाजल्यापासून सुरू होणार असून विद्यापीठातील विविध वर्षांतील माजी विद्यार्थी मोठ्या उत्साहाने सहभागी होणार आहेत."Reconnect • Relive • Rejoice" या आकर्षक संकल्पनेवर आधारित हा स्नेहमेळावा माजी विद्यार्थ्यांना पुन्हा एकदा त्यांच्या जुन्या मित्र-मैत्रिणींशी, प्राध्यापकांशी आणि विद्यापीठाशी भावनिक नाते दृढ करण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करून देणार आहे. शिक्षण पूर्ण करून वॉटर ट्रीटमेंट या औद्योगिक क्षेत्रात आपली ओळख निर्माण करणारे तसेच ऊर्जा क्षेत्रांत यशस्वी वाटचाल करणारे अनेक माजी विद्यार्थी आणि आताचे यशस्वी उद्योजक व अभियंते या कार्यक्रमात सहभागी होऊन आपल्या अनुभवांची, संघर्षांची आणि यशोगाथांची मांडणी करणार आहेत.कार्यक्रमाची सुरुवात माजी विद्यार्थ्यांच्या नोंदणीने होणार असून त्यानंतर मान्यवर व माजी विद्यार्थ्यांचे स्वागत, विद्यापीठ गीत, महाराष्ट्र गीत आणि दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाला औपचारिक प्रारंभ होईल. जुन्या आठवणींना नव्याने उजाळा देत, प्रेरणा आणि मैत्रीचा सेतू पुन्हा एकदा मजबूत करणारा हा माजी विद्यार्थी स्नेहमेळावा निश्चितच संस्मरणीय ठरणार आहे.

### समुपदेशनाद्वारे होणार सार्वजनिक आरोग्य विभागाच्या बदल्या

**रायगड** : सार्वजनिक आरोग्य विभागातील गट-ब, गट-क आणि गट-ड कर्मचाऱ्यांच्या सर्वसाधारण बदल्यांसाठी समुपदेशन प्रक्रियेला गती देत स्वतंत्र शासन निर्णय निर्गमित करून महत्त्वाचे वेळापत्रक जाहीर केले आहे. सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर आणि राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि त्यात सुसूत्रता आणण्यात भर देण्यात आला आहे.सार्वजनिक आरोग्य विभागाच्या शासन निर्णय दि. १५ एप्रिल २०२६ नुसार समुपदेशनाद्वारे सर्वसाधारण बदल्या करण्याची कार्यपद्धती निश्चित करण्यात आली असून, त्या अनुषंगाने संचालक, आरोग्यसेवा यांनी आठ परिमंडळातील सर्व कार्यक्रम प्रमुख यांच्या बदल्यांचे टप्प्याटप्प्याने वेळापत्रक जाहीर केले आहे. जाहीर करण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार रिक्त पदांची यादी ६ मे २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यानंतर बदलीपात्र कर्मचाऱ्यांची सेवा ज्येष्ठता यादी ८ मे २०२६ रोजी प्रसिद्ध केली गेली. तसेच, प्रपत्र १ ते ५ तयार करून नागरी सेवा मंडळासमोर १० मे २०२६ रोजी सादर करण्यात आली. नागरी सेवा मंडळाकडून समुपदेशनाने बदलीचे अंतिम प्रस्ताव १५ मे २०२६ पर्यंत पाठवण्यात येणार आहेत. समुपदेशनाद्वारे करण्यात आलेल्या अंतिम बदल्यांचे आदेश ३१ मे रोजी वेबसाईटवर निर्गमित करण्यात येणार आहेत. या सर्व बदली प्रक्रियेवर देखरेख ठेवण्यासाठी चार वरिष्ठ अधिकाऱ्यांची निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या नव्या धोरणानुसार बदल्या करताना सेवा कालावधी, प्राधान्यक्रम, पसंतीक्रम, प्रशासकीय गरज तसेच दुर्गम भागातील सेवेला विशेष महत्त्व देण्यात आले आहे. अपंग कर्मचारी, गंभीर आजारांनी ग्रस्त कर्मचारी, विधवा महिला, पती-पत्नी एकत्रीकरण आणि शैक्षणिक कारणे यांसारख्या मानवी बाबींनाही प्राधान्य देण्यात आले आहे. बदली प्रक्रिया पूर्णपणे प्रशासकीय आणि पारदर्शक पद्धतीने राबविण्यात येणार आहे.

# अश्व तपासणीचा अलिबाग पॅटर्न चर्चेत!

**|| ग्लॅन्डर्सविरोधात अलिबागची ऐतिहासिक मोहीम || ३८० घोड्यांची तपासणी आणि अश्व आरोग्य पत्रिकांचे वितरण**

**। रायगड । प्रतिनिधी ।**

पर्यटननगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अलिबागमध्ये घोड्यांच्या आरोग्य सुरक्षेसाठी राबविण्यात आलेला अलिबाग पॅटर्न सध्या देशभर चर्चेचा विषय ठरत आहे. अलिबाग नगर परिषद आणि राज्याच्या पशुसंवर्धन विभागाच्या संयुक्त विद्यमाने देशातील पहिले अश्व ग्लॅन्डर्स तपासणी शिबीर यशस्वीरीत्या पार पडले. या उपक्रमांतर्गत तब्बल ३८० घोड्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली असून अश्व मालकांना अश्व आरोग्य पत्रिकांचे वितरण करण्यात आले.



रायगड जिल्ह्यात एकूण १,२८३ घोडे असून त्यापैकी मोठा हिस्सा अलिबाग परिसरात कार्यरत आहे. विशेषतः समुद्रकिनाऱ्यांवर पर्यटकांसाठी घोडेस्वारीची सेवा मोठ्या प्रमाणात उपलब्ध असल्याने या घोड्यांचे आरोग्य सुरक्षित ठेवणे प्रशासनासाठी अत्यंत महत्त्वाचे बनले आहे. याच पार्श्वभूमीवर ग्लॅन्डर्स या धोकादायक संसर्गजन्य आजाराविरोधात ही विशेष मोहीम राबविण्यात आली.

ग्लॅन्डर्स हा बर्कहोल्डेरिया मॅली या जीवाणूमुळे होणारा गंभीर आजार असून तो घोडे, गाढवे आणि खेचरांमध्ये वेगाने पसरतो. विशेष म्हणजे, हा झुनोटिक आजार असल्यामुळे प्राण्यांकडून मानवामध्येही संसर्ग होण्याची शक्यता असते. त्यामुळे पर्यटनाशी निगडित अश्वांची नियमित तपासणी आणि आरोग्य नोंदी ठेवणे अत्यावश्यक ठरते. शिबिरादरम्यान तज्ज्ञ पशुवैद्यकीय डॉक्टरांनी घोड्यांची सखोल तपासणी केली. रक्ताचे नमुने घेऊन ते हरियाणातील हिसार येथील अधिकृत प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहेत. बाधित प्राणी आढळल्यास त्वरित विलगीकरण आणि नियंत्रणात्मक उपाययोजना करण्यात येणार आहेत. तसेच घोड्यांच्या वाहतुकीवरही निर्बंध लावण्यात आले असून २० अंकी कोडयुक्त अश्व आरोग्य पत्रिका आणि अलिकडील निगेटिव्ह चाचणी अहवाल बंधनकारक करण्यात आला आहे.या मोहिमेमुळे घोड्यांच्या आरोग्य नोंदी डिजिटल स्वरूपात उपलब्ध होणार असून भविष्यात पशू आधार योजनेअंतर्गत त्याचा मोठा उपयोग होणार आहे. प्रशासनाच्या या उपक्रमामुळे अलिबाग पॅटर्न देशासाठी आदर्श ठरण्याची चिन्हे दिसत आहेत.

#### ग्लॅन्डर्सविरोधातील कडक उपाययोजना

ग्लॅन्डर्सग्रस्त घोड्यांवर कठोर नियम लागू करण्यात आले आहेत. बाधित प्राण्यांना पशुवैद्यकीय समितीच्या देखरेखीखाली वेदनारहित मृत्यू दिला जातो. मृतदेह संसर्ग टाळण्यासाठी तत्काळ जाळणे किंवा खोल खड्ड्यात पुरणे बंधनकारक आहे. तसेच तबेले आणि परिसर पूर्णपणे निर्जंतुक करण्यासाठी विशेष रसायनांचा वापर केला जात आहे.

#### अश्व आरोग्य पत्रिका ठरणार गेमचेंजर

अश्व आरोग्य पत्रिकेमुळे प्रत्येक घोड्याची ओळख, वैद्यकीय इतिहास आणि तपासणी नोंदी एका ठिकाणी उपलब्ध होणार आहेत. भविष्यात शासकीय योजनांचा लाभ मिळवण्यासाठी तसेच डिजिटल ट्रॅकिंगसाठी ही प्रणाली अत्यंत उपयुक्त ठरणार असून अश्व व्यवस्थापनात पारदर्शकता आणि सुरक्षितता वाढणार आहे.

## मूल्यमापन समितीची वारी ग्रामपंचायतीच्या दारी

**। पाली । प्रतिनिधी ।**

ग्रामीण भागात शाश्वत विकास, पर्यावरण संवर्धन आणि पारदर्शक प्रशासनाला चालना देण्यासाठी राबविल्या जाणाऱ्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियाना अंतर्गत पुणे जिल्ह्यातील बारामती तालुक्यातील २० ग्रामपंचायतींची तपासणी करण्यात आली.

रायगड जिल्ह्यातील सुधागड -पाली पंचायत समितीचे मूल्यांकन पथक यासाठी पाच दिवसीय बारामती दौऱ्यावर दाखल झाले होते. सुधागड-पाली पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी लता मोहिते यांच्या नेतृत्वाखालील सातसदस्यीय पथकाने बारामती मधील नामदार शरदचंद्र पवार व माजी उपख्यमंत्री कै अजितदादा पवार यांच्या गावची ग्रामपंचायत काटेवाडीसह कन्हेरी, चाळीसगाव खुर्द, गोजूबावी, कटफळ, कोळोली, सदोबाचीवाडी, या प्रमुख ग्रामपंचायतीसह एकूण वीस ग्रामपंचायतींना भेटी देऊन तेथील विकासकामांचा आढावा घेतला. या दौऱ्यानिमित्त पहिल्या दिवशी दिनांक ४ मे रोजी बारामती पंचायत समितीला पथकाने भेट दिली त्याप्रसंगी बारामती पंचायत समितीचे सभापती किरण तावरे यांच्यासह पंचायत समिती सदस्य व कार्यकर्त्यांनी कमिटीचे स्वागत केले. तसेच संबंधित गावातील सरपंच आणि ग्रामस्थांकडून पथकाचे जंगी स्वागत करण्यात आले. त्यामध्ये लोकाभिमुख आणि सक्षम प्रशासन, स्वनिधी, सीएसआर आणि लोकवर्गणीचा प्रभावी वापर, स्वच्छतेसह सौरऊर्जेचा वापर, मनरेगा व इतर शासकीय योजनांची प्रभावी गावपातळीवरील अंमलबजावणी, संस्थांचे बळकटीकरण, सामाजिक न्याय, आर्थिक स्तर उंचावणे, लोकचळवळीच्या माध्यमातून विकास यांचा समावेश आहे. वरील ८ मुद्द्यांची सर्व ग्रामपंचायत मधील या पथकाने सखोल तपासणी केली.



#### पुरस्कारासाठी होणार निवड

अभियान कालावधीत केलेल्या कामगिरीच्या आधारे हे पथक ग्रामपंचायतींना गुण देणार आहे. या गुणांकनाच्या आधारे उत्कृष्ट काम करणाऱ्या ग्रामपंचायतींची राज्यस्तरीय पुरस्कारासाठी निवड केली जाईल. तपासणी पथकात अध्यक्ष म्हणून गटविकास अधिकारी पाली पंचायत समिती लता मोहिते, सचिव तथा विस्तार अधिकारी सुनील अहिरे, सदस्य अनिल जाधव, प्रोबेशनरी गटविकास अधिकारी सिडिपीओ तेजस्मिता करंगुटकर, ग्रामविकास अधिकारी सचिन केंद्रे, पत्रकार विनोद भोईर, तालुका समन्वयक राजेंद्र आंब्रे यांचा समावेश होता

## द्रोणागिरीमध्ये विराट हिंदू संमेलनाचे आयोजन

**। उरण । प्रतिनिधी ।**

सकल हिंदू समाज, द्रोणागिरी यांच्या वतीने येत्या १७ मे रोजी एका भव्य विराट हिंदू संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. हिंदू संस्कृतीचे जतन आणि समाजातील एकजूट वाढवण्याच्या उद्देशाने आयोजित हा सोहळा उरण तालुक्यातील द्रोणागिरी येथील सेक्टर ५०, देवकृपा सोसायटी समोर संध्याकाळी ६ वाजता संपन्न होणार आहे.

या संमेलनासाठी कोकण प्रांताचे धर्म जागरण प्रमुख राजेश कुंटे हे मुख्य वक्ते म्हणून उपस्थित राहणार असून ते उपस्थितांना मार्गदर्शन करतील. तसेच, या सोहळ्याला श्री श्री १००८ महामंडलेश्वर राम कृष्णानंद सरस्वती आणि रमेश यादव यांची प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती लाभणार आहे. या विराट संमेलनाची सुरुवात एका भव्य दिंडी सोहळ्याने होणार आहे. त्यानंतर विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण करण्यात येईल. मान्यवरांच्या मार्गदर्शनासह हिंदू धर्मातील विचारांचे आदान-प्रदान हे या सोहळ्याचे मुख्य आकर्षण असेल. द्रोणागिरी आणि उरण परिसरातील समस्त हिंदू बांधवांनी या सोहळ्याला उपस्थित राहावे, असे आवाहन सकल हिंदू समाजाच्या वतीने केले आहे.

## पेण नगरीत विचारांचा जागर

**। पेण । प्रतिनिधी ।**

भारतीयत्वाचे सत्व, फक्त हिंदुत्वः या घोषवाक्याने संपूर्ण पेण शहरात हिंदुत्वाच्या विचारांची नवी चेतना जागवणारा विशेष मेळावा येत्या रविवार दि. १७ मे रोजी आयोजित करण्यात आला असून, हिंदू समाजाच्या एकजुटीचा हा जागर ठरणार असल्याची चर्चा शहरभर रंगू लागली आहे.

देव - देश आणि धर्मासाठी, हिंदू अन हिंदुत्वासाठी या भावनेतून आयोजित या कार्यक्रमात हिंदू विचारप्रवर्तक शरद पोंक्षे यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. आपल्या प्रभावी वक्तृत्व शैलीतून हिंदुत्व, राष्ट्रवाद आणि सांस्कृतिक अस्मिता यांवर ते भाष्य करणार असल्याने हिंदुत्ववादी कार्यकर्ते आणि युवकांमध्ये विशेष उत्साह पाहायला मिळत आहे.

भगव्या ध्वजाच्या साक्षीने होणारा हा कार्यक्रम पेणमधील भोगेश्वरी नदी, विसर्जन घाट, भुंडा पुलाजवळ आयोजित करण्यात आला असून सायंकाळी ६ ते ९ या वेळेत तो पार पडणार आहे.

सकळ हिंदू समाज बाजारपेठ समिती, पेण यांच्या वतीने आयोजित या मेळाव्याला विविध हिंदुत्ववादी संघटनांचे कार्यकर्ते, धर्मप्रेमी नागरिक आणि युवक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

## कॅप्टन विठ्ठलराव कदम यांना सैनिक रत्न पुरस्कार

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

युद्धवीर कॅप्टन विठ्ठलराव नारायणराव कदम यांना सैनिक फेडरेशन महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने सैनिक रत्न पुरस्कार जाहीर झाल्याने त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

युद्धवीर कॅप्टन विठ्ठलराव नारायणराव कदम हे भारतीय लष्करात ९ जानेवारी १९५७ साली भरती झाले,३२ वर्ष सेवा करून १ ऑक्टोंबर १९८८ रोजी सेवा निवृत्त झाले. निवृत्त होईपर्यंत त्यांनी युद्ध मोहिमांमध्ये शौर्याने सहभाग नोंदविला आहे.गोवा मुक्ती संग्राम १९६०, चीनचे आक्रमण १९६२, पाकिस्तानचे आक्रमण १९६५,



भारत-पाकिस्तान युद्ध १९७१ (पश्चिम भाग) त्यातून बांगला देशाची निर्मिती,

भारत-पाकिस्तान युद्ध १९७१ (पूर्व भाग) ब्ल्यू स्टार ऑपरेशन १९८४ या सेवकाळात त्यांना सैन्य सेवा मेडल, समर सेवा मेडल १९६५, पूर्वी स्टार मेडल,पश्चिमी स्टार मेडल,फील्ड एरिया मेडल, नाइन इयर लॉंग सर्विस मेडल,२५ वी आझादी मेडल, संग्राम मेडल,३० वर्ष सेवा मेडल प्राप्त झाले असून अनेक सामाजिक संघटना, ग्राम पंचायत वावंढळ यांच्या वतीने शौर्य पुरस्कार,कोयना क्षत्रिय मराठा समाज यांच्या वतीने जीवन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे.

सेवा निवृत्तीनंतरही त्यांनी समाजसेवेचा वसा कायम ठेवला. माजी आमदार सुरेश लाड यांच्या शिफारशीतून त्यांना महाराष्ट्र सरकारने दिले. त्या पाच वर्षात उल्लेखनीय कार्य केले. तंटामुक्ती अभियानाचे अध्यक्ष म्हणून गावातील सामाजिक सलोखा जपण्यासाठी मोलाचे योगदान दिले. तसेच गावातील सार्वजनिक जमिनीच्या प्रश्नांमध्ये प्रतिनिधी म्हणून जबाबदारी पार पाडली.माजी सैनिक व वीरमाता, विधवा पत्नी यांना शासनाच्या विविध योजना व पेन्शन मिळवून देण्यासाठी शासनाकडे सातत्याने पत्रव्यवहार करून अनेक कुटुंबांना न्याय मिळवून देण्याचे महान कार्य त्यांनी केले आहे. युद्धवीर कॅप्टन विठ्ठलराव नारायणराव कदम यांना सैनिक रत्न पुरस्कारासाठी निवड झाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## रतिश पाटील याचे अमेरिकेत उत्तुंग यश

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर अलिबागच्या मातीने सातासमुद्रापार यशाचा झेंडा रोवला आहे. मोठे शहापूर येथील रहिवासी संतान सुदाम पाटील व यशोदा पाटील यांचा सुपुत्र रतिश पाटील याने अमेरिकेतील फ्लोरिडा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, मेलबर्न येथून मास्टर इन एरोस्पेस इंजिनीयरिंग ही पदवी प्रथम श्रेणीत संपादन करून जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

रतिशचे प्राथमिक शिक्षण ना. ना. पाटील हायस्कूल, पोयनाड येथे झाले असून, उच्च माध्यमिक शिक्षण त्याने अलिबागमध्येच प्रथम श्रेणीत पूर्ण केले. त्यानंतर पुणे येथील प्रतिष्ठित ऑल इंडिया श्री शिवाजी मेमोरियल सोसायटी अभियांत्रिकी महाविद्यालयातून त्याने मेकॅनिकल अभियांत्रिकीची पदवी घेतली.



विशेष म्हणजे, अभियांत्रिकीचे शिक्षण घेत असतानाच सन २०२२ मध्ये त्याने ङ्गगरुडाश्वफ या एरोनॉटिकल टीममध्ये डिझाईन विभागाचे नेतृत्व केले होते. त्याच्या नेतृत्वाखालील टीमने पाणी वाहू विमानाचे एक अभिनव डिझाईन साकारले होते, ज्याने जागतिक स्तरावर भारताला प्रथम क्रमांक मिळवून दिला.

उच्च शिक्षणाची ओढ रतिशला अमेरिकेपर्यंत घेऊन गेली. २०२४ मध्ये फ्लोरिडा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथे त्याने प्रवेश मिळवला. तिथेही त्याने आपली चमक दाखवत ही पदवी केवळ प्रथम श्रेणीतच मिळवली नाही, तर त्याच्या उत्कृष्ट शैक्षणिक कामगिरीबद्दल विद्यापीठाकडून त्याला २०२४-२०२५ या मानाच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

ग्रामीण भागातील एका तरुणाने जागतिक दर्जाच्या शैक्षणिक संस्थेत मिळवलेल्या या यशाबद्दल संपूर्ण शहापूर विभागात आनंदाचे वातावरण आहे.

## बालगृहातील बालकांसाठी 'राजा छत्रपती' चित्रपटाचे प्रक्षेपण



**। कर्जत । प्रतिनिधी ।**

जिल्हा परिविक्षा अनुरक्षण संघटना संचलित मुलांचे निरीक्षणगृह व बालगृह, कर्जत (रायगड) येथील बालकांसाठी ऐतिहासिक विषयाची आवड निर्माण व्हावी तसेच शिक्षणासोबत मनोरंजनातून इतिहासाची माहिती मिळावी या उद्देशाने विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

मंगळवारी ( दि.१३) कर्जत येथील राज नोव्हा सिनेमा गृहात सकाळी १०.३० ते दुपारी २ वाजेपर्यंत बालकांना राजा छत्रपती हा ऐतिहासिक चित्रपट दाखवण्यात आला. इतिहास विषयाचे ज्ञान अधिक प्रभावी व मनोरंजक पद्धतीने बालकांपर्यंत पोहोचावे, छत्रपतींच्या कार्याची प्रेरणा मिळावी आणि संस्कारमूल्यांची जपणूक व्हावी, यातून स्वराज्याचा इतिहास त्यांना अवगत व्हावा हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता.या उपक्रमासाठी राज नोव्हा सिनेमा गृहाचे मालक मोहनराज तटपल्ली यांनी विशेष सहकार्य करत बालकांसाठी चित्रपटाचे मोफत प्रक्षेपण आयोजित केले. यासोबतच चित्रपटादरम्यान बालकांना पॉपकॉर्न व फ्रुटीचेही मोफत वाटप करण्यात आले. त्यामुळे बालकांनी मोठ्या उत्साहात व आनंदात चित्रपटाचा आस्वाद घेतला.

राजा छत्रपती हा चित्रपट ऐतिहासिकदृष्ट्या प्रेरणादायी असून प्रत्येकाने आपल्या कुटुंबासमवेत पाहावा, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे सचिव सुरेश (भाऊ) खानविलकर यांनी विशेष प्रयत्न केले. सचिवांसह संस्थेच्या कर्मचारीवर्गानेही बालकांसोबत चित्रपट पाहत त्यांचा आनंद द्विगुणित केला.

संस्थेच्या वतीने सिनेमा गृहाचे मालक मोहनराज तटपल्ली यांचे विशेष आभार मानण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत त्यांनी या उपक्रमासाठी दिलेले सहकार्य मोलाचे असल्याचे संस्थेकडून सांगण्यात आले.

**अश्वस्वारांनी कौशल्य दाखवून जिंकली मने | गड किल्ल्यांवर मोहिमेतून ऐतिहासिक जागर**

# शिवचरित्र प्रसार अश्वमोहिमेची महाड येथे समाप्ती

**। महाड। उदय सावंत ।**

छत्रपती शिवाजी महाराज यांचा इतिहास युद्ध कला व अश्वज्ञान जन तरुणांमध्ये पोहोचावे यासाठी शिवचरित्र प्रसार अश्व मोहीम अभिनंदन सुरुवात करण्यात आली होती. छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थान असलेल्या शिवनेरी ते समाधीस्थळ असलेले किल्ले रायगडपर्यंत ही मोहीम आखण्यात आली होती. शिवस्मारक समिती महाड व शिवसेना शिंदे कट यांच्या वतीने महाड येथील भिलारे मैदान या ठिकाणी गोवा राज्याचे क्रीडा व सांस्कृतिक मंत्री रमेश तवडकर यांच्या उपस्थितीत याचा सांगता समारंभ संपन्न झाला. यावेळी अश्वस्वारांनी वेगवेगळी कौशल्य दाखवून महाडकरांचे मन जिंकून घेतले.

सांस्कृतिक कार्य विभाग तथा सांस्कृतिक कार्य संचालनालय महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने दिग्विजय प्रतिष्ठान आयोजित शिवचरित्र प्रसार अश्वमोहीम राबविण्यात आली. रोहिडेश्वर येथे स्वराज्याची शपथ ३८१ वर्षपूर्ती निमित्त छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थान असलेल्या किल्ले शिवनेरी ते स्वराज्याचे राजधानी व छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधी स्थळ असलेल्या किल्ले रायगड यादरम्यान पंचवीस गडकिल्ल्यांवरून ही अश्व मोहीम राबविण्यात आली. १६ एप्रिल रोजी सुरू करण्यात आलेल्या ही मोहीम चार टप्प्यात घेण्यात आली. या मोहिमेचा सांगता समारंभ महाड येथील भिलारे मैदान येथे शिवस्मारक समिती महाड व शिवसेना शिंदे गटाचे मंत्री भरत गोगावले यांच्या वतीने करण्यात आला. याप्रसंगी गोवा राज्याचे क्रीडा व सांस्कृतिक मंत्री रमेश तवडकर, महाड नगरीचे नगराध्यक्ष सुनील कविस्कर, महानगरीचे नगराध्यक्ष, प्रसिद्ध अभिनेते अजयजी पुरकर, वधुत गांधी, गुणेश पुरंदरे अश्वदल संचलक, प्रसिद्ध अभिनेत्री अस्मिता शेवाळे, शिवस्मारक समितीचे थोरात, भाजपा नगरसेवक सुमित पवार, महाड शहर संपर्कप्रमुख सिद्धेश पाटेकर, महाड शहर प्रमुख डॉ. चेतन सुर्वे, नितीन पावले, नगरसेविका विद्या देसाई, नगरसेविका पूजा गोविलकर, आधी मान्यवर उपस्थित होते. नगराध्यक्ष सुनील कविस्कर यांनी शिवस्मारकाच्या शहरातील जागेवरती सुंदर असे शिवशंकर मंदीर उभारणार असल्याचे त्यावेळी जाहीर केले. या दरम्यान अश्व संचलन करणारे अश्वश्वरांचे कौतुक करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राकेश मेहता यांनी केले.






## राशीभविष्य

- **मेष** : महत्त्वाचे निर्णय तातडीने घ्यावेत. आर्थिक बाबतीत तडजोडीचं धोरण ठेवावं. बाकी चिंता नसावी.
- **वृषभ** : उपजत कला-गुणांचा विकास होईल. व्रेम प्रकणात समाधान लाभेल. वाहनाचा वापर जपून करा.
- **मिथुन** : कारकिर्दीला नवी दिशा मिळेल. चैनीवर अधिक खर्च होईल. धार्मिक स्थळाची यात्रा घडेल.
- **कर्क** : मनाविरूध्द घटना संभवतात. आपलंच खरं हा अट्टाहास दूर ठेवा. यांत्रिक क्षेत्रात प्रगती होईल.
- **सिंह** : कौटुंबिक जबाबदाऱ्या वाढतील. मोठ्या खरेदीचा मार्ग सुकर होईल. प्रक्रिया उद्योगात उत्कर्ष होईल.
- **कन्या** : इतरांवर अधिक विश्वास टाकू नका. प्रवासाचे बेत लांबणीवर टाकावे. प्रकृतीस त्रास संभवतो
- **तूळ** : विवाहाचे प्रयत्न सफल होतील. ग्रहमानाची विशेष अनुकूलता राहील. बेरोजगारांना दिलासा मिळेल.
- **वृश्चिक** : ज्येष्ठांचं मार्गदर्शन कामी येईल. अनावश्यक खर्च टाळायला हवा. सरकारी कामं मार्गी लागतील.
- **धनु** : दिलासादायक घटना घडतील. स्थावर, वाहन सौख्य लाभेल. गृहसजावटीच्या क्षेत्रात प्रगती होईल.
- **मकर** : कामाचा उत्साह वाढता राहील. जुनी येणी सहजगत्या वसूल होतील. मानसिक स्वास्थ्य लाभेल.
- **कुंभ** : सरकारी कामं रखडतील. महत्त्वाच्या भेटी लांबणीवर पडतील. आर्थिक बाबतीत ओढाताण होईल.
- **मीन** : व्यवहारात फसवणूक संभवते. मतभेद वा वाद-विवादापासून दूर रहावं. पुरेसा संयम बाळगावा.

स्टाईल स्टेटमेंट

## फॉर परफेक्ट कुर्ता लूक

कुर्ता हा अत्यंत आरामदायी पेहराव आहे. कोणत्याही ऑकेजनला, कोणत्याही ऋतूत तो कॅरी करता येतो. यासोबत वेगवेगळे बॉटम्स ट्राय करता येतात. जीन्स, ट्राउझर्स, लेगिंग्ज, पलाझो, पँट यापैकी कशावरही कुर्ता मॅच करता येतो. अगदी स्कर्टवरही तुम्ही कुर्ता घालू शकता. म्हणूनच उन्हाळ्यातल्या कंफर्टसाठी बॉलिवूड दिवाज कुर्त्याला पसंती देत आहेत. तुम्हीही स्टायलिश आणि कंम्फर्टेबल लूकसाठी या दिवाजकडून प्रेरणा घेऊ शकता.

✲ आदिती राव हैदारीने फ्लेअर्ड स्कर्टवर स्लीव्हलेस कुर्ता कॅरी केला होता. पांढऱ्या रंगाचा कुर्ता आणि स्कर्टवर निळ्या ब्लॉक प्रिंट्स शोभून दिसत होत्या. त्यावर तिने नेव्ही ब्लू दुपट्टा घेतला होता. सिल्व्हर ज्वेलरीने हा लूक खुलवला होता. हा देसी लूक तुम्ही कधीही कॅरी करू शकता.

(क्रमश:)

## १५ मे

दिन विशेष

**१९९४ :** प्रसिद्ध चित्रकार पी.सरदार यांचे निधन.
**२०१३ :** माजी केंद्रीय मंत्री ब्रजकिशोर त्रिपाठी यांनी समता क्रांती दल हा पक्ष स्थापन केला.
**२०१७ :** 'तोंडी तलाक' च्या कायद्यासाठी केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात यासंबंधीची भूमिका स्पष्ट केली.
**२०१८ :** कर्नाटकात काँग्रेसने धर्मनिरपेक्ष जनता दलास पाठिंबा देत कुमारस्वामींना मुख्यमंत्रीपदाची ऑफर दिली.

सफर देशांची

## सुंदर मॅसेडोनिया

मॅसेडोनिया हा दक्षिणपूर्व युरोपातला देश आहे. एके काळी इथे राजेशाही होती. मॅसेडोनियन साम्राज्य बऱ्याच मोठ्या भूभागावर पसरलं होतं. मात्र आता या देशाचा आकार बराच छोटा आहे. स्कॉप्जे ही मॅसेडोनियाची राजधानी. बल्गेरिया, ग्रीस, सर्बिया आणि अल्बानिया हे याचे शेजारी देश. मॅसेडोनिया हा चारही बाजूंनी जमिनीने वेढलेला देश आहे. माउंट कोराब हे या देशातलं सर्वात उंच शिखर. या देशात मोठ्या टेकड्या, खोल दऱ्या आणि त्याच्या सभोवताली पर्वतरांगा असं निसर्गसौंदर्य पहायला मिळतं. देशात ११०० पेक्षा जास्त पाण्याचे स्रोत आहेत. यात ओहरिड, प्रेस्पा, डोइरॅन अशा तलावांचा समावेश आहे. ब्रॅगॅल्निका, सिरना आणि वरदार या इथल्या प्रमुख नद्या आहेत. वरदान नदी या देशाच्या मधून वाहत ग्रीसपर्यंत जाते. मॅसेडोनियातलं तापमान सौम्य स्वरुपाचं असतं. इथे विविध प्रजातींचे प्राणी आणि झाडंझुडपं पहायला मिळतात. या देशात तीन राष्ट्रीय उद्यानं आणि संरक्षित प्रकल्प आहेत. अस्वलं, हरणं आणि लांडगे देशाच्या डोंगराळ भागात फिरताना दिसतात. या देशात झाडांच्या ३५०० पेक्षा अधिक प्रजाती पहायला मिळतात.

### पंचांग

**शुक्रवार, १५ मे २०२६**
पराभवनाम संवत्सर शके १९४८,
वैशाख कृ. १३/१४, चंद्रराशी : मेष,
नक्षत्र : अश्विनी, योग : आयुष्मान,
सूर्योदय ६.०६, सूर्यास्त ७.०४

### फॉरवर्ड्स


**झूठ कहूँ तों लफ़्ज़ों क़ा दम घुटता हैं...**

**सच कहूँ तों लोग़ नाराज़ हो जातें हैं...!**

आरोग्यमंत्र

## पित्ताशयात खडे का होतात ?

शरीरामध्ये उजव्या बाजूला यकृत असते. यकृताच्या खाली पित्ताची पिशवी असते. तिला पित्ताशय असे म्हणतात. यकृतात तयार होणारे पित्त या पिशवीतून लहान आतड्यात येते. स्निग्ध पदार्थाचे पचन होण्यासाठी पित्त आवश्यक असते. पित्ताशयात जंतूंमुळे दाह झाल्यावर बऱ्याचवेळा नंतर खडे तयार होतात. या खड्यांचे दोन प्रकार आहेत. कोलेस्टेरॉल ७० टक्क्यांच्या वर असलेले कोलेस्टरॉल खडे, हा पहिला व कोलेस्टेरॉल १० टक्क्यांहून कमी असलेले रंगद्रव्य खडे, हा दुसरा प्रकार. जंतूसंसर्गामुळे पित्ताशयात प्रथिनयुक्त पदार्थ तयार होतात (पेशी नष्ट झाल्यामुळे). या प्रथिनयुक्त पदार्थांच्या सहाय्याने मग इतर क्षार तेथे गोळा होतात व मग खडे तयार होतात. विषमज्वर झालेल्या रुग्णामध्येही कालांतराने पित्ताशयात खडे तयार होतात. चाळीशी ओलांडलेल्या दोन-तीन मुले झालेल्या, लठ्ठ स्त्रीमध्ये पित्ताशयातील खडे होण्याचे प्रमाण जास्त असते. पित्ताशयात खडे झाले तरी कित्येक वेळा कोणतेही लक्षणे निर्माण होत नाहीत. मात्र काही वेळा ताप, खूप जीवघेणी वेदना, हुडहुडी भरणे अशी लक्षणे दिसून येतात. वेदना खूपच तीव्र व असह्य असते. त्यामुळे ताबडतोब तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा. दवाखान्यात कळ .थांबण्यासाठी मॉर्फीन किंवा पेंटोझोकेनचे इंजेक्शन देतात. काही औषधांचा वापर करून हे खडे विरघळवता येतात. परंतु पुन्हा खडे होण्याची शक्यता असतेच. पित्ताशय काढून टाकण्याची शस्त्रक्रिया यात खूप उपयुक्त ठरते. पित्ताशय काढून टाकले, तरी व्यक्ती अगदी सामान्य आयुष्य जगू शकते.



### फॅशन पॅशन

✲ स्लीव्हलेस टी शर्ट घेताना फिटिंगकडे नीट लक्ष द्या. स्लीव्हलेस टी शर्टचं फिटिंग महत्त्वाचं नसतं, हा एक गैरसमज आहे. प्रत्यक्षात योग्य फिटिंगचा टी शर्ट घेणं महत्त्वाचं असतं. आरामदायी फिटिंग महत्त्वाचं आहे. फार ढगळ टी शर्ट घातल्याने तुम्ही खूप विचित्र दिसू शकता.

✲ उन्हाळ्यात फार गडद रंगाचे टी शर्ट घालून शकता. सौम्य रंगाचे टी शर्ट थंडावा देतात. त्यामुळे पांढरा, ग्रे, बेच आणि आकाशी अशा रंगांना प्राधान्य द्या.

(क्रमश:)

करिअरवाटा

## आवडीतून व्यवसाय

पाळीव प्राण्यांचं पालन करणं, त्यांची योग्य देखभाल करणं हे अत्यंत कठीण आणि वेळखाऊ काम असतं. पाळीव प्राण्यांना नियमित फिरायला नेणं, त्यांना वेळच्या वेळी आवश्यक तो आणि आवश्यक तेवढा आहार देणं, स्वच्छता राखणं, वेळच्या वेळी लसीकरण करून घेणं या बाबी गरजेच्या ठरतात. यामध्ये कसूर अथवा विलंब झाल्यास प्राण्याचं आरोग्य धोक्यात येऊ शकतं. म्हणजेच कामाच्या व्यापात इतका वेळ हाताशी नसेल तर बरेच प्रश्न निर्माण होतात. या पार्श्वभूमीवर आता कुत्र्याच्या देखभालीसाठी खास केंद्रं सुरू करण्यात येत आहेत. ही व्यावसायिक केंद्रं असल्यानं त्यांच्याकडून सेवा घेताना पाळीव प्राण्यांच्या देखभालीसाठी शुल्क द्यावं लागतं. यात काही अन्य सुविधांचाही समावेश होतो. उदाहरणार्थ पाळीव कुत्र्याला नियमित फिरायला नेण्यासाठी वेळ नसेल तर 'डॉग वॉकर'ही जबाबदारी घेतो. एकूणच प्राणीप्रेमींसाठी ही कारकिर्दीची नवी वाट उत्तम प्राप्ती करून देणारी ठरत आहे. इच्छुक उमेदवार डॉग वॉकर म्हणून काम करु शकतात. प्रत्येक कुत्र्यासाठी विशिष्ट रक्कम या पध्दतीनं मानधन मिळत असल्यामुळे चांगलं अर्थार्जन होतं. आगामी काळात हा सेवा उद्योग बहरणार आहे. त्यामुळे याची दखल घ्यायला हवी.



खेचाखेची

### पावती फाड

स्थळ पुणे!

**पोलिस** - हेल्मेट नाही? चल पावती फाड.

**चालक** - तिकडं मल्ल्या, निरव-ललित मोदी हजारो करोड...

.

.

**पोलिस** - ते फेसबुकवर टाक, इथं गप पावती फाड.

वेगळं काही

फिलिपीन्समधली कबुतरांची शर्यत प्रसिद्ध आहे. मॅकआर्थर रेस या नावाने ती ओळखली जाते. या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या कबुतरांना ६०० किलोमीटर अंतर कापावं लागतं. ही स्पर्धा कबुतरांच्या जीवावरही बेतते. इथल्या लेईटे बेट ते मॅकआर्थर शहर अशी ही स्पर्धा असते. या दरम्यान कबुतरांना समुद्रावरून उडायचं असतं. शिकारी पक्ष्यांचा धोका मोठ्या प्रमाणावर असतो. तसंच काही कबुतरं पारध्यांच्या जाळ्यात सापडतात. काहींची शिकारही होते. फिलिपीन्सचे रहिवासी नेल्सन चुआ या स्पर्धेचं आयोजन करतात. ही स्पर्धा म्हणजे फिलिपीन्सची ओळख असल्याचं त्यांचं म्हणणं आहे. भारत,चीन, तैवानसारख्या देशांमध्येही आता कबुतरांच्या शर्यतीची लोकप्रियता वाढत चालली आहे.

स्मार्ट टॉक

## प्रवासाची पूर्वतयारी

सुट्टीच्या या काळात प्रवासाला निघताना आपल्या लूकला नवं परिमाण देणारी बॅग व्यक्तिमत्त्वही अधोरेखित करत असते. सध्याचा पर्यटनाचा हंगाम लक्षात घेता वेगवेगळ्या पद्धतीच्या बॅग्ज बाजारात आल्या आहेत. त्यांच्याविषयी...

✲ डबल्स बॅग - ही बॅग बॉक्सच्या आकारात असून सॉफ्ट असते. हँडल आणि स्ट्रीप्स असल्याने पकड चांगली असते. या दोन्हींमुळेच बॅग हवी तशी ॲडजेस्ट करता येते. ✲ मेसेंजर ट्रॅव्हल बॅग - या बॅग्ज मध्यम आकाराच्या असतात. बरेच कप्पे असल्याने त्यात छोट्या आकाराच्या वस्तू व्यवस्थित ठेवता येतात. ✲ डबल कंपार्टमेंट ट्रॅव्हल बॅग - प्रवासात भरपूर सामान बरोबर असेल तर ही बॅग सोयिस्कर ठरू शकते. लाईटवेट असल्याने त्रासही होत नाही. इस्त्री केलेले कपडे खराब होऊ नयेत म्हणून या बॅगेत नेट डिव्हायडिंग पॅडची सुविधा असते. ✲ लेदर बॅग्ज - ड्युरेबल आणि एलिगंट बॅगच्या शोधात असाल तर हा पर्याय सर्वोत्तम आहे. महत्त्वाचं म्हणजे या बॅगमध्ये अवजड सामान सहज कॅरी करता येतं. लेदरबॅग्जमध्ये २५० पेक्षा अधिक व्हरायटी उपलब्ध आहेत. या बॅग्जची किंमत तीन हजारापासून सुरू होते.



## सुडोकू १०३


| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | | | ६ | ५ | | ७ | | |
| ४ | | | | | | | १ | |
| ३ | १ | ५ | | ७ | | ९ | | |
| ५ | | | ९ | १ | | २ | | |
| १ | | | | | | | | ९ |
| | | ८ | | ३ | २ | | | ७ |
| | | ३ | | २ | | ५ | ४ | ८ |
| | ५ | | | | | | | २ |
| | | ४ | | ८ | ७ | | | १ |

**टीप** -
✲ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ x ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
✲ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
✲ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू १०२ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | ९ | ४ | ५ | २ | ७ | ३ | ६ | १ |
| १ | ७ | २ | ९ | ६ | ३ | ८ | ४ | ५ |
| ५ | ६ | ३ | ८ | १ | ४ | ९ | ७ | २ |
| ९ | ८ | ७ | ६ | ३ | ५ | १ | २ | ४ |
| ४ | १ | ५ | ७ | ९ | २ | ६ | ८ | ३ |
| २ | ३ | ६ | ४ | ८ | १ | ५ | ९ | ७ |
| ३ | ५ | ९ | २ | ४ | ८ | ७ | १ | ६ |
| ७ | २ | ८ | १ | ५ | ६ | ४ | ३ | ९ |
| ६ | ४ | १ | ३ | ७ | ९ | २ | ५ | ८ |

## शब्दकोडे क्रमांक १०३




**आडवे शब्द :-**
१) विश्व,दुनिया
३) मंदवासर
५) धोकादायक
८) शंकर
१०) सौंदर्य
११) आयातकर
१२) च्या शिवाय
१३) वस्तू,माल
१४) नवाकोरा
१६) जाडसर पीठ
१७) जास्तीत जास्त
१८) मोठ्या आवाजात हाक मारणे
१९) फुरसतीप्रमाणे
२१) वर्ष
२४) वेदनेची उसळी
२६) कलंडणे,सांडणे
२७) कशा प्रकारचा
२८) दरवळ
३०) झकास
३१) मोगऱ्याची एक जात
३२) बाज विणण्याची सुती पट्टी
३३) निम्म्याच्या निम्मा
३४) तपासनीस
३५) बाण
३६) रवाळ
३८) केमिस्ट्री विषयाला मराठी नाव
४१) शिल्लक राहिलेली रक्कम
४२) हिस्सा,भाग
४३) जरब,भीती
४४) सदन
४६) शाब्दिक भांडण
४८) मोत्याची माळ
४९) पुन्हा
५१) लाकडी जिना
५२) एकरुप
५३) तिखट मसालेभात
५५) पवित्र
५७) भावनांचे इंद्रिय
५८) नांगरणी,पेरणी इ.काम
५९) उणीव,वाळवी
६०) तेव्हा(ग्रा.)
६१) रजनी
६२) व्यर्थ,कवडीमोल
६३) डाव,डागणी
६४) मन,विचार
६६) मुलगा
६७) घट्ट मारलेली विळखा
७०) भयंकर,भयानक
७१) प्रामाणिक
७२) पाढ्यातील दोन
७३) एक प्रश्नार्थक अक्षर

**उभे शब्द :-**
१) आवश्यक तेवढे
२) वावडी,अफवा
३) थंडीने अंगावर काटा उभारणे
४) रुपेरी मुलामा
५) हिंदीत पत्र
६) रविवासर
७) विविध
८) भारवाहक
९) क्रिकेटमधील धाव
१३) चीजवस्तू
१४) हात धुणे
१५) अस्वल
१६) रसदार
१७) सत्वांश
२०) हानी,नुकसान करणारे
२२) जीव
२३) किल्लेदार
२५) यज्ञ
२७) रेशमी धोतर
२८) गवंड्याकडील मोठा हातोडा
२९) चेष्टा
३०) सैन्याचा तळ
३१) दहावी रास
३३) फुलाचा एक भाग
३४) पंख
३५) आयुध
३७) वैरी
३९) सामान्य
४०) पोवाडे रचणारा
४१) पोते
४२) चामड्याचा धागा
४५) निष्फळ आक्रोश
४६) बुटका
४७) निर्णय,विल्हेवाट
४८) फुरसत
४९) प्रतिष्ठा
५०) शोध,माग
५२) अगदी सारखे प्रमाण
५३) तांबड्या रंगाचा समुद्रातील मासा
५४) हिंदुस्थानी
५६) दिखाऊ,वरपांगी
५९) लेखणी
६०) ग्रामपंचायतीतील एक महत्वाचे पद
६१) गाढवी
६२) माणूसजात
६५) माराची उमटलेली खूण
६६) त्या प्रकारचा
६८) घट्ट,दाट
६९) दोस्त

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



विनायक दळवी

# ही फटकेबाजी आली कुठून?

यंदा आयपीएल स्पर्धेत ज्या वेगात आणि कमी चेंडू धावा फटकावल्या जात आहेत ते पाहून स्वतः फलंदाज असलेल्या, सुनील गावस्कर यांनी देखील उद्वेगाने म्हटलं की, आता मीच गोलंदाजी कशी करावी यासाठीचे मार्गदर्शन शिबीर उघडतो. याचा मतितार्थ एवढाच होता की गावस्करांना देखील गोलंदाजांची होणारी परवड पाहवेनाशी झाली आहे. धावा वेगात पटकावला जातात याची अनेक कारणे आहेत. त्यापैकी सर्वात मोठं आणि प्रमुख कारण म्हणजे सीमारेषा, आणखी आत आणण्याचा सातत्याने होत असणारा प्रयत्न.

अहमदाबादसारख्या दूरवर सीमारेषा असलेल्या स्टेडियमवर मोठे फटके खेळणारे फलंदाज बऱ्याच वेळा बाद झालेले दिसतात. मात्र छोट्या मैदानावर किंवा मुंबईसारख्या केंद्रावर, वानखेडे स्टेडियमवर, जिथे सीमारेषा आतमध्ये आणली आहे. येथे नेहमीचे झेलदेखील षटकार नोंदविले जातात. आणि त्यामुळे संघाची धावसंख्यादेखील २०० पर्यंत सहज जाते. ती ओलांडलीदेखील जाते.

भारत क्रिकेटमधील सर्वात शक्तिशाली फटकेबाज असलेला देश बनला आहे का? आयपीएल २०२६ मध्ये, आपण काही सर्वात वेगवान खेळी आणि अनेक शानदार षटकार मारणारे खेळाडू पाहिले आहेत. चेन्नई सुपर किंग्सच्या उर्विल पटेलने १३ चेंडूंमध्ये अर्धशतक झळकावून, आयपीएल २०२३ मध्ये यशस्वी जैस्वालच्या नावावर असलेल्या सर्वात जलद अर्धशतकाच्या विक्रमाची बरोबरी केल्यानंतर, हे निर्भय फलंदाज कुठून उदयास येत आहेत असा प्रश्न पडतो. उर्विलने अवघ्या २३ चेंडूंमध्ये आठ षटकार आणि दोन चौकारांसह ६३ धावा केल्या. एक काळ असा होता जेव्हा क्रिकेट जगताचा असा विश्वास होता की बेधडक फटकेबाजी हे केवळ वेस्टइंडिजचे वैशिष्ट्य आहे. त्यांचे वर्चस्व फार काळ टिकले नाही, कारण इतर अनेक देशांनीही शक्तिशाली फटकेबाज खेळाडू उभे केले आणि विक्रम मोडले. लवकरच जगाला हे लक्षात आले की पॉवर-हिटर बनण्यासाठी वेस्टइंडिजच्या फलंदाजांसारखी मजबूत शरीरयष्टी असण्याची गरज नाही. फटकेबाजीला चालना देणाऱ्या आधुनिक बॅट्समुळे, आता फक्त टायमिंग, संतुलन आणि चेंडू लवकर ओळखण्याची क्षमता यांचीच गरज आहे. हे असे गुण आहेत जे सध्याच्या अनेक फलंदाजांनी तासनतास केलेल्या कठोर सरावातून मिळवले आहेत. नैसर्गिक प्रतिभेला कठोर परिश्रमाने पैलू पाडल्यास ती चमत्कार घडवू शकते.

पंधरा वर्षांच्या वैभव सूर्यवंशीपासून ते जयस्वाल आणि अभिषेक शर्मापर्यंत असे अनेक खेळाडू आहेत ज्यांनी या हंगामात वेगवान खेळी खेळल्या आहेत. आज, जागतिक विक्रम त्यांच्यासारख्या फलंदाजांच्या हातात आहेत. सहज फटकेबाजीसाठी अनुकूल खेळपट्ट्यांनीही मदत केली असली तरी, अकल्पनीय वेगाने धावा करण्यासाठी प्रचंड प्रतिभेची गरज असते. पटेलने सलग सहा वैध चेंडूंवर मारलेले पाच षटकार आणि एक चौकार ही एक उल्लेखनीय कामगिरी आहे. आणि ज्यांना आश्चर्य वाटत आहे की हा धुमाकूळ घालणारा फलंदाज कुठे लपला होता, त्यांच्यासाठी उत्तर सोपे आहे: तो नेहमीच असा खेळत आला आहे, पण आताच जगाची त्याच्याकडे दखल घेतली जात आहे. तो आता आयपीएलच्या डावाच्या पहिल्या आठ चेंडूंवर सहा षटकार ठोकणारा पहिला फलंदाज ठरला आहे.

नोव्हेंबर २०२४ मध्ये झालेल्या आयपीएल लिलावात उर्विल विकला गेला नाही. पण त्यामुळे तो थांबला नाही. त्यानंतर लगेचच इंदूरमध्ये सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीमध्ये त्रिपुराविरुद्ध गुजरातकडून खेळताना त्याने २८ चेंडूंत शतक झळकावले. हे शतक पुरुषांच्या टी-२० क्रिकेटमधील दुसरे सर्वात वेगवान शतक ठरले.

चेन्नईसाठी अर्धशतक पूर्ण केल्यानंतर, उर्विलने आपल्या खिशातून एक कागदाचा तुकडा काढला, ज्यावर हे तुझ्यासाठी आहे, बाबा असे लिहिलेले होते. यावरून हे दिसून आले की, तो काहीतरी विशेष करण्याच्या तयारीने आणि निर्धाराने फलंदाजीसाठी मैदानात उतरला होता. त्याचे वडील मुकेश पटेल यांनी त्याची तंदुरुस्ती वाढवण्यात मोठी भूमिका बजावली. मुकेश मेहसाण्यातील एका हायस्कूलमध्ये शारीरिक शिक्षण शिक्षक म्हणून काम करत होते, जिथे उर्विलचा जन्म झाला. अहमदाबादपासून ७५ किमी अंतरावर असलेल्या उत्तर गुजरातमधील या शहराने आजपर्यंत एकही स्टार क्रिकेटपटू घडवलेला नाही. आयपीएल सारख्या मर्यादित षटकांच्या क्रिकेटमध्ये या गोष्टी आता वारंवार व्हायला लागल्या आहेत. आयपीएलमध्ये मिळणारा प्रचंड पैशांसाठी पालक आणि खेळाडू कठोर मेहनत घेताना दिसतात. त्याचाच हा झालेला परिणाम आहे.

मात्र ही सगळी फटकेबाज मंडळी रणजी क्रिकेट किंवा प्रथम दर्जाच्या क्रिकेटमध्ये, कुठे गायब होतात कळत नाही. कसोटी क्रिकेटमध्ये त्यांच्या बॅटमधून निघणारा धावांचा झरा एकदम आटलेला दिसतो. असं अलिकडच्या हंगामात तरी अनेकदा पहायला मिळालय. त्यामुळे केवळ फटकेबाजी नाही तर त्यांना चांगला बचावदेखील करता आला पाहिजे. मर्यादित षटकांचे क्रिकेट हे खरे क्रिकेट नाही. कसोटी क्रिकेटमध्ये किंवा प्रथम दर्जाच्या क्रिकेटमध्ये जेथे गोलंदाजाला चेंडू टाकण्यापासून, स्विंग करण्यापासून, आपटण्यापासून मर्यादा घालण्यात आलेल्या नाहीत, तेथे हेच फलंदाज, काही चेंडूवर निरुत्तर झालेले पहावयास मिळतात. सर्व प्रकारच्या क्रिकेटमध्ये जेव्हा हे फलंदाज याच जोशात खेळताना दिसतील. तेव्हाच आपण आपल्याला भावी गावस्कर, तेंडुलकर, धोनी, कोहली, युवराज सिंग मिळाले, असे म्हणायला हरकत नाही.

## आयसीसी टेस्ट रँकिंग जाहीर
# भारताचा बुमराह अव्वल
## यशस्वी-शुभमन टॉप-१० मध्ये ; जो रूट फलंदाजांमध्ये नंबर-१

| दुबई | वृत्तसंस्था |

भारतीय वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहने बुधवारी जाहीर झालेल्या ताज्या कसोटी क्रमवारीत आपले नंबर-१ स्थान कायम राखले आहे. कसोटी फलंदाजांच्या यादीत भारताचे यशस्वी जैस्वाल आणि शुभमन गिल अनुक्रमे ८व्या आणि ९व्या स्थानावर आहेत. तर, मीरपूर कसोटीत पाकिस्तानविरुद्ध १०४ धावांच्या शानदार विजयानंतर बांगलादेशी खेळाडूंना कसोटी क्रमवारीत जबरदस्त फायदा झाला आहे. विजयाचा नायक असलेला कर्णधार नजमुल हुसेन शांतो आता त्याच्या कारकिर्दीतील सर्वोत्तम क्रमवारीत पोहोचला आहे.

इंग्लंडचा माजी कर्णधार जो रूट ८८० गुणांसह कसोटी फलंदाजांच्या क्रमवारीत अव्वल स्थानावर आहे. हॅरी ब्रूक दुसऱ्या, ट्रॅव्हिस हेड तिसऱ्या आणि स्टीव्ह स्मिथ चौथ्या स्थानावर आहेत. भारतीय फलंदाजांबद्दल बोलायचे झाल्यास, यशस्वी जैस्वाल ७५० गुणांसह ८व्या स्थानावर आहे. तर, शुभमन गिलने एका स्थानाची झेप घेतली आहे आणि तो ७३० गुणांसह ९व्या क्रमांकावर पोहोचला आहे.

पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यात प्लेअर ऑफ द मॅच ठरलेल्या नजमुल हुसेन शांतो याने फलंदाजांच्या क्रमवारीत १६ स्थानांची मोठी झेप घेतली आहे. आता तो संयुक्तपणे २३व्या स्थानावर पोहोचला आहे, जी त्याच्या कसोटी कारकिर्दीतील सर्वोत्तम रेटिंग आहे.

**गोलंदाजांमध्ये बुमराहचे राज्य**

गोलंदाजांच्या यादीत बुमराह ८७९ गुणांसह पहिल्या स्थानावर कायम आहे. त्याच्यानंतर दुसरा सर्वात यशस्वी भारतीय मोहम्मद सिराज आहे, जो १२व्या स्थानावर आहे. फिरकीपटू रवींद्र जडेजा आणि कुलदीप यादव १४व्या आणि १५व्या स्थानावर आहेत.

### कमिन्स आणि स्टार्कला फायदा

ऑस्ट्रेलियाई कर्णधार पॅट कमिन्स आणि मिचेल स्टार्कने क्रमवारीत सुधारणा केली आहे. स्टार्क दुसऱ्या आणि कमिन्स चौथ्या स्थानावर पोहोचले आहेत. न्यूझीलंडचा मॅट हेन्रीही पुढे सरकत तिसऱ्या स्थानावर आला आहे. २०२६ मध्ये भारताने एकही सामना खेळला नाही भारतीय संघाने वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप २०२६ च्या हंगामात अद्याप एकही सामना खेळलेला नाही. टीम इंडियाने आपला शेवटचा कसोटी सामना गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये दक्षिण आफ्रिकेविरुद्ध घरच्या मैदानावर खेळला होता.



### अफवांमुळे प्रीती झिंटा भडकली!

**पंजाब :** आयपीएल २०२६ मध्ये सलग चार पराभवानंतर पंजाब किंग्ज सध्या दबावाखाली आला आहे. दरम्यान संघ आणि काही खेळाडूंबद्दल सोशल मीडियावर सुरू असलेल्या चर्चांवर फ्रँचायजीने तीव्र प्रतिक्रिया दिली आहे. पंजाब किंग्जच्या अधिकृत सोशल मीडिया अकाउंटवरील एका पोस्टमध्ये, लोकांना संघ किंवा खेळाडूंबद्दल चुकीची माहिती पसरवण्यापासून परावृत्त होण्याचे आवाहन केले आहे. संघाची सह-मालक प्रीटी झिंटाने ही पोस्ट शेयर केली. पंजाबने एक्सवरील ही पोस्ट हटवली आणि एक नवे निवेदन पोस्ट केले, ज्यामधून क्रीडा पत्रकार हा शब्द काढून टाकण्यात आला होता. पंजाबने त्यांच्या आधीच्या पोस्टमध्ये लिहिले, टीका, थट्टामस्करी आणि मते हे खेळाचा भाग आहेत. पण केवळ प्रसिद्धीसाठी रचलेल्या खोट्या बातम्या आणि बनावट कथानके रचणे हे खेळाचे भाग नाहीत. लक्ष वेधण्यासाठी किंवा प्रसिद्धी मिळवण्यासाठी चुकीची माहिती पसरवण्यापूर्वी सर्वांनी तथ्यांची पडताळणी करावी, असे आम्ही आवाहन करतो.

## महिला टी-२० विश्वचषकाचे सराव वेळापत्रक जाहीर

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |




आयसीसीने महिला टी-२० विश्वचषक २०२६ च्या सराव सामन्यांचे वेळापत्रक जाहीर केले आहे. मुख्य स्पर्धेपूर्वी सर्व १२ संघ ६ ते १० जून दरम्यान सराव सामने खेळतील. भारतीय महिला संघ आपले दोन्ही सराव सामने कार्डिफमध्ये खेळेल.टीम इंडियाचा सामना इंग्लंड आणि वेस्ट इंडिजशी होईल. ही स्पर्धा १२ जूनपासून एजबेस्टनमध्ये सुरू होईल. भारत आपला पहिला गट सामना १४ जून रोजी पाकिस्तानविरुद्ध खेळेल.

भारतीय महिला संघासाठी हे सराव सामने महत्त्वाचे असतील. भारत ८ जून रोजी वेस्ट इंडिजविरुद्ध पहिला सराव सामना खेळेल. त्यानंतर १० जून रोजी टीम इंडियाचा सामना यजमान इंग्लंडशी होईल. दोन्ही सामने कार्डिफमध्ये खेळले जातील. भारतीय खेळाडूंना इंग्लंडमधील परिस्थिती आणि खेळपट्ट्या समजून घेण्याची चांगली संधी मिळेल.आयसीसीने सराव सामन्यांसाठी इंग्लंडमधील डर्बी, लॉफबरो आणि कार्डिफची निवड केली आहे. ६ जूनपासून सुरू होणाऱ्या सराव सामन्यांच्या पहिल्या दिवशी आठ संघ मैदानात उतरतील.यामध्ये मागील अंतिम फेरीतील संघ दक्षिण आफ्रिका आणि न्यूझीलंडचाही समावेश आहे. नेदरलँड्सचा संघ यावेळी पदार्पण करेल आणि पहिल्या सराव सामन्यात स्कॉटलंडशी भिडेल.

महिलाटी-२० विश्वचषकाची मुख्य फेरी १२ जूनपासून एजबेस्टनमध्ये सुरू होईल. विश्वचषक इंग्लंडच्या यजमानपदाखाली खेळला जात आहे.

## राज्य व्हॉलीबॉल स्पर्धेचे बदलापूरमध्ये दिमाखदार उद्घाटन
### बदलापूरमध्ये इनडोअर क्रीडासंकुल उभे करणार : आ. किसन कथोरे

| बदलापूर | वृत्तसंस्था |





चांगल्या प्रकारची क्रीडासंकुले ज्यावेळी उभे रहातील, तेव्हा देशातून राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय क्रीडापटू घडतील, यासाठी बदलापूर शहरात इनडोअर क्रीडासंकुल उभे करणार असल्याचे घोषणा आमदार किसन कथोरे यांनी राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी केले.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र व्हॉलीबॉल असोसिएशन व कुळगाव-बदलापूर नगरपरिषद यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धा प्रथमच बदलापूरला आयोजन केले आहे. हेंद्रेपाडामधील बदलापूर जिमखाना मैदानावर रंगलेल्या स्पर्धेचे आमदार किसन कथोरे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी कुळगाव-बदलापूर नगरपरिषदच्या नगराध्यक्षा रूचिता घोरपडे, जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, मुख्यधिकारी मारूती गायकवाड, नगरसेवक किरण भोईर, माजी नगराध्यक्षा राजेंद्र घोरपडे, महाराष्ट्र व्हॉलीबॉल असोसिएशनचे संजय नाईक, निलेश जगताप, उपसंचालक नवनाथ फरताडे, जिल्हा क्रीडा अधिकारी सुवर्णा बारटक्के आदी उपस्थित होते.

ढोल-ताशाचा गजरात मराठमोळे फेटे परिधान करीत उत्साहपूर्ण मिरवणुकीने बदलापूरमधील राज्य व्हॉलीबॉल स्पर्धेचा प्रारंभ झाला. यानंतर स्पर्धेचे शानदार उद्घाटन बदलापूर जिमखाना मैदानात रंगला. शाहिर नंदेश उमप यांच्या सांस्कृतिक मेजवानीसह जिम्नॅस्टिक्सची चित्तथरारक प्रात्यक्षिके उद्घाटन सोहळ्याचे मुख्य आकर्षण ठरले. मैदानेचे पूजन करून हवेत स्पर्धेच्या बोधचिन्हासह फुगे सोडून स्पर्धेस सुरूवात करण्यात आली.

बदलापूरमधील व्हॉलीबॉल स्पर्धा ही ऐतिहासिक होईल असे सांगून रूचिता घोरपडे पुढे म्हणाल्या की, बदलापूर जिमखाना हे शहराचे वैभव आहे. शहरातील ५ क्रीडांगणे खेळाडूंसाठी उपलब्ध असून भविष्यात यातून राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय क्रीडापटू निर्माण होतील. बदलापूरमधील स्पर्धा ही राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा असल्याचे वातावरण दिसून येत आहे. क्रिकेटशिवाय इतर खेळातही करीअर होऊ शकते असे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी सांगितले. १३ ते १७ मे २०२६ कालावधीत होणाऱ्या स्पर्धेसाठी राज्यतील ८ विभागातील ३८४ खेळाडूंचा थरार रंगणार आहे. स्पर्धेतील विजेत्यांना २३ लाख ३५ हजारांची रोख बक्षिसे व करंडक, पदके देण्यात येणार आहेत.

## रोहा तालुका मेडिकल असोसिएशनचा वार्षिक क्रीडा महोत्सव साजरा

| चणेरा | प्रतिनिधी |



रोहा तालुका मेडिकल असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेले रायगड ग्रामीण डॉक्टर्स क्रिकेट टूर्नामेंट आणि वार्षिक क्रीडा संमेलन उत्साहात आणि जल्लोषात पार पडले. डॉक्टरांमधील क्रीडा भावना, एकोपा आणि सामाजिक सलोखा यांचे सुंदर दर्शन या स्पर्धांच्या माध्यमातून घडले.

या क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन रोहा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मारुती पाटील, रोहा प्रांत अधिकारी ज्ञानेश्वर खुटवड, डॉ. अशोक जाधव यांच्या उपस्थितीत करण्यात आले. क्रिकेट स्पर्धेसाठी पुरुष गटात सहा संघांनी सहभाग घेतला. त्यामध्ये रोहा रायझर्स, महाड सुपर किंग, पेण मेडिकल असोसिएशन, म्हसळा-श्रीवर्धन मेडिकल असोसिएशन, अलिबाग-मुरुड मेडिकल असोसिएशन तसेच रोहा रायझर्स लिजेंड या संघांचा समावेश होता. महिला गटात रोहा रायझर्स आणि रोहा क्वीन्स या दोन संघांनी सहभाग नोंदवला. महिला क्रिकेट स्पर्धेत अंतिम विजेता म्हणून रोहा रायझर्स महिला संघाने शानदार कामगिरी करत विजेतेपद पटकावले. तर पुरुष गटात पेण मेडिकल असोसिएशन संघ अंतिम विजेता ठरला.

बॅडमिंटन महिला एकेरी स्पर्धेत डॉ. तनुजा पवार यांनी विजेतेपद पटकावले, डॉ. सलमा मुजावर या उपविजेत्या ठरल्या. महिला दुहेरी बॅडमिंटन स्पर्धेत डॉ. सलमा मुजावर आणि डॉ. तनुजा पवार या जोडीने विजेतेपद मिळवले. डॉ. प्रतिभा शहासने आणि डॉ. कांचन कदम या जोडीने उपविजेतेपद मिळवले. महिला कॅरम स्पर्धेत डॉ. मेघा खारीवाले यांनी प्रथम क्रमांक मिळवला, तर डॉ. कोमल राजपूत उपविजेत्या ठरल्या. बुद्धिबळ स्पर्धेत डॉ. प्रणित दिघे विजेते ठरले, तर डॉ. सर्जिल कारजीकर यांनी उपविजेतेपद पटकावले.

१०० मीटर धावण्याच्या पुरुष गटात डॉ. प्रणित दिघे यांनी प्रथम क्रमांक मिळवला, तर डॉ. तुषार राजपूत उपविजेते ठरले. महिला गटात डॉ. कांचन कदम यांनी बाजी मारली, तर डॉ. सलमा मुजावर यांनी उपविजेतेपद मिळवले. महिला क्रिकेट स्पर्धेत उत्कृष्ट फलंदाज म्हणून डॉ. कांचन कदम, उत्कृष्ट गोलंदाज म्हणून डॉ. साधना झोलगे तर उत्कृष्ट क्षेत्ररक्षक म्हणून डॉ. सलमा मुजावर यांना गौरविण्यात आले.

## मिनी मॅरेथॉन स्पर्धेत सहभाग नोंदवावा : चंद्रकांत चौधरी

| माथेरान | प्रतिनिधी |

२१ मे १८५० हा माथेरान शहराचा स्थापना दिवस असल्याने येत्या २१ मे रोजी १७६ व्या वर्षात पदार्पण करत आहे. या महत्वपूर्ण दिवसाचे औचित्य साधत माथेरान नगरपरिषदेतर्फे बुधवारी (दि. २०) सकाळी ७ वा मिनी मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन केले आहे. सर्वांसाठी खुला गट ७ किमी मॅरेथॉन विजेत्यास २० हजार, उपविजेत्यास १० हजार तर तृतीय क्रमांक ५ हजार त्याचप्रमाणे चौथा, पाचवा व सहाव्या क्रमांकास प्रत्येकी १ हजार रुपयांचे पारितोषिक, आकर्षक ट्रॉफी दिली जाणार आहे.

शालेय विद्यार्थी इयत्ता ७ ते १० मुले व मुली वेगळा गट यांच्या साठी ३ किमी मॅरेथॉन तर महिलांसाठी खुला गट दीड किमी चालण्याची स्पर्धा आयोजित केली आहे. या तिन्ही गटातील स्पर्धकांना विजेत्यास १० हजार, उपविजेत्यास ५ हजार तर तृतीय क्रमांक ३ हजार व चौथ्या, पाचव्या व सहाव्या क्रमांकास प्रत्येकी १ हजार रूपये दिले जाणार आहेत. स्पर्धेबाबत माहितीसाठी स्पर्धकांनी उपनगराध्यक्ष संतोष शेलार ८७९३३११०४४, अर्चना भिलारे ९६७३८०८९०१, रिझवाना शेख ८०८७४३३८५६ यांना संपर्क साधण्याचे आवाहन नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांनी केले आहे.

## बॉल टेम्परिंगच्या वादात शाहीन

**लाहोर :** पाकिस्तान आणि बांगलादेश यांच्यात सध्या कसोटी मालिका खेळवली जात आहे. या मालिकेतील चौथ्या कसोटी सामन्यादरम्यान पाकिस्तानचा स्टार वेगवान गोलंदाज शाहीन आफ्रिदी एका नव्या वादात सापडला आहे. सोशल मीडियावर शाहीनचा एक व्हिडिओ वेगाने व्हायरल होत असून, त्यात तो चेंडूशी छेडछाड करताना दिसून येत आहे. या प्रकारामुळे क्रिकेट वर्तुळात उलटसुलट चर्चांना उधाण आले असून शाहीनवर टीकेची झोड उठत आहे. कसोटी सामन्याच्या चौथ्या दिवशी बांगलादेशचा संघ दुसऱ्या डावात फलंदाजी करत असताना ही घटना घडली. व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये शाहीन आफ्रिदी चेंडू आपल्या बुटांखाली दाबताना स्पष्टपणे दिसत आहे. शाहीनच्या बुटांच्या स्पाइक्समुळे चेंडूचा आकार बिघडू शकतो किंवा तो एका बाजूने खरखरीत होऊ शकतो, असा दावा केला जात आहे. विकेट मिळवण्यासाठी शाहीनने जाणीवपूर्वक चेंडूशी छेडछाड केल्याचा आरोप नेटकऱ्यांकडून केला जात आहे. हा प्रकार निदर्शनास येताच मैदानावरील पंचांनी तत्काळ हस्तक्षेप केला. पंचांनी शाहीन आफ्रिदीकडून चेंडू ताब्यात घेऊन त्याची बारकाईने पाहणी केली. बऱ्याच वेळ तपासणी केल्यानंतर चेंडूच्या स्थितीत कोणताही गंभीर बदल किंवा आक्षेपार्ह खुणा न आढळल्याने पंचांनी सामना पुढे सुरू ठेवण्याची परवानगी दिली. पंचांनी शाहीनला क्लिन चिट दिली असली तरी, सोशल मीडियावर क्रिकेट चाहत्यांनी मात्र त्याच्या खिलाडूवृत्तीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

### विराट कोहलीचे दमदार शतक | कार्तिक त्यागीचे तीन बळी
# आरसीबीने केला केकेआरचा पराभव

| रायपूर | वृत्तसंस्था |




रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरु आणि कोलकाता नाईट रायडर्समध्ये सामना रंगला. रायपूरमधील सामन्याचे नाणेफेक कर्णधार रजत पाटीदारने जिंकली आणि प्रथम बॉलिंगचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना केकेआरने १९२ धावा केल्या. १९३ धावांचा लक्ष्यप्राप्ती करताना आरसीबीच्या संघाने १९४ धावा केल्या आणि सामना ६ विकेट्सने जिंकला. यामुळे आता गुणतालिकेत मोठे बदल दिसत आहे.

आरसीबीच्या या विजयामुळे आरसीबीचे १२ सामन्यांत १६ गुण झाले असून ते गुणतालिकेत अव्वल स्थानी पोहोचले आहेत. गुजरात टायटन्सचेही १६ गुण आहेत, पण आरसीबीचा नेट रन रेट चांगला आहे. दरम्यान, केकेआर ११ सामन्यांत ९ गुणांसह आठव्या क्रमांकावर आहे. उर्वरित तीन सामने जिंकून ते फार तर १५ गुणापर्यंत पोहोचू शकतात. सध्याची गुणतालिका पाहता १५ धावा प्लेऑफसाठी पुरेशा ठरणार नाही त्यामुळे केकेआरचे आव्हान जवळपास संपल्यास जमा आहे. शिवाय सनरायझर्स हैदराबादच्या संघाकडे १४ गुण आहेत तर पंजाब किंग्जच्या संघाकडे १३ गुण आहेत.

मागील दोन सामन्यांमध्ये विराट कोहली शून्यावर बाद झाला होता. मात्र, या सामन्यात त्याने जोरदार फलंदाजी केली. वैभव अरोराच्या दुसऱ्या षटकात चार चौकार मारून त्याने आपला इरादा स्पष्ट केला. त्याने ५८ चेंडूंमध्ये आपले ९ वे आयपीएल आणि १० वे टी आंतरराष्ट्रीय शतक पूर्ण केले. विराट १०५ धावांवर नाबाद राहिला. यादरम्यान, विराट कोहलीने टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये आपल्या १४,००० धावा देखील पूर्ण केल्या.

लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी मैदानात उतरलेला जेकब बेथेल पहिल्याच षटकात अनेक वेळा फसला. त्यानंतर विराटने सूत्रे हाती घेतली. बेथेलला कार्तिक त्यागीने १५ धावांवर बाद केले. पडिक्कलने ३९ धावा केल्या. त्याची विकेटही कार्तिक त्यागीने घेतली. कर्णधार रजत पाटीदार केवळ ११ धावा करू शकला आणि टिम डेव्हिड केवळ २ धावाच करू शकला. जितेश शर्माने शेवटच्या षटकाच्या पहिल्याच चेंडूवर चौकार मारून सामना संपवला. कार्तिक त्यागीने तीन बळी घेतले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुला९बा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)